मासिक वार्तापत्र • अंक ७ • सप्टेंबर २०१७ • सहयोग मूल्य - रु. ५ • १६ पाने



# कामगार बिगुल

नव्या समाजवादी क्रांतीचा उद्घोषक

मुद्दा फक्त 'ढोंगी' बाबांचा नाही ५

मुस्लिम लोकसंख्या वाढीचे मिथक १२

आधारच्या सरकारी सक्तीचे कारण काय? १५

## बेसुमार वाढती महागाई म्हणजे गरीबांच्या विरोधात सरकारचे लुटेरे युद्ध!

### हा सरकारच्या जनताविरोधी, बहुराष्ट्रीय कंपन्याधार्जिण्या धोरणांचा परिणाम आहे.

‘खूप सहन केला भाववाढीचा मार, आता येणार मोदी सरकार’ अशा आकर्षक घोषणांच्या बळावर, बेसुमार महागाईच्या ओझ्याखाली दबलेल्या जनतेच्या एका हिश्श्याला मोहीत करून मतं गोळा केल्यानंतर ‘भाजपा’ची स्वत:ची महागाई दूर झाली. भाजपला कॉर्पोरेट कंपन्यांकडून मिळणाऱ्या देणग्यांमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. गेल्या वर्षी भाजपला २९८७ कार्पोरेट डोनर्सकडून ७०५.८० कोटी (फक्त अधिकृतरित्या!) रूपयांच्या देणग्या मिळाल्या आहेत! पण सामान्य लोकांसाठी वाढत्या भाववाढीचं संकट अंगावर आलं आहे. मोदी सरकार सत्तेत आल्यानंतर वस्तूंच्या किमतींमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. डाळींच्या किमती ज्या ६०-७० रुपये होत्या त्या वाढून २०० रुपयांपर्यंत पोहचल्या होत्या. त्यानंतर भाव कमी जरी झाला असला तरी १२०-१३० रुपयांवरच अटकला आहे. अन्नधान्य व मुलभूत गरजेच्या वस्तूंच्या किमती अमाप वाढल्या आहेत. या महागाईने देशातील तीन चतुर्थांश(३/४) लोकांसमोर जगण्याचं संकट निर्माण केलं आहे. भाजीपाल्यापासून ते धान्य व दूधही बेसुमार महाग झाल्याने कष्टकरी जनतेसोबतच निम्न मध्यमवर्गाला सुध्दा पोटभर पौष्टिक अन्न मिळण दुरापास्त झालं आहे.

रेल्वे,बसचे भाडे, दवाखान्याची फी,औषधे, शाळा-कॉलेजचा खर्च अगदी सगळ्या गोष्टींना आग लागली आहे. वीज-पाणी, घराचे भाडे आणि त्यात पुन्हा ‘जीएसटी’ ने सामान्य लोकांच्या वापरातील अधिकतर वस्तूंवर कराचा बोजा वाढवला आहे आणि महागाईच्या आगीत तेल ओतले आहे.

बहुसंख्य जनतेला जगण्या-मरण्याच्या सीमेवर लोटणारी ही महागाई आता वर्तमानपत्रे व टी.व्ही. चॅनेलवरून गायब आहे. तिच्याबद्दल आता कसलीही चर्चा होत नाही. खरं पाहता, उच्च मध्यमवर्ग आणि खात्यापित्या मध्यमवर्गाच्या उत्पन्नामध्ये गेल्या काही वर्षांपासून

**संपादक मंडळ**

वाढ होत आहे, त्यामुळे त्यांच्यावर या महागाईचा परिणाम होताना दिसत नाही. दुसरी गोष्ट म्हणजे, या वर्गाच्या मिळकतीचा एक लहानसाच हिस्सा फक्त खाण्यापिण्यावर खर्च होतो. उरलेला मोठा हिस्सा मनोरंजन, कपडे, कार-बाईक, टी.व्ही., ओव्हन, फ्रीज, विदेश प्रवास, मौजमजा इत्यादीवर खर्च होताना दिसत आहे. पण या महागाईने गरिबांसाठी मात्र जगणं अधिकंच कठीण बनवलं आहे.

महागाईने देशातील बहुसंख्य लोकांना कुठल्या परिस्थितीत ढकललं आहे याचा अंदाज लावण्यासाठी पुढील आकडा पुरेसा आहे. देशातील जवळपास तीन चतुर्थांश(३/४) लोकसंख्या प्रतिदिन केवळ ३० ते ४० रुपये रोजावर गुजराण करत आहे. देशातील तब्बल ५० कोटी कामगारांवरही महागाईचा मार खूप भीषण रित्या पडत आहे. शहरांमध्ये कोट्यवधी कामगार १०-१२ तास काम करून देखील महिन्याकाठी फक्त ६,००० ते ८,००० रुपये कमवू शकतात. त्यातही मालक या ना त्या कारणाखाली पगारातून काहीतरी कापतच असतो. पगारातील जवळपास अर्ध्यापर्यंतची मजूरी ही घरभाडे, वीजबिल, बसभाडे इत्यादींमध्ये खर्च होते. उरलेली कमाई ही कसंतरी आपल्या कुटूंबाचं पोट भरण्यासाठी खर्च होते. डाळ तर गरीबांच्या ताटातून कधीच अदृश्य झाली आहे. आता बटाटे, कांदे, टोमॅटो सारख्या भाज्यासुद्धा खाणं अवघड होत चाललं आहे.

काही वर्षांपूर्वी गुजरातमधील पाच जिल्ह्यात गरीब कुटुंबांच्या केलेल्या एका सर्व्हेक्षणामध्ये आढळून आलं की, महागाईच्या परिणामी त्या कुटुंबाच्या एकूण उत्पन्नातील ७४ टक्के हिस्सा फक्त खाण्यापिण्यावर खर्च होतो आहे. पूर्वी, जे कुटूंब सकाळी नाष्टा मग दुपारचं व रात्रीचं जेवण करत होते, आता त्यांपैकी ६० टक्के फक्त दोन वेळेचंच खातात. ५७ टक्के लोक खूप गरजेचं झाल्यानंतरच डॉक्टरकडे जातात. ४० टक्के कुटुंबांमध्ये चहासाठी दूधाचा वापर बंद झाला आहे. महागाईमुळे लोक बस ऐवजी कित्येक किलोमीटर अंतर नाईलाजाने पायी जात आहेत. आज अशी अवस्था देशातील बहुतेक सर्वच राज्यांमध्ये आहे. नोटबंदी व त्यानंतर झालेल्या कामगार कपातींमुळे संकट अधिकच गंभीर झालं आहे.

या भीषण महागाई पूर्वीच देशाची

पान ७ वर

## बाबा राघवदास मेडिकल कॉलेज(उ.प्र.) मध्ये ६० हून अधिक मुलांचे हत्याकांड

### कष्टकरी सामान्य जनतेच्या आरोग्याचा पंचनामा आणि मोदी-योगीच्या जुमलेबाजीचं नग्न वास्तव

जेव्हा काही लोक स्वातंत्र्याची सत्तरी साजरी करण्याची जय्यत तयारी करीत होते व सलग येणाऱ्या सुट्ट्यांची योजना आखत होते, तेव्हा गोरखपुर, उत्तरप्रदेशातल्या 'बाबा राघवदास मेडीकल कॉलेज' (बीआरडी मेडिकल कॉलेज) मध्ये काही आई-बाप आपल्या चिमुरड्यांना डोळ्यां देखत तडफडत मरताना बघत होते. **स्वतंत्र भारतात कष्टकरी सामान्य जनतेच्या वाटयाला काय आलंय, याची पुन:प्रचिती द्यायला ही घटना खुप बोलकी आहे.**

बीआरडी मेडिकल कॉलेज मध्ये 'एन्सेफलायटीस'चे ४००-७०० रुग्णांची दर महीन्याला रेलचेल असते. सरकारी रुग्णालय असल्यामुळे जवळच्या राज्यांतूनही अनेक रुग्ण दाखल व्हायला येतात. **खाजगी आरोग्यसेवा न परवडणारी असल्यामुळे देशातला बहुसंख्य कष्टकरी वर्ग अशा रुग्णालयांतून इलाज करायला आसरा शोधतच राहतो.** 'एन्सेफलायटीस' नावाच्या रोगासाठी बी.आरडी मेडिकल कॉलेजमध्ये विशेष विभाग व सुविधा असल्याने ऑगस्ट ते ऑक्टोबर महीन्यात रुग्णांची संख्या दुप्पटीने वाढते. **गेल्या कित्येक दिवसांपासून मेडिकल कॉलेज आर्थिक अडचणींचा सामना करत होते असं तिथल्या कर्मचाऱ्यांनी सांगितले. ९ ऑगस्टला मेडिकल कॉलेजकडे आपल्या कर्मचाऱ्यांचा पगार देण्या इतपत सुद्धा निधी नव्हता आणि 'अत्यावश्यक सेवा' असणाऱ्या 'ऑक्सीजन' सिलींडर पुरवणाऱ्या कंपनीचे अनेक महिन्यापासूनचे पैसे सुद्धा थकवले होते. याच्या परिणामी त्या कंपनीने ९ ऑगस्टलाच पुरवठा खंडीत केला होता. निर्लज्ज प्रशासन व निबर सरकारने या बाबत कुठलीच पर्यायी व्यवस्था केली नाही व ११ ऑगस्टला पूर्णत: संपलेल्या स्थितीत, ऑक्सीजनचा पुरवठा न झाल्यामुळे काही तासांच्या अंतरामध्येच तब्बल ३० मुलांना जीव गमवावा लागला. दोन-तीन दिवसांच्या दरम्यान ६० हून अधिक मुलांचा जीव गेला**

> **जेव्हा निरपराध मुलं मरतात**
> **आणि मोठी माणसं**
> **त्यांच्या मरण्यावर तर्क करतात**
> **त्यांच्याही आत मरतं काहीतरी**
> **ज्यांच्या आत मरत नाही काहीही**
> **ते मेलेलेच असतात**
> **अशीच माणसं**
> **समजावतात आपल्याला**
> **“मरत राहतात मुलं दरवर्षी”**
> **जयनारायण**

ही घटना घडली त्या मतदार संघाचे प्रतिनिधीत्व खुद्द मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ करत आहेत. जनतेपेक्षा गायींच्या वंशाची काळजी त्यांना जास्त आहे. याच मतदार संघात सर्वात पहीली 'गोवंश चिकित्सा मोबाइल वॅन (अम्बुलन्स) योगीने सुरू केली आहे. **हे तेच ठिकाण आहे जीथं मोदीसाहेबांनी आपली छाती ५६ इंचाची असल्याच सांगितलं होतं व 'एन्सफेलायटीस' मुळे दरवर्षी मरणाऱ्या मुलांसाठी**

पान १० वर

# निंबोडी शाळा दुर्घटना नव्हे, प्रशासकीय हत्या

अहमदनगर शहरापासून अवघ्या पाच कि.मी.अंतरावर असणाऱ्या निंबोडी गावात दिनांक २७ ऑगस्ट रोजी जिल्हा परिषदेच्या आय.एस.ओ. मानांकन मिळालेल्या शाळेचे छत कोसळुन तब्बल ३ विद्यार्थ्यांचा मृत्यु झाला. नुकतीच शाळा सुटली होती. विद्यार्थी वर्गातून बाहेर येणारच होते की पत्त्यांच्या बंगल्याप्रमाणे भिंती ढासळू लागल्या व छत खाली कोसळलं. त्या ढिगाखाली जवळ जवळ ३०-३५ मुलं अडकली गेली. स्थानिकांच्या व काही तरुणांच्या मदतीने मुलांना त्या माती व सिमेंट च्या ढिगाऱ्यातून बाहेर काढत शासकीय रुग्णालयात दाखल केलं गेलं. सिव्हिल हॉस्पिटलमध्येही गोंधळ उडालेला होता, पालक आपल्या चिमुरड्यांना शोधत होते. सैरभैर आक्रोश चहूबाजूंनी चालू होता. ग्रामीण भागातील गोरगरीबांची निरागस मुलं हकनाक जीवाला मुकली तर काही थोडक्यात बचावली.


गरीबांची मुलं कुठंच सुरक्षित नाहीत, हे भयाण वास्तव परत समोर आलं. गोरखपुर,निठारी मधील घटना काय किंवा निंबोडी शाळा काय? गरीबांची मुलं इथल्या व्यवस्थेला असून-नसून सारखीच. खरंतर धोकादायक इमारतींचा सर्व्हे करुन त्या तात्काळ खाली करणं, दुरुस्त करणं किंवा नुतनीकरण करण्याची प्राथमिकता व गंभीर जबाबदारी शासन-प्रशासनाची आहे, पण ही जबाबदारी कुणाची व काय पावले उचलली जाताहेत या बाबतचा करंटेपणा सर्वांना माहीत आहे. त्यात झेडपी शाळा अगोदरच नकोश्या, शासनाला भार!मग त्याची गुणवत्ता, पायाभूत सुविधा, शिक्षकांची संख्या, विद्यार्थी विकास असल्या गोष्टी कुणाच्या गावीही नसतात. सगळं काही कागदावर आणि वरवर केलं जातं हा अनुभव नवा नाही. बिहारमधल्याशाळेत, २०१३ मध्ये मध्यान्ह भोजनातून विषबाधा होऊन तब्बल २३ मुलांचा जीव गेला होता. जि.प. शाळांमधून गरीबांचीच मुलं जातात, त्यातही मोठी संख्या दलित समूहाच्या मुलांची असते. सरकारच्या धनिक धार्जिण्या धोरणापायी व प्रशासनाच्या उदासिनतेमुळं अजून किती मुलांचा जीव आपण जाऊ द्यायचा? निःशुल्क दर्जेदार शिक्षण व अद्ययावत आरोग्य सुविधा हा आपला अधिकार आहे.

निंबोडी शाळेतील ३ मुलांच्या प्रशासकीय हत्येचा जाहीर निषेध करण्यासाठी नौजवान भारत सभा व दिशा विद्यार्थी संघटनेने संयुक्तरित्या निषेध आंदोलन केले व जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. यापुर्वीच गोरखपुर, बाबा राघवदास मेडिकल कॉलेज मधिल, ऑक्सिजन न मिळाल्यामूळं ३० मुलांच्या मृत्युनं झालेली जखम भळभळायची थांबते न थांबते तोच निंबोडी, अहमदनगर मध्ये शाळेचं छत पडल्याची बातमी येऊन धडकते व पून्हा ३ मूलांच्या मृत्युचा ओरखडा काळजावर कोरला जातो. कुंभकोणम ते निंबोडी... आपल्या समोर अनेक प्रश्न तर उभे करता आहेतच. सोबत भारताचं एक वेदनादायी सत्य सुद्धा नागडं करताहेत. डोळ्यांवर कितीही कातडं ओढलं, कितीही नको म्हटलं तरी हे सत्य लपणार नाही. उलट ते सतत कुठल्या ना कुठल्या रुपात पिच्छा पुरवतच राहील. आज ते निंबोडी शाळेच्यानिमित्तानं समोर आहे उद्या दुसऱ्या असेल. शहरी व ग्रामीण भागांतील कष्टकऱ्यांची मुलं प्रामुख्यानं पालिका किंवा जिल्हा परिषदेच्या शाळेचाच रस्ता धरतात. या शाळांची स्थिती अशी असते की एकतर त्या एकशिक्षकी तरी असतात किंवा शिक्षक अपुरे तरी असतात. थोड्या शिक्षकांवर कामाचा अधिक ताण दिल्यानं आपसूकच शिक्षणाचा दर्जा खालावतो. दुसऱ्या बाजुला पायाभूत सुविधांची पार दैना झालेली असते. मध्यान्ह भोजनाच्या नावाखाली बेचव, रद्दड आणि निकृष्ट दर्ज्याचं अन्न पुढ्यात वाढलं जातं. पण तरीही कागदोपत्री सगळं ठिक असतं. वस्तुस्थिती वेगळी गोष्ट सांगत राहते. एक तर १९९१ नंतर स्विकारलेलं खाजगीकरणाच धोरण व त्याच्या परिणामी शिक्षण क्षेत्रातील खाजगीकरणानं शिक्षणाचा बाजार मांडला आहे. शिक्षणाची जबाबदारी हळू हळू संपवण्यासाठी एका बाजूला अनुदान कपात, विना अनुदानीत अशी धोरणं लागू केली गेली तर दुसऱ्या बाजुला स्थानिक संस्था व सरकारी शाळांवरील खर्चातही कपात केली गेली. अशा शाळांमधून मिळणाऱ्या शिक्षणा विषयीची अनास्था, दुर्लक्ष व बेजबाबदारपणामुळं दर्जा व संख्या जास्तच घसरले आहेत. त्याच बेजबाबदारपणाचं दुसरं टोक शिक्षणाच्या नावाखाली होणाऱ्या भ्रष्टाचाराच्या वाढीमध्ये दिसून येईल. निंबोडी शाळा दुर्घटना अशाच दुर्लक्षिपणाची, बेजबाबदारपणाची व भ्रष्टाचाराची गोष्ट कथन करते आहे. या शाळांमधून शिकणाऱ्या कष्टकऱ्यांच्या, श्रमिकांच्या मूलांच्या वाट्याला खुप वेळा मरणच आले आहे. राबणाऱ्यांच जगणं मुश्किल होईल अशी सगळी तजवीज या भांडवली समाजामध्ये झाली आहे. पब्लिक प्राइव्हेट पार्टनरशीपच्या नावाखाली आरोग्य सुविधांचं खाजगीकरण, वीज-पाणी अगोदरच खाजगी क्षेत्राकडे सुपूर्त होत आलंच आहे.शिक्षण पैसेवाल्या पुरतं मर्यादीत करून नवी ज्ञानबंदी लागू केली जाते आहे. अशा स्थितीत आपल्या मुलांच भवितव्य तर सुरक्षित नाहीच, पण जीवसुद्धा सुरक्षित नाही असं चित्र आहे. ही परिस्थिती बदलायला हवी. उत्तम दर्जेदार निशुल्क सर्वांना शिक्षण हा आपला अधिकार आहे. कष्टकऱ्यांची मुलं दवाखान्यात मरण्यासाठी किंवा शाळेच्या छताखाली दबण्यासाठी नाहीत. सरकारी शाळांची दुरावस्था, देशातल्या कुपोषणात मरणारी ५००० बालके यांच्या संबंधातून न पहाता, केवळ दुर्दैव, अपघात म्हणून पहाणं म्हणजे अजून एका घटनेची वाट बघत राहणं होय. सरकारची असणारी उदासीनता, दुर्लक्ष, अनास्था व बेजबाबदारपणा अशा घटनांना आवतन देत असतो. ओढा किंवा नदी जवळ शाळा असणं हे कारण कधीच नसतं, समुद्रात पुलं बांधता येण्याच्या जमान्यात हे हास्यास्पद कारणं देता येत नाही. गरीबांच्याच वर्गातून पाणी गळतं, त्यांच्याच जेवणांत चुकून विष पडतं,त्यांच्याच मुलांचा ऑक्सिजन संपतो. ही गोष्ट पंचतारांकित शाळांमध्ये घडत नाही. सरकारी शाळा म्हणजे असून डोकेदुखी नसून खोळंबा म्हणून शिकलेले मजूर निर्माण करायचा अड्डा बनल्यात. शिक्षणाचं खाजगीकरण केल्यानंतर ते सत्ताधारी वर्गाच्या हातातलं दडपणूकीचं हत्यार बनवलं गेलं आहे. ज्यांच्याकडे पैसा त्याला शिक्षण असा नवा अघोषित ज्ञानबंदीचा अंमल सध्या चालू आहे. त्यातूनही कुणी सुटलाच तर रोहीत वेमुला होतो. बहुसंख्य गरीब व मुठभर श्रीमंतात विभागलेली व्यवस्था, जी नफ्यावर आधारलेली आहे व जातीत विभागलेली आहे ती सामान्य जनतेच्या वाट्याला दुःख, दारिद्र्य, दैन्य व उपेक्षेशिवाय काहीही देणार नाही. त्यासाठी स्वतः जनतेनं पुढाकार घेऊन पुढे येण्याची गरज आहे.

या निषेध आदोलनांतून मागण्याचं निवेदन जिल्हाधिकारी यांना देण्यात आलं. या वेळी पिडीत कुटुंबाला दोन दिवसांत सरकारी अर्थसहाय्य देण्याबाबत, नव्या शाळेचा प्रस्ताव लवकर पाठवण्यात बाबत, जिल्हा परिषद व इतर शाळांचे ऑडीट लवकर करुन जनसुनवाई घेण्याबाबत आश्वासने अधिकाऱ्यांनी दिली. एव्हाना ती मदत पोहचली असेल पण या घटने नंतर दुसऱ्याच दिवशी अजून एका घटनेत अहमदनगर जिल्ह्यातीलच श्रीगोंदा तालुक्यात पहाटे जि.प.शाळा पडली. नंतर केलेल्या सर्व्हे नुसार अहमदनगर जिल्ह्यातल्या अशा एकूण १००० शाळा आहेत ज्यांना धोकादायक इमारती म्हणून घोषित करता येईल. प्रशासनाने तर आश्वासनाची खैरात वाटायला सुरुवात कधीच केली आहे.याच दरम्यान (अ!)नीती आयोगाने सरकारी मोडकळीस आलेल्या शाळा खाजगी कंपन्यांमार्फत चालवण्याची शिफारस केली आहे. याच्याच सोबतीला शिक्षण क्षेत्राला कधी नव्हे ते जी.एस.टी च्या निमित्ताने कराच्या मर्यादेत आणण्यातून मनसुबे स्पष्ट दिसत आहेत.

गेल्या सत्तर वर्षांच्या काळात काँग्रेस असो अथवा भाजप, परवडेल त्याला शिक्षण असे धोरणलागू करून सामान्य जनतेला शिक्षण, आरोग्य सारख्या गरजांपासून वंचित ठेवलं आहे जे आज आपल्या मुलांच्या जीवावर बेतत आहे.या विरोधात जोरदार संघर्ष उभा करूनच विद्यार्थ्यांना खरा न्याय देता येईल. सरकारी तिकडम बाजीवर विश्वास न ठेवता, जोवर मागण्या पुर्ण होत नाहीत तोवर निरंतर आंदोलन करण्याची गरज आहे.

**‘कामगार बिगुल’ ची वेबसाइट**
www.marathi.mazdoorbigul.net
**फेसबुक पेज**
www.facebook.com/kamgarbigul



**बुर्झ्वा वृत्तपत्रे भांडवलाच्या विशाल ढिगांच्या बळावर चालतात, कामगारांची वृत्तपत्रे स्वत: कामगारांनी गोळा केलेल्या पैशावर चालतात.**
**लेनिन**

सहकाऱ्यांनो

‘कामगार बिगुल’ आपले स्वतःचे वृत्तपत्र आहे. हे वृत्तपत्र अधिक चांगले बनवण्यासाठी आपल्या सूचनांचे आम्ही स्वागत करतो. त्याच बरोबर आपण जर देशभरातील कामगारांपर्यंत आपल्या कारखान्यातील, ऑफिस मधील परिस्थिती, मालक वर्गाकडून केली जाणारी लुट, संसदीय राजकीय पक्षांचा श्रीमंत धार्जिणेपणा, पोलिस व मालकांच्या खाजगी गुंडांकडून केले जाणारे अत्याचार, तुमच्या रहिवासी वस्त्यांमधील खराब परिस्थिती, शिक्षण, आरोग्य यांसारख्या सुविधांचा अभाव इत्यादी विषयी आपली मतं पोहचवू इच्छित असाल तर आम्हाला आपले लेख किंवा प्रतिक्रिया पाठवू शकता. आपण आम्हाला खालील पत्त्यावर पत्र पाठवू शकता किंवा फोन करून सुद्धा संपर्क साधू शकता.

• रूम नंबर १०३, बिल्डिंग नंबर ६१, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई ४०००४३ मो. नं. ९६१९०३९७९३, ९१४५३३२८४९

• सोमनाथ, दिपनगर, केडगाव, अहमदनगर ४१४००५ मो. नं. ९१५६३२३९७६, ९६५७५९०४९१

## ‘कामगार बिगुल’चे स्वरूप, उद्देश आणि जबाबदाऱ्या

**1. ‘कामगार बिगुल’ व्यापक कष्टकरी जनतेमध्ये क्रांतिकारी राजकीय शिक्षक व प्रचारकाची भूमिका पार पाडेल. हे वृत्तपत्र कामगारांमध्ये क्रांतिकारी वैज्ञानिक विचारधारेचा प्रचार करेल आणि खऱ्याखुऱ्या सर्वहारा संस्कृतीचा वाहक बनेल. हे वृत्तपत्र जगभरातील क्रांतींचा इतिहास आणि त्यांच्यातून घ्यावयाचे शिक्षण, आपल्या देशातील वर्ग संघर्ष, कामगार चळवळीचा इतिहास आणि त्यातून घ्यावयाचे धडे यांच्याशी कामगार वर्गाला परिचित करेल. त्याच बरोबर समस्त भांडवली अफवा-दुष्प्रचारांचा भांडाफोड करेल.**

**2. ‘कामगार बिगुल’ भारतीय क्रांतीचे स्वरूप, मार्ग आणि समस्यांविषयी क्रांतिकारी कम्युनिस्टांमध्ये चालणाऱ्या विविध चर्चा नियमित रुपात छापेल आणि देश-विदेशातील राजकीय घटना आणि आर्थिक परिस्थितीचे योग्य विश्लेषण मांडून कामगार वर्गाला शिक्षित करण्याचे काम करेल.**

**3. ‘कामगार बिगुल’ स्वतः अश्या चर्चा चालवेल जेणे करून कामगारांचे राजकीय शिक्षण होईल. तसेच त्यांच्यामध्ये योग्य लाइनची समज विकसित होऊन ते क्रांतिकारी पार्टी बनवण्याच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ शकतील आणि त्यातून व्यवहारामध्ये योग्य लाइनच्या सत्यापनाचा आधार तयार होऊ शकेल.**

**4. ‘कामगार बिगुल’ कामगार वर्गामध्ये राजकीय प्रचार आणि शिक्षणाचे कार्य चालवत सर्वहारा क्रांतीच्या ऐतिहासिक जबाबदारीशी त्याला परिचित करेल, त्याला आर्थिक संघर्षांसोबतच त्याच्या राजकीय अधिकारांसाठी लढायला शिकवेल, चार आणे-आठ आण्याच्या किरकोळ आर्थिक लढायांमध्ये कामगारांना अडकावून टाकणाऱ्या नकली कम्युनिस्टांपासून आणि भांडवली राजकीय पक्षांचे शेपूट असलेल्या किंवा व्यक्तिवादी-अराजकतावादी ट्रेड युनियन्स पासून सावध करत त्याला हरतऱ्हेच्या अर्थवाद व सुधारवादाविरुद्ध लढायला शिकवेल, त्याच बरोबर त्याच्यात सच्ची क्रांतिकारी चेतना निर्माण करेल. ‘कामगार बिगुल’ सर्वहारा वर्गाच्या फळ्यांमधून क्रांतीकारकांची भरती करण्याच्या कामात सहाय्यक बनेल.**

**5. ‘कामगार बिगुल’ हे वृत्तपत्र कामगार वर्गाचा क्रांतिकारी शिक्षक, प्रचारक आणि आवाहनकर्ता ह्या भूमिकांबरोबरच क्रांतिकारी संघटनकर्ता व आंदोलनकर्त्याची भूमिका सुद्धा पार पाडेल.**


# कामगार बिगुल

खाजगी वितरणासाठी

संपादक मंडळ : सोमनाथ केंजळे, सत्यनारायण

संपादकीय कार्यालय : रुम नंबर १०३, बिल्डिंग नंबर ६१, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई ४०००४३

संपर्क : ९१५६३२३९७६, ९६१९०३९७९३

ईमेल : bigulakhbar@gmail.com

सहयोग राशी : रु. ५ (एका अंकासाठी)
वार्षिक - रु. १०० (टपाल शुल्कासह)

# दिल्लीच्या अंगणवाडी महिला कर्मचाऱ्यांच्या लढाऊ संघर्षाचा विजयी समारोप

जवळपास ५८ दिवसांपासून सुरु असलेल्या अंगणवाडी महिला कर्मचाऱ्यांच्या संपाचा विजयी समारोप झाला. आपल्या विविध मागण्यांसाठी दिवस, रात्र, उन, वारा, पाऊस या कशाचीही तमा न बाळगता ५८ दिवसांपासून संघर्ष करत असलेल्या 'दिल्ली स्टेट अंगणवाडी वर्कर्स अँड हेल्पर्स युनियन'च्या संघर्षासमोर केजरीवाल सरकार झुकले आणि विना अट युनियनच्या मागणीनुसार दि. २३ ऑगस्ट रोजी रात्री राजपत्र काढून सगळ्या मागण्या मान्य केल्या. या बातमीमुळे अंगणवाडीच्या महिलांना खूपच आनंद झाला. दुसऱ्या दिवशी सकाळी ९ वाजल्यापासूनच केजरीवालांच्या घरासमोर महिलांची गर्दी होऊ लागली. पुढे दुपारी एक वाजता 'अंगणवाडी वर्कर्स अँड हेल्पर्स युनियन'च्या बॅनरखाली ८००० महिलांनी ढोल ताश्या वाजवत विजय रॅली काढून आनंद साजरा केला

### संपाची पार्श्वभूमी

आजच्या या महागाईच्या दिवसात जर तुमचा पगार फक्त २५०० आणि ५००० असेल आणि तो सुद्धा दिल्ली सारख्या शहरात, तर तुम्ही एवढ्या पगारावर गुजराण करू शकाल का? नाही नक्कीच नाही! त्यासाठी तुम्ही काय कराल? जो पगार मिळतोय त्यावर समाधान मानून गप्प बसाल कि संघर्ष कराल? उत्तर साधं सरळ आहे कि संघर्ष कराल. म्हणून अंगणवाडीच्या महिला कर्मचाऱ्यांनी संघर्ष सुरु केला.

'दिल्ली स्टेट अंगणवाडी वर्कर्स अँड हेल्पर्स युनियन'च्या नेतृत्वात २०१५ मध्ये २३ दिवस अंगणवाडीच्या महिला संपावर गेल्या होत्या आणि संप जिंकला देखील होता. त्यावेळी स्वतः दिल्लीचे मुखमंत्री केजरीवाल यांनी युनियनला लिहून दिले होते कि तुमच्या सगळ्या मागण्या मान्य करत आहोत. पण केजरीवालांचे हे लिखित आश्वासन कागदावरच राहिले; ते पूर्ण झाले नाही. म्हणून २०१५ पासून पुढील दोन वर्षात युनियनच्या बॅनरखाली कधी दिल्ली सचिवालय तर कधी केजरीवाल यांच्या घरासमोर निदर्शने केली गेली. पण त्यांचा काही एक उपयोग झाला नाही. केजरीवाल सरकारने याकडे सपशेल दुर्लक्ष केले. म्हणून आंदोलन तीव्र करण्यासाठी युनियनच्या नेतृत्वामध्ये अंगणवाडीच्या महिलांनी निर्णय घेऊन दिल्लीतील पालिका निवडणुकीत 'आम आदमी पार्टीचा' बहिष्कार केला. याचा परिणाम असा झाला की पालिका निवडणुकीत 'आम आदमी पार्टी' हारली. हे एकच कारण नसले तरीही या बहिष्काराचा प्रभाव राहिला हे नक्की. त्यानंतर मात्र केजरीवाल सरकारने सुडाचे राजकारण खेळायला सुरुवात केली. त्याचाच एक भाग म्हणुन दिल्लीचे उपमुख्यमंत्री मनिष सिसोदिया, ज्यांच्याकडे शिक्षण खाते आणि महिला व बाल विकास खाते सुद्धा आहे आणि ज्यांनी कधीही दिल्लीतील सोई-सुविधांपासून वंचित असलेल्या सरकारी शाळांची पाहणी केली नाही, त्यांनी वेगवेगळ्या अंगणवाड्यांमध्ये जाऊन निरीक्षण मात्र चालू केले. तिथे त्यांनी खराब जेवण, मुले अंगणवाडीत न येणे, रजिस्टरमध्ये खोट्या नोंदी इ. कारणांमुळे डबघाईला आलेल्या अंगणवाड्यांसाठी गरीब कार्यकर्त्या व सहाय्यक महीलांना जबाबदार धरुन तीन कार्यकर्त्या व तीन सेविकांना बडतर्फ करण्याचा आदेश काढला. पण खरे तर अंगणवाडीमधील खराब जेवणासाठी किंवा घोटाळ्यासाठी त्या एन.जी.ओ.ला जबाबदार धरले पाहिजे ज्यांना जेवण पुरविण्याचे टेंडर मिळाले आहे. या एनजीओंचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संबंध 'आम आदमी पार्टी'शी जोडल्या गेलेल्या 'कबीर' आणि 'परिवर्तन'शी आहे. आपल्याच लोकांद्वारे केलेल्या घोटाळ्यांसाठी मनिष सिसोदिया अंगणवाडीच्या महीला कर्मचाऱ्यांना जबाबदार धरुन बडतर्फ आणि बदनाम करण्याचे काम करत आहेत. राहिला प्रश्न रजिस्टरमधील खोट्या नोंदीचा तर त्याला जबाबदार सुपरवाईजर आणि सीडीपीओ आहेत. ते महीला कर्मचाऱ्यांवर दबाव टाकून रजिस्टर मध्ये खोट्या नोंदी करण्यास प्रवृत्त करतात. त्यांच्यावर मात्र कोणतीही कारवाई सरकार करत नाही. सरकार जाणून बुजून अंगणवाड्यांना बरबाद करत आहे, दुसरीकडे प्लेस्कूल्स ला परवानगी देत आहे आणि यासाठी मनिष सिसोदिया गरीब कामगार आणि मदतनीसांना जबाबदार ठरवत आहे. ठेकेदार, प्रॉपर्टी डिलर्स, व्यापारी कारखानदारांची तळी उचलणाऱ्या पक्षाचे हेच चरित्र आहे.

केजरीवाल सरकारच्या या धोरणामुळे अंगणवाडी महिला कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी होती. गेल्या दोन वर्षापासून केजरीवाल सरकार मागण्या मान्य करण्यास टाळाटाळ करत असल्यामुळे एका मोठ्या आंदोलनाची तयारी करण्याचे ठरवले गेले. याचाच एक भाग म्हणून दिल्ली 'स्टेट अंगणवाडी वर्कर्स एंड हेल्पर्स यूनियन' ने दि. २४ जून रोजी एक दिवसीय इशारा आंदोलन केले. अंगणवाडीच्या बहुतेक महिला या निदर्शनात सामील झाल्या होत्या, त्यामुळे लगेलग मनीष सिसोदियांच्या ओएसडीने युनियनच्या प्रतिनीधी मंडळास चर्चा करण्यास बोलवले. ही तारीख होती २७ जून .

### प्रत्यक्ष संपाला सुरुवात

२७ जूनला बहुसंख्येने महिला मनीषा सिसोदियांच्या बंगल्यावर पोहचल्या (खरे तर निवडणुकी अगोदर बंगला, गाडी, सुरक्षा अशा सरकारी सेवा घेणार नाही अशी घोषणा 'आम आदमी पार्टी'च्या नेत्यांनी केली होती). सुरुवातीला पोलिसांनी आत जाण्यास मज्जाव केला, परंतु महिलांच्या दबावापुढे झुकते घेत पाच महिलांसह युनियनच्या अध्यक्षा शिवानी कौल यांना आत जाण्यास परवानगी दिली. पण इथे काही तोडगा निघू शकला नाही. पुढे युनियनने २८ जून पासुन संपावर जाण्याची घोषणा केली. म्हणजेच २८ जूनपासुन अंगणवाडी सेंटर पुर्णत: बंद ठेवणे, त्याच बरोबर ३० जून रोजी दिल्ली सचिवालयावर विराट मोर्चा काढण्याचे देखील ठरवले गेले. आता हे आंदोलन मोठे होतेय याचा अंदाज येताच केजरीवाल सरकार हादरले आणि आंदोलन संपविण्याचे प्रयत्न करु लागले. त्याचाच एक भाग म्हणून वेगवेगळ्या दलाल युनियन, धार्मिक कट्टरवादी संघटना व आम आदमी पार्टीच्या पाठीराख्यांनी आंदोलनाला समर्थन देण्याच्या नावाखाली आंदोलन संपविण्याचे प्रयत्न केले. परंतु युनियनने अशा संघटनांकडून समर्थन घेण्यास साफ नकार दिला. ३० जून रोजी जवळपास १०,००० महिलांनी मोर्चात भाग घेतला. तेथेच युनियने निर्णय घेतला की मुख्यमंत्री स्वत: आम्हाला भेटायला येऊन आमच्या सर्व मागण्या मान्य करत आहेत असे जोपर्यंत सांगत नाही तोपर्यंत इथुन हलणार नाही आणि वेळच आली तर रिंग रोड जाम केला जाईल. मुख्यमंत्री किंवा सरकारचा कोणताही प्रतिनिधी भेटण्यास तयार झाला नाही. त्याला उत्तर म्हणून महिलांनी चार तास रिंग रोड जाम केला. त्यानंतर सर्वसंमतीने युनियने ठरवले की येणाऱ्या ३ जुलैपासुन मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या बंगल्या समोर अनिश्चितकालीन धरणे आंदोलन केले जाईल. तसेच १ व २ जुलै रोजी महिला आपापल्या भागातील आमदारांना घेराव घालतील आणि तसेच केले गेले. आमदारांना घेराव घालण्याचा कार्यक्रम जबरदस्त यशस्वी झाला. पुढे ३ जुलै रोजी बहुसंख्येने अंगणवाडी महिला केजरीवालच्या घरासमोर पोहचल्या. लगेच मुख्यमंत्र्यांनी प्रतिनिधी मंडळाशी चर्चा करण्याची तयारी दाखवली परंतु पाच सदस्यीय प्रतिनिधी मंडळात युनियनची अध्यक्ष

पान ४ वर

**त्या लढल्या! त्या जिंकल्या!**

### घटना क्रम

१) पहिल्यांदा २०१५ रोजी अंगणवाडीच्या महिला कर्मचारी संपावर गेल्या. तो संप २३ दिवस चालला.

२) जवळपास दोन वर्षे वाट बघून देखील आपल्या मागण्या मान्य होत नाहीत असे दिसताच पुन्हा दिल्ली स्टेट अंगणवाडी वर्कर्स अँड हेल्पर्स युनियनच्या नेतृत्वात दि २८ जून २०१७ रोजी संपाची घोषणा केली.

३) ३० जून रोजी दिल्ली सचिवालयावर १० हजार महिलांनी मोर्चा काढला. १ व २ जुलै रोजी महिलांनी ठरल्याप्रमाणे आम आदमी पक्षाच्या आमदारांना घेराव घातला व ३ जुलै रोजी हजारो महिलांनी केजरीवाल यांच्या घरासमोर धरणे आंदोलन केले . त्याचवेळी २५ सदस्यीय समितीची स्थापना करण्यात आली.

४) दि. ६ जुलैपासून अंगणवाडीच्या महिला कर्मचाऱ्यांनी साखळी उपोषणाला सुरुवात केली.

५) ५ जुलै रोजी एका नकली युनियनचा आधार घेऊन दिल्लीच्या उपमुख्यमंत्र्यांनी संप मिटल्याची आणि मागण्या मान्य केल्याची घोषणा केली.

६) १५ जुलै रोजी दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांनी आपल्या काही समर्थकांसमवेत घोषणा केली कि लवकरच अंगणवाडी महिला कर्मचाऱ्यांचा पगार वाढविण्यात येईल.

७) १७ जुलै रोजी दिल्ली स्टेट अंगणवाडी वर्कर्स अँड हेल्पर्स युनियनने एक पत्रकार परिषद घेतली.

८) २१ जुलै पासून बवाना पोटनिवडणुकीत आम आदमी पक्षाच्या सरकार विरोधात बहिष्कार अभियानाला सुरवात केली.

९) २२ जुलै रोजी केजरीवाल यांनी आपल्या ट्विटर हॅण्डल वरून कामगारांचा पगार ९६७८ रु. आणि मदतनीसांचा पगार ४८३९ रु. केला जाईल अशी घोषणा केली. दि २४ जुलै रोजी दिल्ली स्टेट अंगणवाडी वर्कर्स अँड हेल्पर्स युनियनच्या नेतृत्वात हजारो अंगणवाडी महिला कर्मचाऱ्यांनी रामलीला ते जंतर मंतर पर्यंत महारॅलीचे आयोजन केले ज्यामध्ये १०,००० ते १२,००० महिलांनी आपला सहभाग नोंदवला . तिथेच एक पत्रकार परिषद घेऊन आपले म्हणणे मांडले.

१०) ऑगस्टच्या सुरुवातीला केजरीवाल सरकारने अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या पगार वाढीच्या निर्णयाची जबाबदारी उपराज्यपाल व निवडणुक आयोगावर ढकलली.

११) ४ ऑगस्ट रोजी अंगणवाडी आक्रोश रॅलीचे आयोजन केले गेले.

१२) ११ ऑगस्ट रोजी सिव्हिल लाईन्स ते विधान भवन पर्यंत रॅली काढून दिल्ली विधान सभेला घेराव घालण्यात आला.

१३) २३ ऑगस्ट रोजी रात्री ९ वाजता दिल्ली सरकारने राजपत्र काढून युनियनच्या मागणी नुसार सगळ्या मागण्या मान्य केल्या.

१४) २४ ऑगस्ट २०१७ रोजी जवळपास ५८ दिवस चाललेल्या संपाचा विजयी समारोप केला गेला.








# दिल्लीच्या अंगणवाडी महिला कर्मचाऱ्यांच्या लढाऊ संघर्षाचा विजयी समारोप

पान ३ वरून

शिवानी आहे हे समजताच सांगितले गेले की केजरीवाल युनियनशी बोलणार नाहीत. त्यामुळे तिथे कोणतीच चर्चा झाली नाही. प्रतिनिधी मंडळाने ठरविले की चर्चा युनियनच्या नेतृत्वाशिवाय होणार नाही आणि शपथ घेतली की संपाला अजून व्यापक केले जाईल. तेव्हापासून अंगणवाडी महिलांनी संप सुरुच ठेवला आणि ६ जुलै पासुन 'चक्री उपोषणा'ला सुद्धा बसल्या. केजरीवाल-सिसोदिया युनियनशी बोलायला टाळत होते त्याचे कारण म्हणजे त्यांना दोन वर्षापुर्वी जे लेखी आश्वासन दिले ते त्यांनी पाळले नव्हते. त्यावर युनियन बोलणार हे यांना चांगलेच माहिती होते. ३ जुलै रोजीच संपाला संचलित करण्यासाठी २५ सदस्यीय समितीची स्थापना करण्यात आली. **त्यामुळे सामुहीक आणि लोकशाही मार्गाने निर्णय घेतला जाऊ लागला.** त्याच बरोबर स्ट्राईक फंड तयार करण्याचा देखील निर्णय घेतला गेला. संप १०० टक्के यशस्वी करण्यासाठी महिलांचीच पिकेटींग टिम आणि संपकरी गट तयार केले. संप यशस्वी होण्यात याचा खुप फायदा झाला. संपकारी गटांच्या महिलांनी प्रचंड साहस आणि धैर्य दाखवले. त्याच बरोबर संपाच्यावेळी अनेक महिलांनी गाणी, कविता लिहिल्या. या पध्दतीने कष्टकरी महिलांमधील सर्जनशीलतेचे काही बिंदु समोर आले. त्याच बरोबर युनियन मार्फत दिल्लीतील सर्वसामान्यांच्या नावे पत्रक काढून बसमध्ये, वस्त्यांमध्ये व्यापक अभियान देखील चालवले गेले.



### संप तोडण्यासाठी दलाल युनियन केजरीवालसोबत

जेव्हा दिल्ली अंगणवाडी महिलांचा हा लढाऊ संप संपुर्ण दिल्ली मध्ये पसरतोय असे लक्षात आले तसेच दिल्लीतील जवळपास सर्व अंगणवाड्यांची कामे ठप्प झाली तेव्हापासुन मध्यस्थ, दलाल आणि कामगारांबरोबर वेळोवेळी गद्दारीचे रेकॉर्ड करणाऱ्या अनेक युनियन केजरीवालांना मदत करु लागल्या.

दलाल युनियन्समध्ये सगळ्यात अग्रणी नाव सीटूच्या कमलावाली युनियनचे आहे. यांचा इतिहासच कामगारांशी गद्दारीचा आहे. बंगालपासून ते केरळपर्यंत यांच्या पक्षाने कामगारांवर गोळ्या घालण्याचे काम केले आहे. यांच्या या युनियनने प्रत्येक पद्धतीने हा संप तोडण्याचा प्रयत्न केला, पण अंगणवाडीच्या महिलांनी त्यांना यशस्वी होऊ दिले नाही. याअगोदर म्हणजेच २०१५च्या संपात सुद्धा कमला आली होती पण महिलांनी तिला पिटाळुन लावले होते. या संपात अनेक मार्ग वापरुन सुध्दा काही होत नाही म्हटल्यावर सीटूने आपले नाव बदलुन 'स्वतंत्र अंगणवाडी कर्मचारी आणि सहायिका संघ' नावाने पत्रक काढले आणि महिलांमध्ये भ्रम पसरविण्याचे काम केले. एवढेच नाही तर कमला सिसोदीयांना सुद्धा भेटायला गेली होती. यावरुन हेच दिसते की येनकेन प्रकारेण संप तोडण्याचेच काम सीटू करत होती. असाच अजून एक दलाल रामकरण आहे जो २०१५ मधील अंगणवाडी बरोबर सुरु झालेले आशा वर्कर्सचे आंदोलन संपवण्यास जबाबदार होता. या रामकरणने देखील हा संप तोडण्याचा खूप प्रयत्न केला. त्याने सरळ सरळ अंगणवाडीच्या महिलांना आवाहन केले की जर तुम्ही 'दिल्ली स्टेट अंगणवाडी वर्कर्स अण्ड हेल्पर्स युनियन'ला सोडून माझ्याकडे याल तर मी केजरीवाल सोबत चर्चा करुन तोडगा काढीन आणि तुमच्या सगळ्या मागण्या पूर्ण करुन देईन. त्याच बरोबर तो खोटा प्रचार करत होता की 'शिवानी' मुळेच तुमच्या मागण्या पूर्ण होत नाहीत. पण त्याला सुद्धा अंगणवाडीच्या महिलांनी सडेतोड उत्तर देऊन पळवून लावले. विचार करण्यासारखे आहे की केजरीवाल आणि सिसोदिया अन्य युनियनशी चर्चा करण्यास तयार होतात पण अंगणवाडीच्या महिलांच्या युनियनशी म्हणजेच दिल्ली स्टेट अंगणवाडी वर्कर्स अण्ड हेल्पर्स युनियनशी अजिबात बोलायला तयार होत नाहीत. सिसोदियाने ५ जुलैला सुपरवायझर आणि सिपीडीओ सुध्दा सामिल असलेल्या 'दिल्ली अंगणवाडी वर्कर्स अन्ड हेल्पर्स असोशिएशन या बोगस युनियनला सोबत घेऊन संप मिटल्याची आणि पगार वाढीची घोषणा देखील करुन टाकली. यावरुनच आपण आम आदमी पार्टीचे चरित्र काय आहे हे समजू शकतो. पण याचा अंगणवाडीच्या महिलांवर काही एक परिणाम झाला नाही. उलट संप संपविण्याचे सोडाच तो आणखी व्यापक आणि मजबूत झाला. यानंतर पुढे १५ जुलै ला पुन्हा केजरीवालने घोषणा केली की लवकरच पगार वाढवला जाईल. ही सुध्दा खोटीच घोषणा होती. याला उत्तर देण्यासाठी अंगणवाडीच्या महिलांनी संपाच्या स्थळावर एक मोठी पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत युनियनच्या अध्यक्षा शिवानी यांनी केजरीवाल सरकारचा खरा चेहरा समोर आणला. त्याचबरोबर आयसीडीएस स्किम (एकात्मिक बाल विकास योजना) मधील केजरीवाल सरकार आणि त्यांचा पक्षाशी जोडलेल्या एनजीओच्या भ्रष्टाचाराला समोर आणले. पुढे युनियनच्या नेतृत्वात अंगणवाडी महिलांनी आपला संप चालूच ठेवला. वेगवेगळ्या पध्दतीने आंदोलन करून, मोर्चे काढून अंगणवाडीच्या महिला कर्मचाऱ्यांनी केजरीवाल सरकारला सळो की पळो करुन टाकले. म्हणूनच कधी ट्विटर वरुन पगार वाढीची घोषणा करायची तर कधी चर्चा करायला युनियनला बोलावायचं आणि चर्चा न करता टाळाटाळ करायची असले उद्योग निष्फळ ठरल्यावर केजरीवाल सरकारने पगारवाढीची जबाबदारी सरळ सरळ उपराज्यपाल व निवडणूक आयोगावर ढकलली. तसे पाहिले तर यांचा काहीही संबंध नसताना अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य करण्यास केजरीवाल सरकार टाळाटाळ करत होते. आपल्या मागण्या मान्य करण्यासाठी अंगणवाडीच्या महिलांनी केजरीवालच्या घरासमोर दिल्ली विधान सभेला समांतर अशी दुसरी सभा चालवली. त्यामध्ये एकूण पाच प्रस्ताव मंजूर करण्यात आले.

प्रस्ताव पुढीलप्रमाणे:

1. बवानामध्ये राहत असलेल्या अंगणवाडी कार्यकर्त्या आणि त्यांचे परिवार २३ ऑगस्टला तेथे होणाऱ्या पोट निवडणूकीत आम आदमी पक्षावर बहिष्कार टाकतील.
2. जर अंगणवाडी महिला कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य केल्या नाहीत तर येणाऱ्या २०२० मधील दिल्ली विधान सभेच्या निवडणुकीवर बहिष्कार टाकला जाईल.
3. केजरीवाल सरकारद्वारा आयोजित सर्व कार्यक्रमांवर अंगणवाडीच्या महिला बहिष्कार करतील.
4. केजरीवाल सरकारच्या कामगार विरोधी धोरणांना दिल्लीच्या जनतेपर्यंत व्यापक अभियाना मार्फत पोहचवले जाईल.
5. आयसीडीएस स्कीम मधील दिल्ली सरकारद्वारा केलेल्या घोटाळ्या संदर्भात 'भ्रष्टाचार प्रतिबंधक शाखे'मध्ये तक्रार केली जाइल. त्याबरोबरच दिल्ली हायकोर्टात जनहित याचिका सुद्धा दाखल केली जाइल.

जवळपास दोन महिन्यांच्या प्रदीर्घ आणि लढाऊ संपाच्या दरम्यान काही सांस्कृतिक कार्यक्रमांचे सुद्धा आयोजन केले गेले. त्यामध्ये निशांत नाट्य मंच, संगवारी, हसरते इ. गटांनी भाग घेतला आणि अंगणवाडीच्या महिलांचा उत्साह वाढविला. संपादरम्यान काही दुःखद घटनादेखील झाल्या. एका महिलेची तब्येत खराब झाल्यामुळे तिचा मृत्यू झाला. तेव्हा युनियनने त्या महिलेच्या परिवाराला भेटून शोक व्यक्त केला, तसेच स्ट्राईक फण्डातून मदत देण्याचा निर्णय सुद्धा घेतला.

३ सप्टेंबर रोजी दिल्ली येथील आंबेडकर भवनात जात पात तोडण्यासाठी सामूहिक भोजनाचा कार्यक्रम आयोजित केला. त्याचबरोबर मोदी सरकार व केजरीवाल सरकार यांच्या धोरणावर चर्चा देखील करण्यात आली. पुढे जोपर्यंत अंगणवाडी महिला कर्मचाऱ्यांना सरकारी नियमानुसार कर्मचाऱ्यांचा दर्जा दिला जात नाही तोपर्यंत लढा चालूच राहणार आहे. या कार्यक्रमाची सांगता सांस्कृतिक कार्यक्रमाने झाली.

### आंदोलनाकडून मिळालेला दृष्टीकोन

या संपाच्या विजयाने हे सिद्ध केलंय कि कोणताही दुरूस्तीवादी डाव्या पक्ष आणि त्याच्या ट्रेड युनियनशिवाय तसेच अन्य राजकीय पक्ष यांच्या सहभाग व सहयोगाशिवाय सुध्दा कामगार योग्य राजकीय कार्यदिशा व योग्य राजकीय नेतृत्वासह मोठ्यातील मोठ्या सरकारला हरवले जाऊ शकते. या संघर्षाने हे दाखवून दिले. आम आदमी पार्टी आणि त्याच्या नेत्यांच्या आडमुठेपणामुळेच दिल्लीतील सामान्य गरीब जनता आणि अंगणवाडीच्या २२००० हजार महिला कर्मचाऱ्यांना या संघर्षा दरम्यान अनेक अडचणींचा सामना करावा लागला.

अंगणवाडी मध्ये ठेकेदारी पध्दतीने काम करत असलेल्या महिला सुपरवायजर यांनी सुध्दा या संपाकडून एक दृष्टीकोन मिळाला. म्हणूनच त्यांनी युनियनशीसंपर्क करून सांगितले आहे कि'दिल्ली स्टेट अंगणवाडी वर्कर्स अंड हेल्पर्स' च्या अंतर्गत आमच्या मागण्या सुध्दा उचला. युनियनच्या नेतृत्वात शाळेचे वर्ग भरविण्याचे निश्चित करण्यात आले आहे. यामध्ये कामगारांचे शोषण आणि दमन तसेच पितृसत्तेच्या बाबत महिलांना शिक्षित-प्रशिक्षित केले जाईल. आपल्याला संघर्षाकडे बघून हे देखील लक्षात येत कि स्वतंत्र ट्रेड युनियन मध्ये नेतृत्व विकसित करण्याचा एक मार्ग आहे. तो म्हणजे ट्रेड युनियनमध्ये लोकशाहीला प्राधान्य दिले पाहिजे. 'दिल्ली स्टेट अंगणवाडी वर्कर्स अंड हेल्पर्स युनियने' एक चांगली सुरुवात केली आहे. हे एक पुढे जाणारे पहिले पाऊल आहे. पण आपल्याला आपल्या कमजोऱ्यांवर सुध्दा ध्यान दिले पाहिजे. आपल्या ट्रेड युनियनमध्ये प्राणसंचार विकसित करण्याचा प्रश्न सरळ सरळ युनियनमधल्या लोकशाहीशी जोडला गेला आहे.

त्यामध्ये स्वत: कामगारांनी पुढाकार घेण्यासाठी पुढे येऊन निर्णय घेण्यामध्ये सामान्य कामगारांची भागीदारी सुनिश्चित केली पाहिजे. नियमित सर्वसमावेशक सभा आणि वेळेवर निवडणुका झाल्या पाहिजेत. हा देखील महत्वाचा प्रश्न आहे. या प्रश्नाकडे ध्यान देऊन उपरोक्त पध्दतीने जर काम केले तर कामगार नेतृत्वाला भ्रष्ट ,एकाधिकारशहा व कामगार हितांचा सौदेबाज होण्यापासुन रोखले जाऊ शकते. त्यासाठी युनियनच्या सदस्यांना फक्त देणग्या देणारे निष्क्रिय सदस्य न राहता आपल्या ट्रेड युनियन अधिकारांसाठी सामुहिक संघर्ष केला पाहिजे. या ५८ दिवसीय लढाऊ संपाने कोणतीही तडजोड न करता एक अभूतपूर्व विजय संपादन केला.

---

एवढे वास्तविक वर्तमानपत्र जनमानसांमध्ये पोहचविल्याबद्दल सर्व प्रथम तर बिगुल टीमचे अभिनंदन करतो. मला वाचन करण्याची आवड आहे. बिगुल अभियानात 'बिगुल'शी परिचय झाला. माझ्या विभागातील मुलांना वाचण्याची जवळ जवळ आवड नाही. वर्तमानपत्रे तर मुले बिलकुलच वाचत नाहीत. कारण योग्य, खऱ्या, वास्तविक बातम्या देणारे वर्तमानपत्रचं दिसत नाही. बहुतेक वर्तमानपत्र तर जाहिरात पत्रच असतात. सर्व सामान्य जनतेच्या बातम्या कामगारांचे मुद्दे यांचा इतर वर्तमानपत्रांशी संबंधच येत नाही. असे बहुतेक वेळी वाचताना लक्षात येते. मी'कामगार बिगुल'चा नियमित वाचक आहे. महत्वाचे म्हणजे सर्व सामान्य जनतेशी नाळ जोडलेले हे वर्तमानपत्र आहे. बिगुल जनतेचे वर्तमानपत्र आहे. तसेच तो कामगारांच्या जीवनाचा परिस्थितिचे विश्लेषक आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे बिगुल शिक्षक आहे. म्हणूनच सध्याच्या पिढीने बिगुल वाचलाच पाहिजे. अपेक्षा फक्त एवढीच आहे कि बिगुल नियमित प्रकाशित झाला पाहिजे. पुन्हा एकदा बिगुल टीमचे मनपूर्वक आभार.

**इंकलाबी सलाम**

**अनिल साठे, साठे नगर, मानखुर्द**

### बलात्कारी बाबा रामरहीमला २० वर्षांची शिक्षा

# मुद्दा फक्त 'ढोंगी' बाबांचा नाही

सोमनाथ केंजळे

नुकतचं २८ ऑगस्टला गुरमीत रामरहीमला विशेष सी.बी.आय. कोर्टाने २० वर्षांची शिक्षा ठोठावली. या 'पापा'जीवर २ मुलींवर बलात्काराचा गुन्हा सिद्ध झालाय, तर ३०० पुरुषांना नपुंसक केल्याचा आरोप सुद्धा आहे.

हे ऐकून अनेकांनी 'ढोंगी बाबाला' त्याच्या दुष्कृत्याची शिक्षा मिळाली, असं म्हणत सुस्कारे सोडले असतील तर काहींनी आपला बाबा त्यातला नाही म्हणत मनाचं समाधान करं आस्था किंवा संस्कार चैनल लावला सुद्धा असेल. अनेक तथाकथित पुरोगाम्यांचा सुद्धा बोटचेपी भूमिका घेत ढोंगी बाबाच्या नावानं सोपस्काराचा शिमगा करून झाला असेल व त्यांच्या ढोंगीपणावर बोटं सुद्धा मोडली असतील. मुद्दा फक्त कुण्या ढोंगी बाबाचा नाहीच तर एकुणच या बाबा संस्कृतीच्या वाढत्या प्रभावाचा व त्यातून निर्माण होणाऱ्या अंधाराच्या साम्राज्याचा आहे.

बाबा किंवा मातांच्या साधना मार्गात चिकीत्सा, संशय किंवा तर्क पूर्णपणे हद्दपार असतात. बाबा उच्चारेल तेच वाक्य प्रमाण मानायचं शिकवलं जातं. शंका उपस्थित करणं महापाप समजलं जातं, ज्याच्या परिणामी इप्सित साध्य होत नाही. **या बाबा-मातांकडे जाणाऱ्या लोकांचे प्रश्न अध्यात्मिक सुखाचा शोध वगरे अजिबात नसतात. लग्न, मुलं, नोकरी व आर्थिक अस्थैर्य इ. अगदी भौतिक प्रश्न असतात. यांची सोडवणूक करून घ्यायला प्रत्येकजण आतूर असतो. वाढती बेकारी, कामगारांची कपात, नोकरीतील अस्थैर्य, रोजगाराची अनिश्चितता, वाढतं दारिद्र्य त्यातून काठावर ढकललं गेलेलं जगणं, सावऱ्याची कुतरओढ, जीवघेणी स्पर्धा, अपेक्षांचं मोडून टाकणार ओझ या सगळ्यातून बेजार झालेला माणूस मग सहजच रस्त्यावर शेंदूर लावून दगड ठेवला तरी नवस-सायास बोलू लागतो. ही "असुरक्षितता व भीती" या सगळ्यांच्या मुळाशी घर करून असते. याची कारणं सामाजिक-आर्थिक-राजकीय व्यवस्थेत शोधण्याची सवय नसणारी माणसं कुणी गुरु-माता भेटलेच तर त्यांनाच आपला उद्धारकर्ता बनवतात व मुक्तीच्या आशावादाने सुखावली जातात, जे खरं तर भ्रांतसुख असतं.**

मग ही गर्दी वाट तुडवत निघते. अगोदरच करार झालेला असतो 'प्रश्न विचारायचे नसतात'. कुठे पवित्र पाणी पजून, कुठे झाडाचा पाला खाऊ घालून, कुठे हातात राख टाकून, तर कुठे पाठीवर रट्टे देऊन मुक्तीचा आशिर्वाद दिला जातो. या मार्केटमध्ये पैसे घेऊन कुंडलीनी जागृत करण्याऱ्यां पासून हठयोग्यांपर्यंत अनेक व्हरायटीचे बाबा भारतात सापडतील. यांच्या जोडीला कैक आश्रम, डेरे व आखाडयांमधून हजारो पुण्यात्मे ठाण मांडून बसलेले आहेतच. तरीही कुपोषण व भूकबळींनं मरणारी बालकं भारतातच सर्वाधिक आहेत. दारिद्र्यानं जनतेचे हाल आहेत, स्त्रीयां घराबाहेर सुरक्षित नाहीत. आतंकवादी हल्ल्यात माणसं मरतात तर चीन व पाकिस्तान सीमेवर "त्रास" देत असतो.

'बाबा वाक्यम् प्रमाणं' व 'श्रद्धावानम् लभते ज्ञानम्'चा जप करणाऱ्या भारतीय मानसात, लोकांच्या तर्कबुद्धीची अशी कत्तल केली जाते की बलात्काराचा गुन्हा असणारा आसाराम व रामरहीम साठी त्याचे गुंड अनुयायी जगातील "सर्वात मोठ्या लोकशाही" समोर अवघड प्रसंग उभा करतात. इतकंच नव्हे तर देशाचं अस्तित्वच मिटवण्याची भाषा केली जाते. बोलण्यावर निभावल तर बेहत्तर, पण प्रत्यक्ष सुनियोजित दंगल घडवली जाते व लोकशाहीच्या चारही खांबांची पळताभुई थोडी केली जाते. प्रसार माध्यमांची वाहने जाळतात, पोलिसांवर हल्ले होतात. या सगळ्यात ४५ माणसं मरतात, २५० हून अधिक जखमी होतात व हे सगळं धर्म आणि श्रद्धेच्या नावाखाली केलं जातं. एरवी पाच लोकं जमले तरी १४४ खाली अटक करणारे पोलीस २-३ लाख लोकांना ४-५ दिवस गोळा होण्याची संधी देतात. राज्यसरकार त्यांच्या खाण्यापिण्याची सोय करतं तरी, भारताच्या महान गुप्तचर यंत्रणेला हत्यारांचा सुगावा सुद्धा लागत नाही.

यापूर्वी सुद्धा बाबा रामपालला खुनाच्या गुन्ह्यात अटक करण्यासाठी पोलीसांची पाचावर धारण बसली होती. शेवटी ४,५०० लष्करी जवानांना ३० तासाहून अधिक काळ घाम गाळावा लागला. भक्तांशी तंडून पाच जणांच्या मृत्युचं ओझं घेऊन मगच बाबाला अटक करणं शक्य झालं. आसारामच्या गुलाबी चेहऱ्यामागचा हैवान उघडा होतो तरीही अनेक भक्त त्यांच्या भक्तीन लीन असतात. आशुतोष महाराजच्या मृत्युला समाधी समजून ३ वर्षे प्रेत सांभाळणाऱ्या भक्तांची पुनर्जिवीत होण्याची भाबडी आशा तोडायला कोर्टात जावं लागतं. बाबा काही जिवंत होत नाही हे वेगळं सांगायला नको. चारसोबीसी करणारा चंद्रास्वामी, अनेक रहस्यमय हत्यांमागचा संशयित सत्यसाईबाबा, बलात्कारी नित्यानंद-भीमानंद, संभोगात समाधी लावणारा रजनीश, श्रीमंताचा बाबा रवीशंकर, निर्मलबाबा, राधेमा, कृपालु महाराज, मोरारी बापू, सारथी बाबा, प्रेमानंद, बिंदू बाबा, नरेंद्र महाराज, आठवले महाराज ते हवा आतबाहेर करायला लावून नूडल्स विकणारा रामदेव बाबा, ही यादी अजून वाढू शकते, अशी अनेकजणं लोकांची मती बधीर करत आपला जनाधार व धर्मश्रद्धेच्या जोरावर राजकीय वलय निर्माण करताहेत, ज्यामुळे त्यांच्या व्यापाराला बाधा येणार नाही व त्यांचं हे काळोखाचं साम्राज्य विस्तारत जाईल. या साठी आपण गुरमीत रामरहीमचच उदाहरण पाहू.

हरियाणा व पंजाब मधे डेऱ्यांचं विशेष प्रस्थ आहे. डेऱ्याचा अर्थ 'घर'असा होतो. शीख धर्मातील अनेक अपप्रथांच्या विरोधात टीकात्मक सुर ठेवत अशी घरे निर्माण झाली जी मुलतः शीख धर्मांचंच आचरण या डेऱ्यामधून करत राहतात. मुख्य धार्मिक प्रवाहात ज्या अनेक लोकांना असमान वागणूक मिळते ते या डेऱ्यांचे अनुयायित्व स्विकारतात. प्रामुख्याने जातीच्या प्रादुर्भावाने जी उतरंड शीख धर्मात सुद्धा उतरली आहे तिच्या विरोधाचं संकिर्तण करणारेही डेरे आहेत ज्यांचा मुख्य आधार दलित शेतमजूरातून येतो. आज रोजी एका अन्दाजानुसार नुसत्या उत्तर भारतात असे तब्बल ३००० डेरे आहेत जे भिन्न भिन्न अध्यात्मिक भुमिकांचं प्रवचन करतात. अश्या अनेक "देवाच्या दुतां"मार्फत संदेश गोरगरीब जनतेपर्यंत पोहचवले जातात. त्यातील प्रमुख डेरे म्हणजे सच्चा सौदा, राधास्वामी, सचखन्ड बल्लन, निरन्कारी व नामधारी हे हरियाणा व जवळच्या राज्यातील खास डेरे होय. गेल्या कैक वर्षात या डेऱ्यांचही भांडवलीकरण झाले आहे. वस्तुंच्या उत्पादनापासुन ते विक्री पर्यंत सगळ्या गोष्टी या डेऱ्यामधे होतात. सोबत या डेऱ्यामधुन येणाऱ्या भक्तांसाठी भांडवली व्यवस्थेने महाग करून ठेवलेली आरोग्य सुविधा स्वस्तात उपलब्ध होते. अशा स्थितीत हे डेरे सत्तेची छोटी केंद्र बनून जातात. यातला 'मेसेन्जर ऑफ़ गॉड' जो अगोदरच उद्धारकर्ता बनलेला असतो त्याच्या हातात निरंकुश सत्ता केंद्रित होते. बाहेरच्या जगातील अतीव शोषण व धार्मिक-जातीय भेदभावाच्या विपरीत या डेऱ्यामधील प्रवचने, गुरु व परंपरांमध्ये लोकं मुक्तीचा मार्ग शोधु लागतात, कट्टर बनतात. प्रसंगी इतर डेऱ्यांशी माराकाटीचा संघर्षही होत असतो. डेऱ्याचं राजकारण न समजून घेता, रामरहीमच्या राजकीय प्रभावाची अन साम्राज्याची कल्पना येणार नाही.

सच्चा सौदा हा डेरा बलुचिस्तानच्या शाह मस्ताना यांनी १९४८ रोजी सिरसा, हरियाणा येथे सुरु केला होता. त्यांच्या मृत्यु नंतर शाह सतनामसिह हे १९९० पर्यन्त डेरा प्रमुख होते. त्या वेळी हा गुरमीत २३ वर्षांचा होता. त्याचा एक चुलत भाऊ खलिस्तानी आतंकवादी होता, ज्याचं नाव गुर्जन्तसिह राजस्थानी असे होते. असे म्हणतात कि गुरमीतला प्रमुखपदी बसवण्यात त्याच्या पिस्तुलाने महत्वाची भुमिका निभावली आहे. प्रपंच सोडुन डेरा प्रमुख झालेल्या गुरमीतने डेऱ्याचा विस्तार वाढवला. डेऱ्याचा कायापालट केला. एक साधा प्रवचनकार न राहता गुरमीत तंत्रज्ञानप्रेमी(टेक्नोसाव्वीवी) पॉपस्टार पापाजी बनला. त्यानं किरकोळ व्यापार केला, त्याच्या आंधळ्या अनुयायाना करोडो रुपयांच्या वस्तु विकल्या, १०० करोड खर्चुन स्वताला देवाच्या दुताच्या रुपानं प्रक्षेपीत करायला चित्रपटाची निर्मिती केली. इंटरनेटवर व्यापार सुद्धा केला. चंगळवादात फसलेल्या तरुणाईला तिचा मसिहा सापडला होता. भक्तांनी सुद्धा गुरमीतला डोक्यावर घेतलं. जवळपास ५ कोटी पेक्षा अधिक अनुयायी असणारा बाबा गुरमीत रामरहीम इन्सा ज्या गुहेत राहत होता तिथं त्याच्या परवानगी शिवाय कुणालाही जाता येत नसे. पंचतारांकीत सुविधायुक्त घर, महागडे कपडे-गाडीचा शौकिन असलेल्या या बाबाच्या गुहेत २०९ स्त्रियांचा राबता होता. कांग्रेस सरकारच्या काळातच मिळालेली झेड प्लस सिक्युरिटी वगळता स्वत:ची स्वतंत्र हत्यारबंद सुरक्षा व्यवस्था होतीच. अशा अनेक बाबी तुम्ही सुद्धा टीव्हीवर व वृत्तपत्रातुन पाहिल्या असतील, त्यांच्या विस्तारात काही जात नाही.

भारतातल्या भांडवली लोकशाहीतील निवडणूकांच्या औपचारिकतेतही धर्म, जात व पैसा एक महत्वाची भूमिका बजावतात, या मतपेढीचा(व्होट बँकेचा) उपयोग करता यावा म्हणून या बाबांच्या उंबऱ्यावर डोकं टेकवायला आणि सौदा करायला सर्व भांडवली पक्षांचे नेते जातात. धर्माच्या नावावरचा व्यापार व भांडवली राजकारण परस्परांना पुरक असतं म्हणून कधीकाळी कांग्रेसला समर्थन करणारा रामरहीम वारं फिरताच पर्याय शोधू लागतो व भाजपाला पाठींबा देतो व त्या पाठींब्याच्या बदल्यात अमित शहा बरोबर सौदेबाजी करतो. याच निवडणूकांत ज्या पद्धतीने आसाराम-रामदेव पासून अनेक बाबांनी भाजपाला पाठींबा दिला त्यातून त्यांच राजकीय चरीत्र एकदम नागडं झालं आहे. या बाबाबुवांच्या उत्कर्षाचा एक धागा शासकवर्गाच्या राजकारणातही सापडतो. नाहीतर १९७८ साली एका छोट्याशा आश्रमांत ४-५ अनुयांयी असणारा आसाराम २००० साल उजाडता उजाडता ४२५ आश्रमांचा मालक कसा होतो व तब्बल १० हजार कोटी रूपयांची माया गोळा कसा करतो. सत्तेवर आलेल्या शासक वर्गाच्या सत्तेला मान्यता देण्याच्या बदल्यात या बुवांना हजारो एकर जमीन फुकटात दिली जाते. आता सुद्धा रामदेव बाबाला उत्तराखंडात दिलेल्या ३८७.५ एकर जमिनीचा मुद्दा ताजा आहे. मोदी सत्तेवर आल्यापासून या बाबाने २,००० एकर एवढी जमीन ताब्यात घेतली आहे. २०१४ च्या अखेरीस या रामदेवची संपत्ती तब्बल १,१०० कोटी रूपए इतकी होती. बाबा रामरहीमच्या सच्चा सौदाचं साम्राज्यसुद्धा १,००० कोटीपेक्षा जास्त आहे. नुसत्या शिरसाच्या मुख्यालयाचा विस्तार ९०० एकर जमिनीवर आहे. भारतातील एक खास प्रसिद्ध सत्यसाईबाबांची स्थावर जंगम मालमत्ता ४० हजार कोटी ऐवढी अवाढव्य आहे. नुसत्या बारा एकराच्या आश्रमांत राहणाऱ्या रामपालला बी.एम.डब्ल्यु व मर्सीडीज सारख्या अतीमहागड्या गाड्या दिमतीला होत्या. त्याच्याही डेऱ्याचा विस्तार १०० कोटीहून अधिक सांगता येईल. या सोबत भक्तांच्या रूपात दासदासीचा मोठा राबता कायम हजर असतोच. हे सगळे महान आत्मे सामान्य जनतेला त्याग, आत्मसुधार, विकारमुक्ती शिकवतात व स्वत:मात्र आरामात, सुखात, खुशालचेंडू जगणे पसंद करतात.

या बाबागिरीच्या उत्कर्षाचा काळ १९८० पासून तपासला तर अनेक बाबांचा अवतार याच काळात भरभराटीला आल्याचे समोर येईल. त्यानंतर १९९१ स्विकारलेले जागतिकीकरणाचे धोरण व त्याचा जनतेवर होणारा परिणाम या सगळ्यामध्ये महत्वाची भूमिका पार पाडतोच. जागतिकीकरणाच्या वारूवर स्वार होण्याचं स्वप्न बघणारा मध्यमवर्ग व उच्चमध्यम वर्ग दोन्ही वर्ग भिन्न भिन्न कारणांमूळे या बाबांचा कट्टर समर्थक बनला, सोबत कष्टकऱ्यांची मोठी संख्याही याला बळी पडली आहेत. प्रत्येक वर्गाची जशी काही खास कारणं आहेत, तसा प्रत्येक वर्गाचा असा एक खास बाबा सुद्धा आहे.

आज धर्माचं पूर्णता भांडवलीकरण झालं आहे. गुरमीत पासून राधेमा पर्यंत त्याचं हे रूप अतिशय विकृत व कुरूप आहे. भांडवली राजकारणाशी याचं असलेलं साटंलोटं समजायला व भांडवली व्यवस्थेनं निर्माण केललं दु:ख, दारिद्र्य अनिश्चितता व भीतीचा ठाव घ्यायला सामान्य जनतेची वैज्ञानिक तर्कबुद्धी अजून तितकीशी सक्षम नाही. याची कारणं प्रबोधन व पुनरुज्जीवानाच्या न लाभलेल्या वारश्यात शोधता येतात. भांडवली व्यवस्थेला आरोपीच्या पिंजऱ्यात जनतेनं उभं करू नये म्हणून दैववादाचा उपयोग जनतेची मती बधीर करायला केला जातो. यासाठीच अशा बाबाबुवामाताचं पालनपोषण केलं जातं. सगळे बाबा एकजात धूर्त, प्रतिक्रियावादी, कट्टर फासीवादी प्रवृत्तीचे आहेत. निर्भया बलात्कारानंतर आसारामची भाषा असो की साक्षी महाराजाची बेताल वक्तव्य असो, मग ते कुठल्याही धर्मातले असोत ते घोर स्त्री विरोधी, धर्मांध, तर्कदुष्ट व विज्ञानविरोधी आहेत यात शंकाच नाही. निश्चितच या बाबा बुवांच्या जाळ्यांतून सामान्य जनतेला सोडवायला तिचं प्रबोधन तर करायलाच हवं पण सोबत एक अशी जमिनही घडवायला हवी जीथं ही विषारी बीजं अंकुरणारचं नाहीत कधीही. ***मुद्दा फक्त 'ढोंगी बाबाचा' नाहीच.***

---

**जेव्हा धर्मशास्त्र नैतिकतेचे आधार असतील,जेव्हा अधिकार कोण्या दैवी सत्तेवर विसंबून असतील, तेव्हाच सर्वात अनैतिक, अन्यायी, कुख्यात गोष्टी योग्य ठरवल्या व प्रस्थापितही केल्या जाऊ शकतील**

*लुडविक फायरबाख (१८४०-१८७२)*
*(जर्मन तत्वज्ञानी)*

**जेव्हा विवेक झोपी जातो, तेव्हा राक्षस पैदा होतात**

*फ्रांसिस्को द गोया (१७४६-१८२८)*
*(विख्यात स्पॅनिश चित्रकार)*

**जर आपण मानवी इतिहासाच्या आरंभी जाऊन पहालं तर दिसेल कि अज्ञान व भीतीने देवांना जन्माला घातलंय, कल्पना, उत्साह वा भ्रमांनी त्यांच महीमामंडन वा त्यांना लांछीत केलंय, दौर्बल्याने त्याचं पुजन केलंय, अंधविश्वासांन त्यांच रक्षण केलंय आणि प्रथा, श्रद्धा आणि निरंकुशतेन त्यांच समर्थन केलं आहे जेणेकरून माणसाच्या आंधळेपणाचा फायदा आपल्या हितांच्या पुर्तीसाठी करता यावा**

*बैरेन द'होल्बाख (१७२३-१७८९)*
*(प्रबोधनकालीन फ्रान्सचे तत्वज्ञानी)*

# आर.एस.एस.चे ‘गर्भ विज्ञान संस्कार’ - मुर्ख वंशवादी मानसिकतेचे नव-नात्झी संस्करण

डॉ. पावेल पराशर

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा वंशवादी अजेंडा, जो त्यांचा राजकीय पूर्वज असलेला जर्मन नात्झी पक्षाचादेखील होता, तो आता प्रत्येकवेळी उघड होताना दिसत आहे. ‘आरोग्य भारती’ या आर.एस.एस.च्या आरोग्य विभागाने ‘गर्भ विज्ञान संस्कार’ नावाने एक प्रकल्प सुरु केला आहे. या प्रकल्पांतर्गत गर्भात ‘सर्वश्रेष्ठ अपत्य’ रुजवण्यासाठी(प्राप्तीसाठी). जे दीर्घायुषी आणि गोऱ्या वंशाचं असेल. आई-वडिलांना तीन महिन्यांचा एक अभ्यासक्रम पुर्ण करावा लागतो. या अभ्यासक्रमामध्ये ग्रह ताऱ्यांची दिशा आणि दशा पाहून संभोगाची तारीख व वेळ ठरवली जाते, ज्यामुळं ‘सर्वश्रेष्ठ’ वंशाची मुलं जन्माला येतील. हा प्रकल्प मागील दशकापासून गुजरातमध्ये चालू आहे आणि २०१५ पासून त्याला राष्ट्रीय पातळीवर लागू केलं गेलं आहे. संघाच्याच शिक्षण विभाग असलेल्या ‘विद्या भारती’ च्या मदतीने या प्रकल्पाच्या सध्या १० शाखा गुजरात आणि मध्य प्रदेशात आहेत. लवकरच उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगालमध्ये देखील या उपक्रमाच्या प्रसाराच्या योजना आहेत आणि २०२० पर्यंत एक ‘सर्वश्रेष्ठ’ वंश तयार करण्याची परियोजना आहे.

हा प्रकल्प म्हणजे अज्ञान आणि मूर्खपणाचं अद्वितीय उदाहरण आहे. प्रकल्पातील अवैज्ञानिक गोष्टींवर नंतर चर्चा करू. सध्या ‘सर्वश्रेष्ठ’ वंश तयार करण्याच्या मानसिकतेवर चर्चा करणं जास्त गरजेचं आहे. ही संकल्पना संघाचे राजकीय पूर्वज असलेल्या जर्मन नात्झींच्या ‘वंश शुद्धी’ या फॅसिस्ट सिद्धांतावरून उधार घेतलेली आहे.

हिटलरच्या काळात नात्झी पक्षाने वंशभेदी वैमनस्याचा प्रचार केला. आर्य वंश ‘सर्वश्रेष्ठ’ वंश स्थापित करण्यासाठी इतर सर्व (यहूदी/ज्यू, काळ्या आणि सावळ्या रंगाच्या लोक) वंशाच्या लोकांना नीच दर्जाचं आणि अशुद्ध रक्ताचे दाखवून/ठरवून विषमतेचा/तुच्छतेचा प्रसार केला. तथाकथित ‘सर्वश्रेष्ठ’ आर्य वंशाच्या शुद्धतेला जपण्यासाठी हिटलरच्या नेतृत्वामध्ये नात्झींनी अशाच प्रकारे मूर्खतापूर्ण आणि अमानवीय वैज्ञानिक प्रयोगांवर पाण्यासारखा पैसा खर्च केला होता. जोसेफ मेंजेल नावाचा डॉक्टरच्या रुपातला एक नात्झी हत्यारा होता, ज्याला नात्झींनी ‘औश्विट्ज़’ छळ छावणीचा मुख्य डॉक्टर म्हणून नियुक्त केलं होतं. या छळ छावण्यांमधील कुणाला श्रमासाठी पाठवायचं आणि कुणाला गॅस चेंबरमध्ये मरण्यासाठी टाकायचं हे ठरवण्याचं काम त्याच्याकडे सोपवण्यात आलं होतं. यासोबातच तो जर्मनीतील आर्य वंशाला अधिक प्रगत करण्याचं शोधकार्यही करत होता. या रक्तपिपासू डॉक्टरने छळ छावण्यांमधील ३००० लहान मुलांवर अतिशय वेदनादायी प्रयोग केले ज्यापैकी केवळ २०० मुलंच जिवंत राहिली होती.




"गर्भामध्ये आर.एस.एस.चे आदर्श बाळ"
व्यंगचित्र :अभिषेक, विद्यार्थी, आई.आई.टी. कानपुर

आपल्या वंशवादी आणि वर्णद्वेषी मानसिकतेचा नमुना नुकताच काही दिवसांपूर्वी बीजेपी नेता व आरएसएसच्या ‘पांचजन्य’ साप्ताहिकाचे माजी संपादक तरुण विजय यांनी दक्षिण भारतीय लोकांबद्दल बोलताना वर्णद्वेषी वक्तव्यातून दाखवून दिला आहे.

आपल्या देशातील फॅसिस्ट संघी मूर्खपणामध्ये तर नात्झींपेक्षा दोन पावलं पुढंच आहेत. हे अशिक्षित, मूर्ख आणि प्रतिगामी आहेत यात काहीच शंका नाही. परंतू ही वंशवादी विचारधारा जी त्यांच्या नसानसात भिनली आहे त्याचा नंगानाच २१ व्या शतकातही हे स्वदेशी फॅसिस्ट निर्लज्जपणे करत आहेत. खरंतर यांच्या या ‘गर्भ विज्ञान संस्कारा’ला वैज्ञानिक असा कोणताच आधार नाही. परंतू खऱ्या अर्थाने ‘सर्वश्रेष्ठ संतती’ म्हणजेच आरोग्यपूर्ण मुलांबद्दल बोलायचंच झालं तर यांच्या सरकारनं दूरपर्यंत कोणताही उपक्रम हाती घेतलेला दिसत नाही. प्रत्येक वर्षी अंदाजपत्रकातील आरोग्यावरचा खर्च कमी करत चालेलेलं मोदी सरकार प्रसुती दरम्यान होणारे मातांचे मृत्यू, आई आणि बाळाचं होणारं कुपोषण यांच्या आकडेवारीत भारत हा सर्वात शेवटच्या रांगेत उभा आहे याकडं निर्लज्जपणे डोळेझाक करत आहे. सरकारी आकड्यानुसार देशातील ७५% आयांना पौष्टिक जेवण मिळत नाही. जागतिक आरोग्य संघटना, युनिसेफ, यू.एन. एफ.पी.ए. आणि जागतिक बँकेच्या ‘मैटर्नल मॉर्टेलिटी रिपोर्ट’२००७ नुसार जगभरामध्ये गरोदरपणात किंवा प्रसूतीच्यावेळी ५.३६ लाख स्त्रीयांचा मृत्यू होतो. यातील १.१७ लाख महिलांचे मृत्यू केवळ भारतात होतात. भारतात प्रसूतीच्यावेळी १ लाखापैकी ४५० स्त्रीयांचा मृत्यू होतो. गरोदरपणात आणि प्रसूतीच्यावेळी होणाऱ्या मृत्यूंपैकी ४७% मृत्यू हे रक्ताच्या कमतरतेमुळं आणि अधिक रक्तस्त्रावामुळं होतात.

अशावेळी खरंतर प्राथमिक आरोग्य केंद्रांची दुरुस्ती करणं, सुरक्षित प्रसूतीसाठी प्रशिक्षित आरोग्य कर्मचाऱ्यांची संख्या वाढवणं आणि सरकारी इस्पितळांमध्ये प्रसूतीसाठी आवश्यक उपकरणे उपलब्ध करून देण्याऐवजी ग्रह-ताऱ्यांच्या आधारावर संभोग आणि गर्भधारणेची वेळ निश्चित करणाऱ्या अवैज्ञानिक आणि मूर्ख उपक्रमांना प्रोत्साहन दिलं जातय. ही अतिशय हिडीस प्रवृत्ती आहे जिचा खरंतर विरोध केला गेला पाहिजे. सोबतच अशा मानसिकतेचा देखील विरोध केला पाहिजे जी वर्णद्वेषी मानसिकतेच्या दुष्परिणामांमुळं माणसाच्या स्वाभाविक गुणांना दुय्यम दर्जाचं ठरवून कोकिळेसारखा आवाज, चित्त्यासारखी चाल आणि कुत्र्यासारखी निष्ठा असणारी ‘सर्वश्रेष्ठ’ वंश जन्माला घालण्याची महत्वाकांक्षा ठेवते.

**अनुवाद : बबन ठोके**

# सामाजिक न्यायाच्या ‘झेंडेकऱ्यांचा’ खरा चेहरा

**कविता कृष्णपल्लवी**

**सामाजिक न्यायाच्या ‘झेंडेकऱ्यांचा’ म्हणजे तमाशेबाज लालू, मुलायम, नीतीश यांचा खरा चेहरा दाखवणारा एक विचारोत्तेजक लेख**

आजकाल काही भल्या मनाचे बुद्धीजीवी यामुळे फारच दु:खी आहेत की “सामाजिक न्यायाच्या शक्ती” सतत आपापसातील कलहामुळे विखुरल्या जात आहेत आणि हिंदुत्वाचे राजकारण एक-एक करुन त्यांना गिळत चालले आहे. या बुद्धीजीवी लोकांमध्ये काही मार्क्सवादी पण सामील आहेत जे अस्मितेच्या राजकारणाला मोहून जाऊन वर्ग-विश्लेषणाची पद्धत विसरले आहेत.

खरेतर सामाजिक न्यायाच्या या तथाकथित शक्ती सुद्धा भांडवलाच्या दास आहेत आणि नव-उदारवादी धोरणांची अगदी इमानेतबारे अंमलबजावणी करत आहेत. याच धोरणांनी समाजाला फासीवादाची रोपवाटीका बनवून टाकले आहे. हे इतके संधीसाधू आहेत की यांच्यापैकी कोण कधी भाजपाच्या कडेवर जाऊन बसेल सांगता येत नाही. राज्यांमध्ये सरकारे चालवताना भ्रष्टाचार आणि दडपशाही मध्ये हे कधी मागे राहिले नाहीत आणि याचा संघाने पूर्ण फायदा उचलला आहे. या शक्ती जे जातीचे राजकारण करतात, ते अस्मितेचे राजकारण जातींमधील ध्रुवीकरण वाढवते, हिंदुत्ववादाची मदत करते आणि शेवटी जाती व्यवस्थेच्या मुळांना खतपाणी घालण्याच्याच कामी येते. जातीचे राजकारण एकाप्रकारे धर्माच्या राजकारणाला सहाय्यकच बनते. समाजवादाच्या गोष्टी करणाऱ्या या सामाजिक शक्ती युरोपातील त्या सामाजिक-लोकशाहीवाद्यां(सोशल-डेमोक्रॅट्स)सारख्या आहेत ज्यांना फासीवाद्यांनी खाऊन पचवले आणि ढेकर सुद्धा दिला नाही. आता जरा मार्क्सवादी वर्ग-विश्लेषणाकडे वळूया. सामाजिक न्यायाची ठेकेदारी करणारे प्रादेशिक पक्ष खरेतर धनिक शेतकऱ्यांचे आणि विविध भागातील स्थानिक भांडवलदारांचे वर्गीय प्रतिनिधीत्व करतात. जातीच्या आधारावर हे पक्ष गरिबांमध्येही आपला सामाजिक आधार बनवतात. आता धनिक शेतकरी आणि स्थानिक भांडवलदार भाजपाच्या मागे उभे राहिल्यामुळे या तथाकथित सामाजिक न्यायाच्या शक्तींसमोर संकट उभे ठाकले आहे. यांच्यापैकी काही आता भाजपा सोबत मधुचंद्राला तयार आहेत तर काही आपल्या अस्तित्वाची लढाई लढत आहेत.

इतिहास साक्षी आहे की सामाजिक न्यायाच्या या सर्व तारणहारांनी कधी ना कधी भाजपासोबत अल्पकालीन एकत्र चुल मांडली आहेच, एकाच पालखीत सवारी केली आहे किंवा त्यांच्या पालखीचे खांदेतरी बनले आहेत. सामाजिक न्यायाचा ढोल वाजवणाऱ्या या तमासगीर पार्ट्यांनी आणि त्यांच्या नेत्यांनी कधीच कोणतेही मूलगामी सामाजिक आंदोलन केले नाही. गमंत अशी आहे की जेव्हा खुर्चीच्या झोंबाझोंबीमध्ये देवीलाल यांनी ‘शेतकरी शक्तीची’ आरोळी ठोकली तेव्हा व्ही. पी.सिंग यांनी लगेच हुकूमाचा एक्का फेकत मंडल आयोगाचा अहवाल लागू करण्याची घोषणा केली आणि मंडल तारणहार बनले. कम्युनिस्ट पक्ष जेव्हापासून निवडणुकांच्या गटार गंगेमध्ये बुड्या मारत संसदीय अफूघरात आपले स्थान पक्के करण्यालाच अंतिम ध्येय मानू लागले तेव्हा पासूनच दलित आणि गरिबांनी त्यांची साथ सोडून दिली. परंतु तेलंगाणा-तेभागा-पुनप्रा वायलारच्या काळी चित्र वेगळे होते. कम्युनिस्टांच्या सर्व चूका-कमजोरींसहित, जातीव्यवस्थेच्या सैद्धांतिक विश्लेषणाच्या कमतरतेसहित सुद्धा गरीब रयत, कष्टकरी आणि भूमिहिनांच्या हकांसाठी लढणारे कम्युनिस्टच होते. यामुळेच मधल्या जातींमधील गरीब कष्टकरी आणि दलित जातींमधील भूमिहीन त्यांच्यासोबत निर्धाराने उभे होते. संघर्षातून त्यांना फक्त आर्थिक अधिकारच मिळाले नाहीत तर सामाजिक न्याय आणि आत्मसन्मानही मिळाला. आज या सगळ्या गोष्टी अस्मितेच्या राजकारणाला मोहून गेलेले कम्युनिस्ट बुद्धिजीवी विसरुन गेले आहेत. कम्युनिस्ट आंदोलन दुरुस्तिवादी पथभ्रष्ट झाल्याच्या तीन दशकांच्या प्रक्रियेत दलित आणि मागासलेल्या गरीब जनतेचा या बिनकामी, दुतोंड्या आणि तडजोड करणाऱ्या कम्युनिस्ट पक्षांनी अपेक्षा भंग केला; आणि जातीय संघटना करणाऱ्या धनिक शेतकरी (कुलक-शेतकरी) व लहान भांडवलदारांच्या पक्षांनी गरीब मागासवर्गीय आणि दलितांना, धनिक मागासवर्गीय आणि सुविधाभोगी दलितांच्या मागे नेऊन उभे केले. याकरिता या पक्षांनी आर्थिक वर्गीय शोषणाच्या सर्व प्रश्नांना बाजूला सारून जातीय अत्याचाराच्या आणि सामाजिक न्यायाच्या खुप घोषणा दिल्या. अस्मितेच्या राजकारणाच्या सिद्धांतांनी या राजकारणाला वैचारिक आधार दिला आणि बहुतेक ‘मार्क्सवादी’ सुद्धा या नव्या सिद्धांताची अफू चाटून आपली उरलीसुरली विवेक-बुद्धी व तर्कशीलपणा हरवून बसले.

सत्य हे आहे की सामाजिक न्यायाच्या या तथाकथित शक्तींमध्ये आपापसात ना कधी एकता होती, ना कधी होऊ शकते. याचे कारण त्यांच्या वर्ग-चरित्रामध्ये आहे. हे सर्व पक्ष (स्थानिक) भांडवलदार, धनिक शेतकरी-उच्चमध्यमवर्गीय शेतकरी (कुलक-फार्मर) वर्गाचे पक्ष आहेत. हे वर्ग आपल्या हितांच्या रक्षणासाठी ना फक्त मोठ्या (एकाधिकारी) भांडवलदारांशी लढतात, तर आपापसातही वरकड मूल्याच्या वाटणीसाठी लढत राहतात. त्यामुळे त्यांची एकता नेहमीच तात्पुरती असते. मोठ्या भांडवलदारांच्या एका गटाला सोबत घेऊन हे पक्ष तथाकथित तिसरी आघाडी तर बनवतात परंतू लवकरच स्वत:च्या अंतरविरोधांमुळे या आघाडीची बिघाडी होते. भारतात तिसऱ्या आघाडीचे राजकारण कधीच टिकू शकत नाही. हे लक्षात घेणे आवश्यक आहे की नव-उदारवादी धोरणांच्या काळात मूलभूत धोरणांबद्दल छोट्या-मोठ्या भांडवलदारांमध्ये, धनिक शेतकऱ्यांमध्ये कोणतेही मूलभूत मतभेद नाहीत. (मजूर वर्गाच्या - अनु.) शोषून घेतलेल्या वरकडाच्या वाटणीचे भांडणसुद्धा आता ते आपापल्या भांडवलाच्या ताकदीच्या आधाराने वाटण्या करून सोडवतात. लहान उद्योजक, धनिक शेतकरी (कुलक) आणि शेतमालक (फार्मर) सुद्धा फासीवादी धोरणांसोबत मजबुतीने उभे आहेत आणि फासीवादाचे प्रमुख सामाजिक आधार आहेत. यामुळेच सामाजिक न्यायाचे आश्वासन देणारे पक्ष भाजप सोबत युती करायला किंवा त्यासोबत विलीन होण्यास लाचार आहेत.

सामाजिक न्यायाचे आश्वासन देणाऱ्या या भांडवली (बुर्झ्वा) पक्षांच्या जातीय आधाराच्या मतपेढ्या (व्होट-बँक)आहेत, आणि त्यामुळे सुद्धा यांच्यामध्ये कधी एकता होणे शक्य नाही. ग्रामीण दलितांची बहुसंख्या शेतमजूर व गरीब शेतकरी आहे आणि त्यांचे सर्वाधिक शोषण-अत्याचार मधल्या जातींमधून येणारे धनिक-

पान ७ वर

# बेसुमार वाढती महागाई म्हणजे गरीबांच्या विरोधात सरकारचे लुटेरे युद्ध!

पान १ वरून

अशी अवस्था होती की, तीन चतुर्थांश(३/४) लोकसंख्येच्या जेवणामध्ये जीवनसत्वे (व्हिटामीन्स) आणि प्रथिनांसारखे (प्रोटीन) आवश्यक पौष्टिक घटक सातत्यानं कमी होत होते. प्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ उत्सा पटनायक यांच्या अभ्यासानुसार देशातील प्रतीव्यक्ती सरासरी खाद्य उपलब्धता बंगालमधील १९४२-४३ मध्ये आलेल्या भीषण दुष्काळातील दिवसांच्या बरोबरीवर आली आहे. ग्रामीण भागातील बहुतेक कुटुंबांना दोन वेळचे व आठवड्यातील सातही दिवस पोटभर अन्न मिळत नाही. रोज जवळपास नऊ हजार बालके कुपोषण आणि त्यांपासून होणाऱ्या आजारपणांमुळे मरतात. वास्तविक संख्या त्याहूनही अधिक असल्याचे विशेषज्ञांचे मत आहे.

२०१२ मध्ये झालेल्या पोषण केंद्राच्या (न्युट्रीशन ब्युरो) ग्रामीण भागातील सर्व्हेक्षणानुसार १९७९ च्या तुलनेत प्रत्येक ग्रामीण व्यक्तीला प्रतीदिवसाला सरासरी ५५० किलो उर्जा, १३ ग्रॅम प्रथिने, ५ मिलीग्रॅम लोह, २५० ग्रॅम कॅल्शियम आणि ५०० ग्रॅम जीवनसत्व 'अ' कमी मिळत आहेत. याच प्रकारे ३ वर्षांपेक्षा कमी वय असणाऱ्या मुलांना ३०० मिलीलिटर प्रतीदिवसाच्या तुलनेत फक्त ८० मिलीलीटरच दुध प्रतिदिवस मिळत आहे. सर्व्हेक्षण असंही निदर्शनास आणतं की १९७९ मध्ये सरासरी जितकी दैनिक गरज आहे तितके प्रथिने, उर्जा, कॅल्शियम आणि लोह उपलब्ध होते; पण २०१२ येतायेता आता फक्त कॅल्शियमच तेवढे आवश्यक प्रमाणात मिळत आहे. वस्तुतः प्रथिनांची दैनंदिन गरज ८५%, उर्जेची ७५% व लोहाची ५० प्रमाणात असायला हवी. फक्त जीवनसत्व 'अ हेच एकमेव असे पोषक तत्व आहे, ज्याचे प्रमाण १९७९ मध्ये ४० टक्क्यांपासून १९९९ मध्ये ५५% झालं होतं. आता तेही खालावून २०१२ मध्ये ५०% दैनिक गरजेपर्यंत आलं आहे. याचाच परिणाम म्हणजे सर्व्हेक्षणाच्या आकड्यानुसार ३५% ग्रामीण स्त्री-पुरुष कुपोषित आहेत. आणि ४२% लहान मुले मानक स्तरांवरील(सरकारने ठरवून दिलेल्या) वजनाहून कमी वजनाची आहेत. हा तर संपूर्ण लोकसंख्येचा सरासरी आकडा आहे, लोकसंख्येतील गरीबांचा विचार केला तर परिस्थिती अजून भयावह आणि खराब आढळते. 'आजीविका' नावाच्या संघटनेद्वारे दक्षिण राजस्थानात केलेल्या एका सर्व्हेक्षणानुसार निम्म्याहून अधिक मातांना डाळ मिळत नाही, तर एक तृतीयांश(१/३) मातांना जेवणामध्ये भाजीपाला मिळत नाही. परिणामत: अर्ध्या माता व त्यांची मुलं कुपोषणाला बळी पडली आहेत.

दिल्ली व मुंबई सहित शहरांतील झोपडपट्ट्यांमध्ये राहणारी एक चतुर्थांश(१/४) अर्थात १० कोटी लोक अत्यंत गरीब आहेत आणि कुपोषण व भुकेचे तितकेच बळी आहेत. जसजसे आपण भारत महासत्ता बनवण्याचा बाता ऐकत आहोत तसतसे या भुकेनं पिडलेल्या लोकांची संख्या कमी होण्याऐवजी वाढतच चालली आहे. 'युनिसेफ' अनुसार भारतात दरवर्षी तब्बल ५ लाख मुलं कुपोषण व तत्संबधी कारणांमुळे मृत्युमुखी पडतात. सामान्य वजनाहून कमी असलेल्या मुलांच्या तपशिलाचा विचार केला तर तुम्हाला दिसेल की विकसित देश तर सोडाच, पण ब्राझील, चीन, दक्षिण आफ्रिका सारख्या तिसऱ्या जगांतील देशांच्या तुलनेत आपण फार मागे आहोत. शहरी मुलांच्या कुपोषणाच्या मामल्यामध्ये आपण बांगलादेश-पाकिस्तान पेक्षाही मागे आहोत.

भारतात ही संख्या जिथं ३४% आहे तिथं बांगलादेशात २८% पाकिस्तानात २५%, दक्षिण आफ्रिकेत १२% ब्राझीलमध्ये २% व चीनमध्ये १% आहे.

| देश | भारत | बांगलादेश | पाकिस्तान | दक्षिण आफ्रिका | ब्राझील | चीन |
|---|---|---|---|---|---|---|
| कुपोषणाचे प्रमाण | ३४% | २८% | २५% | १२% | २% | १% |

भारताची राजधानी दिल्ली व आर्थिक राजधानी असणाऱ्या मुंबईच्या परिस्थितीवर जरा अधिक विस्तारानं जाणून घेऊयात, कारण यांविषयी अधिक माहिती उपलब्ध आहे. याच्या आधारावर आपण बाकीच्या शहरांबाबत अनुमान लावू शकतो. या दोन्हींच्या एकूण लोकसंख्येपैकी अर्धे किंवा जवळजवळ २.४० कोटी लोक हे झोपडपट्ट्यांमध्ये राहतात; जी प्रचंड गर्दी, गरिबी आणि कुपोषणांची केंद्र आहेत.

बहुतेक कामगार कुटुंबांना त्यांच्या मुलांना दुधसुद्धा देता येत नाही. कामगार महिला आपल्या मुलांचा 'बॉडी मास इंडेक्स' काढत नाहीत , परंतू त्या मुलांना बघताच कळतं की ती कुपोषणाची बळी आहेत. सरकारी मानकांनुसार तर औद्योगिक कामगारांना प्रतीदिवस कमीतकमी २७०० कॅलरी जेवण मिळायला पाहिजे. जड काम करणाऱ्यांना कमीतकमी ३००० कॅलरी मिळायला हव्या. पण वास्तवात बहुतेक कामगार जे रोज जेवतात त्यातून त्यानच केवळ पोट भरतं. परंतु दिवसभर काम करायला आवश्यक असे संतुलित अन्न आणि पौष्टिकता त्यातून मिळत नाही. त्यात अशा कामगारांना पुरेसा आरामही मिळत नाही. बहुतेक कामगार आठवड्यातील सातही दिवस १२-१३ तास काम करतात, अशामुळं शरीर कमजोर होत जातं.

'विश्व स्वास्थ संघटने'च्या मानदंडांनुसार जर एखाद्या भागातील ६० टक्के लोकसंख्या कुपोषणाची बळी असेल तर त्या भागाला 'दुष्काळग्रस्त' घोषित करून मदतीच्या विशेष उपाययोजना करायला हव्यात. या निकषांच्या आधारावर दिल्लीतील निम्म्या लोकसंख्येला दुष्काळग्रस्त घोषित करायला पाहिजे. निश्चितच भारत सरकार असं करणार नाही. कारण त्यांच्या तथाकथित विकासाची धोरणं वरच्या १५% लोकांसाठी स्वर्ग आणि बाकी जनतेसाठी नरक निर्माण करत आहेत. देशातील ६० टक्के मुलं रक्ताच्या कमतरतेची शिकार आहेत. ५ वर्षापेक्षा कमी वयाची मुलं ही ५० टक्के प्रकरणांमध्ये कुपोषित आहेत. 'संयुक्त राष्ट्रा'च्याच एक अहवालानुसार ६३ टक्के भारतीय मुले रोज अर्धपोटी झोपतात.त्यातील ६० टक्के मुले कुपोषित आहेत. दिल्लीतील अंधाधुंद विकासासोबतच झोपड्या व कच्च्या वस्त्यांमध्ये राहणाऱ्या लोकांची संख्यासुद्धा खूप वेगाने वाढली आहे. ही संख्या जवळपास ७० लाखांपर्यंत पोहचली आहे. या वस्त्यांमध्ये प्यायला स्वच्छ पाणी नाही, शौचालय नाही आणि सांडपाण्याची योग्य व्यवस्थादेखील नाही. ठिकठिकाणी सांडपाणी व कचरा एकत्र येवून सडत राहतो आणि आधीच कमजोर शरीराची ही माणसं अनेक आजारांना बळी पडतात.

भाववाढीसाठी सरकारची भांडवली धोरणंच जबाबदार आहेत. महागाईचं खरं कारण आहे की शेतीच्या उत्पादनावर बडे उद्योगपती, व्यापारी, सट्टेबाज, काळाबाजार करणारे यांचाच ताबा आहे. हेच वस्तूंच्या किमती ठरवतात आणि बाजारात जाणीवपूर्वक कृत्रिम तुटवडा निर्माण करून भाववाढ करतात. गेल्या काही वर्षात शेती उत्पादन आणि किरकोळ व्यापाराची क्षेत्रं बड्या कंपन्यांसाठी खुले करण्याच्या निर्णयामुळे स्थिती अजूनच बिघडली आहे. आपल्या अवाढव्य भांडवल आणि शक्तीच्या जोरावर या कंपन्या बाजारावर पूर्णत: नियंत्रण स्थापित करू शकतात. मोदी सरकार आल्यानंतर डाळींचे भाव गगनाला भिडण्याचे कारण मोदीच्या चाहत्या भांडवलदार अडाणीच्या कंपनीद्वारे केला गेलेला अडीच लाख कोटीचा घोटाळा होता. अडाणीने सिंगापूरच्या 'विलमार' कंपनीसोबत एका संयुक्त उद्योगाला सुरुवात केली. तिचा उद्देश्य भारतात खाद्य पदार्थांची विक्री करणं होता. अडाणी-विलमर भारतात 'फोर्च्युन' नावानं खाद्य पदार्थांची विक्री करतो. अडाणीने भारतातील कृषीप्रधान राज्यांच्या कृषी उत्पादनांमध्ये मोठ्या प्रमाणात साठेबाजी केली, जेणेकरून चढ्या किमतींमध्ये तो विकू शकेल. पण अडचण अशी होती की एका विशिष्ट मर्यादेपेक्षा जास्त प्रमाणात खाद्य पदार्थांची साठवणूक करता येत नव्हती. तेव्हा त्यांचे प्रिय मोदी कामी आले व मोदी सरकारने तूर, मुग आणि उडीद डाळींच्या साठवणुकीची सीमा एका सरकारी कायद्याने हटवून अडाणीची अडचण दूर केली. त्यानंतर अडाणी कंपनीने प्रतीदिवस ३०० टन डाळ फक्त ३० रुपये प्रति किलो दराने गोळा करायला सुरुवात केली. कंपनीने १०० लाख टनापेक्षा जास्त माल आपल्या गोदामांमध्ये भरला. आता जेव्हा बाजारात डाळींचा तुटवडा झाला तेव्हा अडाणीने ३० रुपयांनी खरेदी केलेली हीच डाळ १५० ते २०० रुपयांनी विकून कोट्यावधी रुपये कमावले. हे तर फक्त एकच उदाहरण आहे.

भांडवली धोरणांच्या परिणामी धान्य उत्पादनांमध्ये घट होत आहे. भारतातच नव्हे, तर संपूर्ण जगातील शेती आज संकटग्रस्त आहे. भांडवलशाही उद्योगांच्या तुलनेमध्ये शेतीकडं दुर्लक्ष होणं स्वाभाविक म्हणायला हवं, पण जागतिकीकरणाच्या धोरणाने हे संकट अधिक तीव्र आणि गंभीर बनवलं आहे. श्रीमंत देशांची सरकारे मात्र त्यांच्या शेतकऱ्यांना मोठी अनुदाने देऊन शेतीला नफ्याचा धंदा म्हणून तगवून आहेत. परंतू तिसऱ्या जगातील देशामधला लहान व मध्यम शेतकरी सरकारी उपेक्षा आणि भांडवली हल्ल्याने पार मेटाकुटीला आला आहे. साम्राज्यवादी देशातल्या बड्या अॅग्रो कंपन्या आणि देशी उद्योगपतीची नफेखोरी यांच्या परिणामी शेतीचं लागवड मूल्य वाढलं आहे. शेतकऱ्यांना शेतीवर गुजराण करणं कठीण होत चाललं आहे. याचा थेट परिणाम देशातील खाद्यान्नाच्या उत्पादनावर होत आहे.

कष्टकरी समुदायाच्या सातत्यानं घटणाऱ्या मजुरीमुळे त्यांची खरेदी करण्याची ताकद कमी झाली आहे. रोजंदारीवर काम करणारी जवळजवळ ५० कोटी लोकसंख्या आजपासून १० वर्षापूर्वी जितकं कमावत होती आज मुश्किलीनं तितकंच कमावत आहे. वस्तूंच्या किमती मात्र दुप्पट आणि तिप्पट झाल्या आहेत.

मानवद्रोह याच्या पेक्षा अजून कुठली वेगळी गोष्ट असेल की ज्या देशात कोट्यवधी बालकं रोज रात्री उपाशी झोपताहेत तिथेच ३५ ते ४० टक्के धान्य देखरेख नसल्यामुळं गोदामांमध्ये सडत आहे. एक्स्प्रेस वे, अत्याधुनिक विमानतळ, स्टेडीयम इत्यादींवर कई लाख कोटी रुपये खर्च करणाऱ्या सरकारांना अद्याप इतकी गोदामे बनवता येऊ नये की उपाशी मरणाऱ्या जनतेसाठीचं अन्न सडण्यापासून वाचवता यावं!

जोपर्यंत वस्तुंचं उत्पादन व वितरण केवळ नफा कमावण्यासाठी होत राहील तोपर्यंत महागाई दूर नाही होणार. कामगारांची मजुरी व वस्तूंच्या किमतींमध्ये एक अंतर कायम राहील. कामगारही फक्त आपल्या मजुरी वाढवण्याच्या संघर्षातून काहीच मिळवू शकणार नाहीत. कदाचित तो लढून थोडीशी मजुरी भांडवलदारांकडून वाढवून घेण्यात यशस्वी होईलही, पण भांडवलदार वस्तूंच्या किमती पुन्हा वाढवेल व आपल्याला लुटत राहील. हे सातत्यानं चालू राहील. कामगारांची मजुरी वाढवण्याच्या सोबतच मजूरीची ही संपूर्ण व्यवस्थाच नष्ट करायला आपल्याला लढावं लागेल.

# सामाजिक न्यायाच्या 'झेंडेकऱ्यांचा' खरा चेहरा

पान ६ वरून

शेतकरी(कुलक-फार्मर) करतात. उत्तरप्रदेशामध्ये मधल्या जातींचा हा ग्रामीण भांडवलदार वर्ग मुख्यत्वे समाजवादी पक्ष आणि इतर काही छोट्या पक्षांमध्ये समाविष्ट आहे. या पक्षांनी जातीय संघटना करुन त्या त्या जातींमधील गरीबांनाही सोबत जोडले आहे. बसप हा दलितांमधून निर्माण झालेल्या एका छोट्या भांडवलदार वर्गाचे आणि उच्च मध्यमवर्गाचे प्रतिनिधित्व करतो परंतु जातीय संघटनेद्वारे त्यांनी आपला सामाजिक आधार आणि मतपेढी (व्होट बँका) गरीब दलितांमध्ये सुद्धा बनवली आहे. या दलित गरीब जातींना मध्य जातींमधील धनिक-शेतकऱ्यांकडून ज्या अत्याचारांना तोंड द्यावे लागते त्यामुळे गावांमध्ये जातीय दुभागणी आणि तणाव कायम असतो. यामुळे दलितांमध्ये सामाजिक आधार असलेला एखादा पक्ष जर मध्य जातींमध्ये सामाजिक आधार असलेल्या एखाद्या पक्षासोबत जास्त काळ युती चालवेल तर त्याचा सामाजिक आधार आणि मतपेढी नष्ट होईल. अजून एक गोष्ट अशी की लहान भांडवलदार आणि धनिक-शेतकऱ्यांचे (कुलक-फार्मर)वर्ग देशांतर्गत स्पर्धेसाठी जातीय आधारावर दबावगट बनवून संघटीत आहेत. यामुळेच बिहार, उत्तरप्रदेश, आंध्रप्रदेश, तामिळनाडू, कर्नाटक, गुजरात, महाराष्ट्र अशा राज्यांमध्ये स्थानिक पक्षांचे वेगवेगळे जातीय सामाजिक आधार आहेत (किंवा राष्ट्रीय पक्षांमध्ये जातीय आधारावर संघटीत दबावगट आहेत). यांच्यामध्ये स्पर्धा आणि टकराटकरी कायम चालू राहते. वर्गीय अंतरविरोधांच्या या वस्तुस्थितीला आणि त्यातील सूक्ष्म फरकांना न समजता काही पुस्तकी बुद्धिजीवी ब्राह्मणवाद व सवर्णवादाच्या विरोधात "सामाजिक न्यायाच्या सर्व ताकदींना" एकत्र आणण्याचे दिवास्वप्न घेऊन जगत आहेत. यात ते मार्क्सवादी सुद्धा सामील आहेत जे अस्मितेच्या राजकारणाची अफू चाटत राहिल्यामुळे वर्ग-विश्लेषणाची मार्क्सवादी पद्धत एकदमच विसरून गेले आहेत. आजकाल तर हे भूत लोकांच्या डोक्यावर असे बसले आहे की वर्ग-विश्लेषणाचे नाव घेताचा तुम्हाला वर्ग-अपचयनवादी घोषित केले जाते!!

# फासीवाद म्हणजे काय आणि त्याविरुद्ध लढायचे कसे?

**गेल्या काही वर्षांपासून चालू असलेल्या खोल आर्थिक मंदीमुळे एकीकडे लाखो लोकांना आपला रोजगार गमवावा लागत असताना बहुतेक देशांमध्ये एक तर फासीवादी पक्ष सत्तेत आले आहेत किंवा बळकट तरी झाले आहेत. (जसे आपल्या देशात फासीवादी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे निवडणूकांमध्ये प्रतिनिधित्व करणारा भाजप) असे पक्ष सत्तेत येताच कामगारांच्या अधिकारांवर जोरदार हल्ला चढवतात आणि कॉर्पोरेट घराण्यांचा नफा वेगाने वाढविणारी धोरणे बनवतात. जर्मनीत हिटलर आणि इटलीमध्ये मुसोलिनी यांना आपण इतिहासातील फासीवादाचे जनक म्हणून ओळखतो. त्यांनी लाखो-कोट्यावधी निर्दोष माणसांची कत्तल केली आणि आजसुद्धा तमाम फासीवादी त्यांना आपले गुरू मानतात. अशा परिस्थितीत, आर्थिक अरिष्ट किंवा मंदी म्हणजे नेमके काय असते, ती फासीवादाला कसा जन्म देते, फासीवाद कसा ओळखावा आणि त्याच्याशी लढण्याचा खरा मार्ग कोणता, यांसारख्या गोष्टी समजून घेणे गरजेचे आहे.**

**एखादा फासीवादी पक्ष सत्तेत असतो तेव्हाच फासीवादाचा धोका असतो, आणि फासीवादी पक्ष सत्तेतून बाहेर पडताच फासीवादाचा धोका टळतो, असे मानणाऱ्या लोकांची संख्या कमी नाही. २००९ च्या लोकसभा निवडणूकीत जेव्हा लालकृष्ण अडवाणी यांच्या नेतृत्त्वातील भाजपाचा पराभव झाला होता, तेव्हा अनेकांचा असा गैरसमज झाला होता की फासीवादाचा धोका आता टळलेला आहे. त्यांचा समज किती बालीश होता हे स्पष्ट झालेच आहे, व आता फासीवादाचा धोका सर्वांत भयंकर रूपात आपल्या डोक्यावर घिरट्या घालीत आहे. फासीवाद म्हणजे काय? हे समजून घेतल्याशिवाय आपण काही झाले तरी त्यांच्या विरोधात लढण्याचा प्रभावी मार्ग शोधून काढू शकत नाही. त्याच्या सर्वच सामाजिक-आर्थिक-राजकीय-सांस्कृतिक पैलूंची योग्य जाणीव विकसित करूनच आपण त्याला पराभूत करण्याचा एक व्यावहारिक कार्यक्रम आखू शकतो. २००९ मध्ये जे लोक म्हणत होते की फासीवादाचा धोका आता टळला आहे तेच लोक २०१४ मध्ये मोदी सत्तेवर येताच रडू-विव्हळू लागले आणि फासीवाद फासीवाद म्हणून ओरडू लागले आहेत. त्यांच्या मते भाजप सत्तेत असला, तर फासीवादाचा धोका असतो आणि जर भाजप सरकार बनवू शकला नाही तर फासीवादाचा धोका टळतो! फासीवादाची एवढी बालीश समज असल्यामुळेच हे लोक फासीवादाला पराभूत करण्याचा जो कार्यक्रम तयार करतात तोसुद्धा विसंगतींनी भरलेला असाच असतो. महागठबंधन किंवा व्यापक डाव्या आघाडीच्या बळावर फासीवाद संपवण्याची योजना बनवणाऱ्या डॉन क्विहोतेंची सध्या कमी नाही. ते फक्त निवडणूकीच्या माध्यमातून फासीवादाला पराभूत करण्याचे शेखचिल्लीचे स्वप्न पाहत आहेत. परंतु हे खरेच शक्य आहे का? निवडणूकीच्या माध्यमातून फासीवाद संपवला जाऊ शकतो का?**

**या प्रश्नावर गंभीरपणे विचार करणे व फासीवाद विरोधी लढ्याला योग्य दिशा देणे आज गरजेचे आहे. अशा वेळी, हा दीर्घ लेख फासीवादाची एक सुस्पष्ट समज निर्माण करण्यास वाचकांना साहाय्यक ठरेल, असे आम्हाला वाटते. हा लेख फासीवाद निर्माण होण्याच्या आर्थिक-राजकीय कारणांवर विस्ताराने चर्चा करतो, जर्मनी आणि इटलीमधील फासीवादाच्या इतिहासाचे विश्लेषण करून महत्त्वपूर्ण निष्कर्ष काढतो, भारतातील सर्वांत मोठी फासीवादी शक्ती असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची एकंदर जन्मकुंडली मांडतो आणि शेवटी फासीवादाशी लढण्यासाठी एक महत्त्वपूर्ण व्यावहारिक कार्यक्रम सादर करतो. फासीवादाच्या निरनिराळ्या सैद्धांतिक पक्षांवरही हा लेख प्रकाश पाडतो व इतिहासात केल्या गेलेल्या सैद्धांतिक चुकांची समीक्षासुद्धा करतो.**

**हा निबंध सर्वप्रथम २००९ साली कामगारांसाठी प्रसिद्ध होणाऱ्या मजदूर बिगुल या मासिक वृत्तपत्रात सहा भागांमध्ये प्रसिद्ध झाला होता. हा निबंध मुळात हिंदीत लिहिला गेला होता व या लेखाने मांडलेल्या प्रस्थापनांना गेल्या पाच वर्षांतील घटनाक्रमाने योग्य सिद्ध केले आहे.**

**संपादक**

भाग - ५

लेखक : अभिनव
मराठी अनुवाद : अमित शिंदे

## भारतीय समाजातील फासीवादासाठी अनुकूल परिस्थिती आणि तिचा सामाजिक आधार

जर्मनी मध्ये फासीवादाच्या उदयासाठी अनुकूल परिस्थितीची चर्चा करत असताना आपण बघितले होते की भांडवली क्रांती, क्रांतिकारी भूमी सुधारणा, क्रांतिकारी भांडवलदार वर्गाची अनुपस्थिती; दोन दशकांमध्ये अभूतपूर्व वेगाने झालेला भांडवली विकास आणि त्यामुळे कामगारांचे मोठ्या प्रमाणात उध्वस्त होणे, बेरोजगारी व गरिबी वाढणे, असुरक्षिततेत वाढ होणे; निम्न भांडवलदार वर्गाचे उध्वस्त होणे; कोणताही क्रांतिकारी पर्याय उपलब्ध नसणे आणि सामाजिक-लोकशाहीवाद्यांकडून कामगार आंदोलनाला सुधारवादाच्या चौकटीत अडकवून ठेवणे आणि त्यामुळे समाजात प्रतिक्रियावादाचा आधार तयार होणे; संकट काळात बड्या भांडवलदारांना नग्न भांडवली हुकुमशाहीची गरज आणि त्यामुळे त्यांनी नाझी पक्षाचे समर्थन करणे; समाजातील लोकशाही मूल्य आणि संस्कृतीचा अभाव; क्रांतिकारी जमीन सुधारणांच्या अभावी मोठ्या शेतकऱ्यांच्या (युन्करांच्या) घनघोर प्रतिक्रियावादी वर्गाचे अस्तित्व; प्रतिक्रियावादी मध्यम शेतकरी वर्गाचे अस्तित्व इत्यादी कारणांमुळे जर्मनीमध्ये फासीवादी सत्तेवर पोहोचले. इटलीमधील औद्योगिक विकास जर्मनीच्या तुलनेत खूपच कमी होता. उत्तर इटलीमध्ये काही प्रमाणात औद्योगिक विकास झाला होता आणि तो खूप वेगाने झाला होता. ज्यामुळे कामगार आणि निम्न भांडवलदार वर्गाच्या उध्वस्त होण्यामुळे समाजात सर्वसाधारणपणे असुरक्षिततेचे वातावरण तयार झाले होते. दुसऱ्या बाजूला दक्षिण इटलीमध्ये मोठे जमीनदार आणि त्यांच्या जहागीरींचे अस्तित्व होते ज्यांना लातीफुन्दिया म्हटले जात असे. हे जमीनदार भयंकर प्रतिक्रियावादी होते आणि ह्यांनी फासीवाद्यांशी सुरुवातीस मतभेद असूनही नंतर त्यांना पुरेपूर साथ दिली. इटलीमध्ये कम्युनिस्टांनी जबरदस्त लढा उभारला आणि ते समाजवादी क्रांतीपर्यंत पोहोचले; परंतु अपूर्ण सशस्त्र विद्रोहामुळे ते अपयशी ठरले. बहुतांश शहरांमध्ये परिषदांची निर्मिती झाली पण त्यांना चिरडून टाकण्यात आले. 'दुसऱ्या आंतरराष्ट्रीय'मध्ये लेनिनने इटलीच्या कम्युनिस्ट पक्षाच्या प्रतिनिधी मंडळावर क्षुब्ध होऊन म्हटले होते - ''क्रांतीला जन्म द्यावा लागतो. ती त्या मार्गाने घडत नाही, ज्या मार्गाने तुम्ही ती घडवू इच्छिता". लेनिनचा इशारा ह्याच अपरिपक्वतेकडे होता, ज्यामुळे इटलीमध्ये येऊ घातलेल्या क्रांतीला कम्युनिस्ट पूर्णत्वास पोहचवू शकले नाहीत.

दुसरीकडे सामाजिक लोकशाहीवाद्यांनी कामगार चळवळी बरोबर तेच केले जे त्यांनी जर्मनीमध्ये केले होते - ट्रेड युनियनवाद, अर्थवाद आणि अराजकतावादी संघाधिपत्यवाद (अनार्को सिंडीकलीझम).

ज्या दोन परिस्थितींनी जर्मनी आणि इटलीमध्ये फासीवादला जन्म दिला, त्या दोन्ही परिस्थिती भारतामध्ये उपलब्ध होत्या. इथे जर्मनीसारखा औद्योगिक विकास झाला आहे आणि इटली इतका कुठला भाग मागास नसला तरी प्रशियाई मार्गाने झालेल्या क्रमिक भूमी सुधारणांमुळे युन्करांसारखा भांडवली जमीन मालकांचा वर्ग अस्तित्वात आहे. त्याच बरोबर भारतामध्ये एक श्रीमंत शेतकरी वर्ग - जो हरित क्रांती नंतर पंजाब, हरियाणा, पश्चिम उत्तर प्रदेश आणि अन्य बऱ्याच भागांत अस्तित्वात आहे - हा श्रीमंत शेतकरी वर्ग व्यवस्थेचा समर्थक आहे आणि त्याचे व्यवस्थेबरोबरचे संघर्ष फक्त शेतीमालाला योग्य भाव मिळावा ह्यापुरते मर्यादित असतात. आपल्या ह्या मागणीसाठी तो मध्यम आणि गरीब शेतकऱ्यांना स्वतःसोबत घेण्यात नेहमी यशस्वी होतो. चरण सिंग यांच्या काळात हा श्रीमंत शेतकरी आणि युन्कर वर्ग चरण सिंग यांच्या बरोबर होता. परंतु चरण सिंग यांच्या नंतर हा वर्ग तेलगु देसम, समाजवादी पक्ष आदी प्रादेशिक पक्षांच्या आश्रयास गेला किंवा भाजपप्रणीत फासीवाद्यांच्या आश्रयास गेला. येथे खास नमूद करण्याची गोष्ट ही की हे पक्ष कित्येक प्रसंगी फासीवाद्यांना समर्थन देत राहिले आहेत. खरे तर जर्मनी आणि इटलीमध्ये सुद्धा हेच झाले होते. अशा प्रत्येक पक्षाने नात्झी किंवा फासीवादी पक्षाला साथ दिली होती. युन्कर, श्रीमंत शेतकरी, मध्यम शेतकरी आणि इतकेच नाही तर गरीब शेतकऱ्यांचा एक हिस्सा फासीवाद्यांचा समर्थक बनतो. ह्या मागे मुख्यत्वे दोन कारणं दिसून येतात परंतु वेगवेगळ्या ठिकाणी अन्य कारणेसुद्धा असू शकतात. पहिले कारण, शेतकरी वर्गाची भूतकाळात रमण्याची अंतर्निहित प्रवृत्ती. शेतकरी वर्गाकडे कुठलेही भविष्योन्मुखी स्वप्नरंजन नसते. भांडवली विकासाबरोबर शेतकरी वर्गाचा एक मोठा भाग उध्वस्त होतो. अश्या वेळी तो स्वतः होऊन भांडवली समाजातील त्याच्या सर्वहाराकरणाची स्वतःची नियती समजू शकत नाही. तो जमीनीच्या त्या छोट्यामोठ्या तुकड्यांना चिटकून राहू इच्छितो जे वास्तवात त्याला काहीच देऊ शकत नाहीत. तो भूतकाळातील त्या दिवसांबद्दल खूपच भावूक असतो जेव्हा भांडवली जीवघेणी प्रतिस्पर्धा नव्हती आणि तो त्याच्या शेतीवर आरामशीर जगू शकत होता (पुन्हा, असा भूतकाळ कधीच नव्हता आणि हा भूतकाळ फक्त आणि फक्त त्याचे स्वप्नरंजन असते). जेव्हा जेव्हा एखादी पुनरुत्थानवादी शक्ती भूतकाळात घेऊन जाण्याचे नारे देते, स्वदेशीचा राग आळवते आणि ह्या सगळ्या थापांना धर्माच्या आवरणात गुंडाळते तेव्हा ह्या गोष्टी उध्वस्त होण्याच्या मार्गावर असलेल्या शेतकऱ्यांसोबतच मध्यम आणि श्रीमंत शेतकऱ्यांना भारी आवडतात. दुसरे कारण म्हणजे शेतकरी जीवनाचे सांस्कृतिक मागासलेपण. फासीवादी शक्ती कृषी जीवन आणि संस्कृती मधील लोकशाही मूल्यांच्या कमतरतेचा, मागासलेपणाचा आणि निरंकुशतेचा पुरेपूर फायदा उचलून त्यांना सामावून घेतात. फासीवाद एक आधुनिक विचारधारा आहे जी पुराणमतवादी आणि आधुनिकता विरोधी, लोकशाही आणि समानता विरोधी विचारांचा सोयीस्कर उपयोग करत एका आधुनिक प्रकारच्या राज्यसत्तेची स्थापना करते आणि सर्वात नग्न स्वरूपाच्या हुकुमशाहीची स्थापना करून भांडवली हितसंबंधांची रक्षा करते. शेतकऱ्यांच्या ह्या विभिन्न स्तरांना, जे फासीवादाचा संभावित आधार असतात, आपण ग्रामीण निम्न भांडवलदार वर्ग म्हणू शकतो. हा वर्ग १९८० च्या दशकाच्या मध्यापासून भाजपचा समर्थक बनू लागला होता. त्या वेळेपर्यंत चरण सिंग यांचे राजकारण मागे पडले होते आणि श्रीमंत शेतकऱ्यांच्या हितसंबंधांना बुर्झ्वा लोकशाही चौकटीत बसवण्यास सक्षम शक्ती राष्ट्रीय पातळीवर अस्तित्वात नव्हती. भाजपने ह्याच पोकळीचा फायदा उचलून श्रीमंत शेतकऱ्यांना आपल्या सोबत घेण्यास सुरुवात केली आणि शेतकऱ्यांच्या सर्व स्तरांमध्ये आपला फासीवादी प्रचार करण्यास सुरुवात केली.

ग्रामीण निम्न भांडवली वर्गाव्यतिरिक्त शहरांमधील निम्न भांडवली वर्गसुद्धा फासीवाद्यांचा जबरदस्त समर्थक असतो. खरे तर, फासीवाद्यांचा सर्वात शक्तिशाली आणि परंपरागत सामाजिक आधार हाच वर्ग असतो. ह्या वर्गात छोटे भांडवलदार, दुकानदार, दलाल, एजंट, किरकोळ मालाचे उत्पादन करणारे छोटे उत्पादक, सरकारी कर्मचारी आणि पांढरपेशा कामगार वर्ग ज्यांना अभिजन कामगार वर्ग सुद्धा म्हटले जाते, यांचा अंतर्भाव असतो. १९८० च्या दशकापूर्वी हा सबंध वर्ग काँग्रेसचा पारंपारिक समर्थक होता. तोपर्यंत सार्वजनिक क्षेत्रातील भांडवलशाहीचा काळ सुरू होता. नेहरू युगाचा प्रभाव पूर्णपणे ओसरला नव्हता. स्वातंत्र्यानंतर समृद्धी, प्रगती आणि विकासाची जी स्वप्ने सार्वजनिक क्षेत्र, बँकांचे राष्ट्रीयकरण आणि 'समाजवाद' आणि कल्याणकारी राज्याच्या माध्यमातून दाखवले गेले होते, ती भंग होण्यास सुरुवात झाली होती पण पूर्णपणे भंग झाली नव्हती. १९८० च्या मध्यापर्यंत भारतीय भांडवलदार सार्वजनिक क्षेत्राच्या चौकटीत डांबले गेल्यामुळे अस्वस्थ होण्यास सुरुवात झाली होती. १९४७ पासून १९८० पर्यंत सार्वजनिक क्षेत्र हे भारतीय भांडवलशाहीची गरज होती. स्वातंत्र्यपूर्व काळात अर्धमेला झालेल्या भांडवलदार वर्गाला स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी भारतीय राज्याला मोठ्या भांडवलदाराची भूमिका बजावावी लागणार होती. परमिटराज आणि लायसन्सराजचा हाच तो काळ. नंतर सार्वजनिक क्षेत्राचा हा पिंजरा, जो प्रारंभी भांडवलदार वर्गाच्या सुरक्षिततेसाठी उभारला गेला होता, त्याच्या विकासात बाधा ठरू लागला. भारतीय भांडवल आता ह्या पिंजऱ्यात मोकळा श्वास घेऊ शकत नव्हते आणि त्याला आता मुक्त बाजार आणि मुक्त प्रतिस्पर्धेची आवश्यकता भासू लागली होती. जर हे केले नसते तर ते भारतीय भांडवलदारांच्या अस्तित्वासाठी धोकादायक होते. परिणामतः, भारतीय भांडवलदारांचे सेवक असलेल्या भारतीय राज्यसत्तेने सार्वजनिक क्षेत्र, विनियमन, लायसन्सराज, इन्स्पेक्टर राज संपुष्टात आणण्यास सुरुवात केली. जो पर्यंत कल्याणकारी राज्य कायम होते तोपर्यंत निम्न भांडवलदार वर्गास तुलनात्मकरीत्या हे चांगले होते आणि असुरक्षितता आणि अनिश्चितता तुलनेने कमी होती. पण जेव्हा आर्थिक उदारीकरण-खाजगीकरण सुरु झाले तेव्हा त्या वर्गांना त्याची धग जाणवू लागली. खूप कमी लोकांना हे माहित आहे की भारतीय भांडवली राज्याने 'नवीन आर्थिक धोरण' चे पिल्लू सर्वप्रथम १९९१ मध्ये नरसिंह राव-मनमोहन सिंग सरकारच्या काळात सोडले नव्हते. १९८५ मध्ये राजीव गांधी सरकारच्या काळात

**पान ९ वर**

# फासीवाद म्हणजे काय आणि त्याविरुद्ध लढायचे कसे?

पान ८ वरुन

सर्वप्रथम 'नवीन आर्थिक धोरण' बद्दल बोलले गेले आणि उदारीकरण आणि खाजगीकरण करण्याबद्दल बोलले गेले. राजीव गांधी सर्व सभांमध्ये लायसन्सराज आणि परमिटराज हे विकास विरोधी असल्याची टीका करत आणि उदारीकरण करण्याचे संकेत देत असत. १९८६ मध्ये नवीन शैक्षणिक धोरणांच्या माध्यमातून ह्याच धोरणांना पुढे घेऊन जाण्याचे काम केले गेले. त्यानंतर १९९१ मध्ये भांडवलदार वर्गाने हि प्रक्रिया सार्वजनिक क्षेत्रातील भांडवलशाहीच्या भयंकर अशा आर्थिक संकटानंतर सुरु केली. त्याचे सूत्रधार होते तत्कालीन वित्तमंत्री मनमोहन सिंग. त्या नंतर जवळपास १८ वर्षे उलटली आहेत. परंतु नवीन आर्थिक धोरण ची सुरुवात १९८० च्या दशकाच्या मध्यापासून मानली गेली पाहिजे. जर आपण असे मानले तर उदारीकरणाच्या धोरणांना लागू करून २५ वर्षे उलटून गेली आहेत. ह्या दरम्यानच्या काळात देशात गरिबी, उपासमार अभूतपूर्व वेगाने वाढली आहे. १९८० च्या दशकापर्यंत मध्यमवर्ग आणि निम्न मध्यमवर्ग आणि त्याच बरोबर सामान्य जनतेची सगळी स्वप्ने धुळीला मिळाली होती. त्यातून सबंध जनतेत नैराश्याचे वातावरण होते. स्वदेशी आणि छोट्या उद्योगधंद्यांच्या भवितव्याची भाषा करत भाजपने सुद्धा सत्तेवर आल्यानंतर जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण ह्या धोरणांनाच वेगाने गती दिली. त्यापुढे जाऊन, भाजप सरकारच्या काळातच अरुण शौरींच्या नेतृत्वाखाली निर्गुंतवणूक मंत्रालय तयार करण्यात आले, ज्याला खरे तर खाजगीकरण-बेरोजगारी मंत्रालय म्हणणे अधिक न्यायोचित ठरेल. छोट्या भांडवलदारांच्या हितांबद्दल गळे काढणाऱ्या भाजपने मोठ्या भांडवलदारांची सेवा अन्य कुठल्याही पक्षापेक्षा जास्त केली. ह्यावरून आपोआपच फ्रान्सीसी मार्क्सवादी इतिहासकार डेनियल गुएरिन यांचे वक्तव्य आठवते ज्यात त्यांनी म्हटले होते - "फासीवाद केवळ मोठ्या भांडवलदारांचा चाकर नसून किरकोळ भांडवलदारांचा रहस्यवादी उदय सुद्धा असतो". जागतिकीकरण आणि उदारीकरणाच्या २५ वर्षांमध्ये मोठ्या प्रमाणात छोटे भांडवलदार उध्वस्त झाले. छोटे उत्पादक, दुकानदार, नोकरदार वर्ग उध्वस्त झाला त्याच बरोबर ग्रामीण भागातील निम्न भांडवली वर्ग सुद्धा उध्वस्त झाला. मोठ्या प्रमाणात लोक देशोधडीला लागले आणि जे लागले नाहीत त्यांच्या डोक्यावरसुद्धा कामगार कपातीची, टाळेबंदीची, नोकरीवरून काढून टाकले जाण्याची आणि कंत्राटीकरणाची टांगती तलवार सतत टांगलेली असते. याचाच अर्थ संपूर्ण निम्न भांडवली वर्गासमोरच भविष्याबद्दलची असुरक्षितता आणि अनिश्चितता वेगाने वाढली आहे. अशा वेळी जर सामान्य जनतेला हे सांगणारी क्रांतिकारी शक्ती अस्तित्वात नसेल की ह्या सर्व असुरक्षिततेला आणि अनिश्चिततेला खऱ्या अर्थाने भांडवलशाही जबाबदार आहे आणि भांडवलशाहीमध्ये निम्न भांडवलदार वर्गाची हीच नियती आहे की त्याच्या एका अगदी लहान हिश्श्याला वरच्या दिशेने जायचे आहे तर बाकीच्या बहुतांश हिश्श्याचे सर्वहारा आणि अर्ध-सर्वहारा मध्ये रुपांतर होणार आहे, तर निश्चितपणे त्यांच्यात प्रतिक्रियावादाची जमीन निर्माण होते. दीर्घकालीन असुरक्षितता आणि अनिश्चिततेतून आलेल्या हताशेतून ती तयार झालेली असते. ह्याचाच फायदा फासीवादी शक्ती घेतात आणि भारतात सुद्धा त्यांनी तो घेतला. ह्या असंतोषाचे लक्ष्य संघाने मुस्लिमांना आणि विस्थापितांना बनवले. अशा कोंडीच्या प्रसंगी जनतेमधील असंतोषास अतार्किक आणि प्रतिक्रियावादी मार्गावर घेऊन जाणे फासीवाद्यांसाठी विशेषत: सोपे जाते. ह्याची पार्श्वभूमी संघ त्याच्या स्थापनेपासूनच निर्माण करत होता. त्यांच्या शाखांमध्ये, संस्कृती केंद्रांमध्ये, शिशु मंदिरांमध्ये सातत्याने भूतकाळापासून वर्तमानकाळापर्यंत हिंदूंच्या सर्व समस्यांसाठी मुस्लिमांना जबाबदार ठरवले जात होते. १९८० नंतर समाजामध्ये रुजवलेले हे विषारी बीज अंकुरित होण्यासाठीची अनुकूल परिस्थिती तयार होऊ लागली होती. हेच कारण होते की संघाची उपस्थिती स्वातंत्र्यानंतर सतत राहिली असूनही आणि धार्मिक दंगे पसरवण्यात त्यांची भूमिका असूनही १९८० पर्यंत संघाची ओळख ब्राह्मण-व्यापाऱ्यांची संघटना अशीच होती. परंतु १९८० नंतर संघाचे वलय अधिक व्यापक झाले आणि फासीवादाचा उदय एका परिघटनेच्या रुपात वास्तविकता म्हणून पुढे आला. रामजन्मभूमी आंदोलन, रथयात्रा, बाबरी मशिदीचे उध्वस्तीकरण, १९९१चे आर्थिक संकट ह्यानंतर १९९५ पर्यंत उदारीकरण-खाजगीकरणाच्या विनाशकारी परिणामांनंतर भारतातील फासीवादी आंदोलन हिंदुत्ववाद, स्वदेशीवाद आणि राष्ट्रवादाच्या बुरख्यात कित्येक पटींनी अधिक शक्तिशाली बनले. १९८० नंतर फासीवाद्यांचे एका आंदोलनाच्या रुपात पुढे येणे हा केवळ एक योगायोग नव्हता. (इथे हे स्पष्ट करणे गरजेचे आहे आंदोलन शब्द नेहमी अशा पद्धतीने वापरला जातो की अनिवार्यतः आंदोलन ही एक सकारात्मक गोष्ट आहे. परंतु ह्या शब्दामध्ये असे काहीही नाही जे त्याला आपोआप सकारात्मक बनवेल. ही सकारात्मकता आंदोलन कोणाचे आहे आणि कोणाच्या नेतृत्वाखाली लढले जात आहे ह्यावर निर्भर असते). आर्थिक आणि भौतिकदृष्ट्या फासीवादासाठी अनुकूल परिस्थिती अधिक अनुकूल झाल्या कारणाने फासीवाद एका आंदोलनाच्या रुपात पुढे येऊ शकला.

उदारीकरण आणि खाजगीकरणाच्या २५ वर्षांमध्ये भारतीय समाजामध्ये जनतेच्या एका मोठ्या भागाला त्याच्या जमिनी पासून, रोजगारांपासून उध्वस्त करून निम्न भांडवली वर्ग, कामगार वर्ग आणि मध्यम वर्ग ह्यांच्या मध्ये त्याच अनिश्चिततेचे आणि असुरक्षिततेचे वातावरण तयार केले गेले जे जर्मनीमध्ये २० वर्षांच्या जलद भांडवली विकासामधून तयार झाले होते. हे सत्य आहे की भारतामध्ये ह्या प्रक्रियेची व्यापकता जर्मनी इतकी नव्हती. काही मार्क्सवादी सिद्धान्तकार ही गोष्ट समजू शकले नाहीयेत. त्यांच्या पैकीच एक सिद्धांतकार प्रभात पटनायक आणि त्यांच्या सोबत एजाज अहमद वास्तविकतेवर आश्चर्यचकीत होतात की भारतात औद्योगीकरण इतक्या वेगाने झाले नाही जितक्या वेगाने ते जर्मनीमध्ये झाले (त्यामुळे भारतामध्ये बेरोजगारी, उध्वस्तीकरण आणि गरिबी त्या वेगाने वाढली नाही जितक्या वेगाने ती जर्मनीमध्ये वाढली होती) आणि तरीही भारतामध्ये तुलनात्मकदृष्ट्या हळू झालेल्या औद्योगिकरणातून फासीवादाचा उदय कसा झाला. परंतु ते हे विसरतात की भारताच्या वसाहतवादी इतिहासामुळे भारतीय समाजाला भीषण गरिबी आणि बेरोजगारी आंदण म्हणून मिळाली होती. पूर्वीपासून अस्तित्वात असलेल्या गरिबीला व बेरोजगारीला उदारीकरण आणि खाजगीकरणामुळे भीषण रूप मिळाले. जर्मनी आणि इटली मधील समाजाप्रमाणे ह्या समस्या केवळ एका औद्योगीकरणाच्या कालखंडाची उत्पत्ती नव्हत्या तर त्या पूर्वी पासून भारतीय समाजात अस्तित्वात होत्या. जर्मनी आणि इटलीमध्ये द्रुत गतीने झालेल्या औद्योगीकरणाच्या प्रक्रियेने जी भूमिका बजावली तीच भूमिका भारतामध्ये जागतिकीकरण, खाजगीकरण आणि उदारीकरणाच्या प्रक्रियेने बजावली - ती म्हणजे, संपूर्ण समाजामध्ये असुरक्षितता आणि अनिश्चिततेचे वातावरण तयार करुन फासीवादी प्रतिक्रियेसाठी अनुकूल वातावरण तयार करणे.

काही मार्क्सवादी विचारवंतांनी जर्मनी आणि इटलीच्या तुलनेत अजून एक फरक अधोरेखित केला आहे. ह्या लोकांच्या मते जर्मनी आणि इटली मध्ये फासीवादी आंदोलनाच्या उत्थानाच्या काळात जागतिक पटलावर एका बलाढ्य अशा समाजवादी देशाचे अस्तित्व होते आणि त्याच बरोबर ह्या दोन्ही देशांमध्ये मजबूत असे कम्युनिस्ट आंदोलन उपस्थित होते. जर्मनी आणि इटली मधील भांडवलदार वर्गाने फासीवाद्यांना ज्या तत्परतेने समर्थन देऊ केले त्याचे एक कारण हेही होते की ते समाजवाद आणि होऊ घातलेल्या कामगार क्रांतींना घाबरले होते. भारतामध्ये अशी परिस्थिती नाही. भारतामधील भांडवलदार वर्गाने फासीवाद्यांची साथ इतक्या तत्परतेने दिलेली नाही. त्याने अधून-मधून भाजप ला साथ दिली आहे पण त्याच बरोबर त्याने वेळ पडल्यास आणि गरजेनुसार काँग्रेसला समर्थनसुद्धा दिले आहे. उदाहरणार्थ, आज कल्याणकारी राज्य आणि तत्सम धोरणांची गरज आहे. भांडवलदार वर्गाचा एक भाग ही गोष्ट समजतो. संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या दिखावू सुधारवादाला भांडवली वर्ग आज समर्थन देत आहे. त्याच बरोबर, दुसऱ्या बाजूने हे सरकार क्रांतिकारी शक्तींवर फास आवळण्याचे कामसुद्धा करत आहे. ह्या सरकारने मनरेगा आणि खाद्य सुरक्षा सारख्या काही योजनांच्या बरोबरच खाजगीकरण आणि उदारीकरण ह्यांनाही उघड उघड चालू ठेवले आहे आणि त्यांची सध्या ही क्षमता सुद्धा आहे की ते हे सगळे सध्यापुरते का होईना चालू ठेऊ शकतील. त्यामुळेच आज नग्न भांडवली हुकुमशाहीची गरज नाहीये. हेच कारण आहे की भाजप आज राष्ट्रीय पातळीवर दयनीय अवस्थेमध्ये आहे. परंतु आर.एस.एस. चे फासीवादी नेटवर्क आजही संपूर्ण शक्तीनिशी अस्तित्वात आहे. जेव्हा कधी ह्या कल्याणकारी राज्याची प्रासंगिकता संपुष्टात येईल, तेव्हा भांडवलदार वर्गाला ह्या फासीवादी चेहऱ्याची आवश्यकता पडू शकते. तसेही, आज फासीवाद सत्तेमध्ये नसताना सुद्धा साखळीने बांधलेल्या कुत्र्याची भूमिका बजावतच आहे. कामगार चळवळीमध्ये खास करून ह्याचा प्रत्यय येतो. त्याच बरोबर, समाजामधील ह्या संघी दहशतवादी टोळीची उपस्थिती क्रांतिकारी शक्तींसाठी 'काउण्टर वेट'चे काम करते. जर्मनीच्या उदाहरणातून आपण अगोदरच बघितले आहे की कल्याणकारी राज्याची परिणती ही अधिक प्रतिक्रियावादी भांडवली राज्यामध्ये होते. भारतामध्ये ह्याची पुरेपूर शक्यता आहे. सध्याचे जागतिक साम्राज्यवादी आर्थिक संकट टळेलही, पण चक्रीय क्रमात येणारे पुढचे संकट ह्या पेक्षा अधिक गंभीर असेल ह्याचे संकेत आता पासूनच मिळत आहे. भारतीय अर्थव्यवस्था जागतिक वित्तीय बाजाराशी अजूनही पूर्णपणे जोडली गेलेली नसल्यामुळे थोडी-फार बचावली आहे पण पुढे चालून हे शक्य होणार नाही. आगामी काळात जेव्हा भारतीय अर्थव्यवस्थेच्या कुठल्याही गंभीर संकटात फसेल तेव्हा बेरोजगारी आणि गरिबी, जी आधीच धोकादायक पातळीच्या वरती आहे, आणखीनच वाढेल. अशात, क्रांतिकारी शक्यतासुद्धा निर्माण होईल, अर्थात जन-असंतोषाला एका योग्य दिशा दाखवून, मोर्चाबंद, संघटीत करून व्यवस्था परिवर्तनाच्या दिशेने जायची शक्यता; आणि त्याच बरोबर, फासीवादी शक्यता सुद्धा निर्माण होईल, अर्थातच कुठल्याही क्रांतिकारी नेतृत्वाच्या अनुपस्थिती मध्ये जनतेमधील नैराश्य आणि असुरक्षिततेच्या भावनेला प्रतिक्रियावादाच्या दिशेने नेऊन नग्न अशा भांडवली फासीवादी हुकुमशाहीकडे घेऊन जाणे. ह्या दुसऱ्या शक्यतेला वास्तवामध्ये बदलण्यास सक्षम अशी नेतृत्वकारी फासीवादी शक्ती आज देशभरात व्यापक स्तरावर उपस्थित आहे. परंतु अशा प्रकारची कुठलीही अखिल भारतीय क्रांतिकारी पार्टी उपस्थित नाही. आता आपले भवितव्य ह्या गोष्टीवर निर्भर आहे की आपण अशा क्रांतिकारी शक्तीच्या उभारणीची जबाबदारी आपल्या खांद्यांवर घेण्यास तयार आहोत की नाही.



शेवटचा फरक, जो काही मार्क्सवादी विचारवंत अधोरेखित करतात तो म्हणजे - युरोपमधील फासीवादी उत्थानावेळी, भांडवलशाही ज्या जागतिक महामंदीचा सामना करत होती तशी कुठलीही मंदी सध्या अस्तित्वात नाही. परंतु, सध्या जागतिक मंदीमुळे त्यांना त्यांच्या शब्दांवर पुनर्विचार करण्यास भाग पाडले आहे. हे सत्य आहे की तोच घटनाक्रम पुन्हा घडणे शक्य नाही. इतिहासाची जशास तशी पुनरावृत्ती होणे शक्य नसते. आता जागतिक साम्राज्यवादामध्ये झालेल्या परिवर्तनामधून काही गोष्ट अगदी स्पष्ट झाल्या आहेत. जागतिक भांडवलशाही मध्ये आता मंदी आणि तेजीचे चक्र चालत नाही. आता एक कमी तीव्रतेची मंदी सतत अस्तित्वात असते आणि अधून मधून तिची तीव्रता वाढते. १९९५ ते २००६ दरम्यान चार तीव्र स्वरूपाच्या मंदी जागतिक अर्थव्यवस्थेने अनुभवल्या, ज्यामध्ये आपण नुकतीच अनुभवलेली मंदी सर्वात तीव्र स्वरूपाची होती. आता भांडवली अर्थव्यवस्थेमध्ये तेजीचा काळ येतच नाही. भांडवलशाही पूर्वी जेवढी रोजगार निर्मिती करू शकत असे तितकी रोजगार निर्मिती आता करूच शकत नाही, कारण भांडवल आता कैक पटींनी अधिक परजीवी झाले आहे आणि उत्पादनामधील भांडवली गुंतवणुकीच्या शक्यता 'नाही'चा जवळपास पोहचल्या आहेत. त्यामुळेच बेरोजगारीचा अचानक स्फोट न होता बेरोजगारी एक नित्याची स्थायी गोष्ट बनली आहे. जे इतिहासकार नवीन फासीवादी उत्थानाच्या प्रत्येक पैलूचे मूळ इतिहासात शोधण्याचा प्रयत्न

पान १० वर

# फासीवाद म्हणजे काय आणि त्याविरुद्ध लढायचे कसे?

पान ९ वरून

करतील त्यांना बऱ्याच अनुत्तरीत प्रश्नांना सामोरे जावे लागेल. कारण इतिहासाची जश्यास तशी पुनरावृत्ती होत नसते. जर कोणी जबरदस्ती हे करू पाहत असेल तर - मार्क्सच्याच शब्दांमध्ये - ती व्यक्ती प्रहसन बनून जाईल. यांत्रिक मार्क्सवाद्यांच्या विश्लेषणाची हीच मोठी अडचण आहे. आज फासीवादाचे उत्थान अगदी पूर्वी सारखे नसेल. जागतिक भांडवली व्यवस्थेमध्ये जागतिकीकरणाच्या कालखंडामध्ये जे बदल घडले आहेत त्या नुसार फासीवादाच्या उत्थानाच्या स्वरूपामध्येसुद्धा निश्चितपणे बदल येतील. हा एका वेगळ्या चर्चेचा विषय आहे, जो एका वेगळ्या लेखामधून चर्चिला जाऊ शकतो. एका महत्वपूर्ण कारकाकडे लक्ष वेधून आपण पुढे जाऊयात. जर्मनीमध्ये नाझी पक्षाला आणि इटली मध्ये फॅसिस्ट पक्षाला संकटाचे समाधान राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या परीघामध्ये करावयाचे होते. जर्मनी आणि इटलीमध्ये फासीवाद जेमतेम २०-२५ वर्षांच्या आतच सत्तेमध्ये येण्याचे कारण हेच होते की त्या वेळी जागतिक भांडवलशाहीमध्ये राष्ट्र-राज्यसंस्था ह्यांची भूमिका अत्यंत महत्वाची होती. ती आज सुद्धा कायम आहे पण तिच्यात काही बदल झाले आहेत. भांडवलासाठी श्वास घेण्यासाठी कमी संधी होत्या. त्या उलट आज जागतिकीकरणाच्या काळात भांडवल राष्ट्रीय सीमा ओलांडून जागतिक पातळीवर प्रवाहित झाले आहे. भांडवलासाठी अंतर्विरोध आणि संकटांचा सामना करण्यासाठीचा मंच राष्ट्रीय अर्थव्यवस्था नसून जागतिक अर्थव्यवस्था झाला आहे. त्यामुळेच जागतिकीकरणाच्या ह्या काळात फासीवाद त्या वेगाने सत्तेत येणे शक्य नाही ज्या वेगाने तो जर्मनी आणि इटली मध्ये सत्तेत आला होता. फासीवाद जर सत्तेत आला तर त्याचे स्वरूप काय असेल हे आताच सांगता येणे अवघड आहे. परंतु हे सत्य आहे की ज्या प्रकारे राष्ट्रीय अर्थव्यवस्थांच्या सीमा संतृप्त झाल्या होत्या, त्याच प्रमाणे जागतिक अर्थव्यवस्थेची सीमा सुद्धा संतृप्त होईल आणि तशी ती होतही आहे, जसे सध्याच्या साम्राज्यवादी संकटाने दाखवून दिले आहे. आता ह्या नवीन जागतिक राजकीय, आर्थिक आणि सामाजिक चौकटीत फासीवादाच्या सत्तेमध्ये येण्याच्या परिस्थितीमध्ये त्याचे स्वरूप आणि कार्य पद्धती काय असेल हा स्वतंत्र संशोधनाचा विषय आहे.

फासीवादाच्या उत्थानाच्या ज्या मुलभूत कारणांची मीमांसा आपण केली आहे ती कारणे फासीवादाच्या उत्थानाची सामान्य कारणे असतात. ही कारणे जर्मनीमध्ये उपलब्ध होती, इटली मध्ये उपलब्ध होती आणि भारतामध्ये सुद्धा उपलब्ध आहेत. ह्या पैकी, सामाजिक-लोकशाहीवाद्यांचा विश्वासघात आपल्यासाठी सर्वात महत्वाचे कारण आहे. भारतामध्ये सुद्धा त्यांची उपस्थिती आहे. सी.पी.आई. आणि सी.पी.एम.च्या नेतृत्वाखाली ट्रेड युनियन आंदोलन तीच भूमिका बजावत आहे जी त्यांनी जर्मनीमध्ये बजावली होती. इथेसुद्धा संशोधनवादी आणि ट्रेड युनियनचे नेतृत्व कामगारांना सुधारवाद, अर्थवाद आणि अराजकतावादी संघाधिपत्यवादाच्या चौकटीमध्ये अडकवून ठेवण्याचे काम करत आहेत. इथे ट्रेड युनियन आंदोलन आणि सामाजिक-लोकशाहीवादी भांडवलदारांना असे अर्थवादी करार करण्यास भाग पाडू शकत नाही जे त्यांनी जर्मनी मध्ये केले होते. परंतु भारतातील भांडवलदार वर्ग जर्मनीमधील तत्कालीन भांडवलदार वर्गाच्या तुलनेमध्ये खूपच कमकुवत आहे आणि ट्रेड युनियन आंदोलनामधून भारतीय भांडवलावर जेवढा दबाव आला आहे तो भांडवलदार वर्गाचा नफ्याचा दर कमी करण्यासाठी पुरेसा आहे. श्रम कायद्यांमुळे भारतीय भांडवलाचा कोंडमारा होतो आहे. इथे हे लक्षात घेण्याची गरज आहे की भारतातील सध्याचे श्रम कायदे हे तत्कालीन जर्मनी आणि इटलीमधील श्रम कायद्यांच्या तुलनेत तसूभरही कमी नाहीत, किंबहुना कित्येक बाबतीत त्यापेक्षा अधिकच कडक आहेत. काही दिवसांपूर्वीच 'फिक्की'च्या एका भांडवलदाराने म्हटले सुद्धा होते की श्रम कायद्यांमुळे 'नफ्याच्या आकुंचना'चा सामना करावा लागत आहे. जर्मनीमधील भांडवलदारांनी सुद्धा अगदी ह्याच शब्दाचा उपयोग केला होता. हा केवळ एक योगायोग नक्कीच नाही. भारतातील सामाजिक लोकशाहीवादी इतके शक्तिशाली नाहीत जितके जर्मनी मध्ये होते, पण त्याच बरोबर भारतातील भांडवलशाहीसुद्धा इतकी शक्तिशाली नाही जितकी जर्मनीमधील भांडवलशाही होती. थोड्या बहुत फरकाने हे प्रमाण समानच मिळेल.

भारतामध्ये कुठलीही लोकशाही क्रांती झालेली नाही त्यामुळे संपूर्ण जनतेमध्ये लोकशाही चेतनेचा मोठा अभाव आहे आणि एक प्रकारची भयानक अशी निरंकुशता अस्तित्वात आहे, जी जनतेच्या मनोविश्वामध्ये फासीवादाचा आधार तयार करते. इथे सुद्धा क्रांतिकारी भूमी सुधारणा झालेल्या नाही आणि क्रमिक स्वरूपाच्या जमीन सुधारणांनी प्रतिक्रियावादी युन्कर वर्गाला आणि हरित क्रांतीने प्रतिक्रियावादी आधुनिक श्रीमंत शेतकरी वर्गाला जन्म दिला. इथेसुद्धा निम्न भांडवलदार आणि छोट्या उद्योजकांची मोठी संख्या आहे, जी भांडवली विकासाबरोबर वेगाने उध्वस्त होते आणि प्रतिक्रीयावादाच्या बाजूने उभी होते. त्याच बरोबर, इथे सुद्धा सामाजिक, आर्थिक उतरंडीमध्ये वरच्या दिशेने अग्रेसर प्रतिक्रियावादी नवधनाढ्य वर्ग अस्तित्वात आहे जो जागतिकीकरणाच्या माध्यमातून होणाऱ्या असमतोल विकासाची मलई खात आहे. ह्या मध्ये मोठा पगार मिळवणारा नोकरदार वर्ग, ठेकेदार वर्ग, व्यापारी वर्ग आणि नोकरशहा इत्यादी सहभागी आहेत. इथे कामगार वर्गाचा एक मोठा हिस्सा अजूनही कृषी-मानसिकतेमध्ये जगत आहे आणि तो पूर्णपणे उत्पादनाच्या साधनांपासून तोडला गेला नाहीये. तो भौतिक परिस्थिमुळे सर्वहारा चेतनेकडे आकर्षित होतो, पण त्याच बरोबर स्वतःच्या इतिहासोन्मुखी आकांक्षा आणि छोट्यामोठ्या उत्पादन साधनांचा मालक असल्याने निम्न भांडवली चेतनेकडेसुद्धा आकर्षित होतो. परिणामतः, सर्वहारा चेतनाकरणाची प्रक्रिया तिच्या निष्कर्षापर्यंत पोहोचू शकत नाही आणि ह्या वर्गाचा एक हिस्सासुद्धा फासीवादी प्रचार आणि प्रतिक्रियेसमोर नतमस्तक होतो आणि बहुतेक वेळा त्यांचा बळी पडतो. भारतामध्ये सुद्धा लंपट सर्वहाराची एक मोठी लोकसंख्या अस्तित्वात आहे, जी फासीवादी गर्दीमध्ये सहभागी होते. ही काही सामान्य कारणे आहेत जी फासीवादाच्या उत्थानामध्ये महत्वपूर्ण भूमिका बजावतात. आजच्या काळात सुद्धा ही कारणे तेवढीच लागू पडतात. आजच्या संभावित फासीवादी उत्थानामध्ये नाविन्याच्या आणि परिवर्तनाच्या काही पैलूंकडे आम्ही संक्षिप्त रुपात इशारा केला आहे. भांडवलशाहीच्या कार्यपद्धतीमध्ये जे बदल झाले आहेत त्यामुळे हे पैलू तयार झाले आहेत. त्यावर पुन्हा कधी तरी!

आज भारतामध्ये फासीवादी उत्थानाचा सामना करण्यासाठी कम्युनिस्ट क्रांतीकारकांना काय करावे लागेल? आपल्याला कामगार, विद्यार्थी, तरुण, स्त्रिया, दलित आणि धार्मिक अल्पसंख्यांकांमध्ये सर्वहारा क्रांतिकारी संघटना कशा पद्धतीने उभाराव्या लागतील? कामगार आघाडीवर आणि अन्य सर्व आघाड्यांवर फासीवाद्यांना शिकस्त कशा प्रकारे देता येऊ शकेल? कम्युनिस्ट क्रांतीकारकांना फासीवादी आतंकवादी समूहांचा सामना कसा करता येईल? निम्न-भांडवलदार वर्गाविषयी आपला दृष्टीकोन काय असायला हवा? कामगारांमध्ये फासीवादी विचारांचा प्रसार रोखण्यासाठी आपल्याला कोणती पाऊले उचलावी लागतील? शहरी मध्यमवर्गात फासीवादी विचारधारेला पराभूत करण्यासाठी काय करावे लागेल?

**हे काही असे प्रश्न आहेत ज्यांची उत्तरे आपल्याला द्यावीच लागतील आणि यापुढे आपण ह्याच प्रयत्न करणार आहोत. आपण बघितलेच आहे की भांडवली संकट फासीवादी प्रतिक्रियावादासाठी आणि त्याच बरोबर क्रांतीसाठी सुद्धा अनुकूल परिस्थिती तयार करते. प्रश्न केवळ हा असतो की त्यासाठी क्रांतिकारी नेतृत्व तयार आहे की नाही. इथे आपण डैनिएल गुएरिनच्या वक्तव्याचा आधार घेऊन थांबुयात – "जर आपण समाजवादाची वेळ जाऊ दिली तर आपली शिक्षा असेल फासीवाद".**

# कष्टकरी सामान्य जनतेच्या आरोग्याचा पंचनामा आणि मोदी-योगीच्या जुमलेबाजीचं नग्न वास्तव

पान १ वरून

**खंत व्यक्त करत गळा काढला होता. आणि सत्तेवर येताच 'सर्व ठिक' करण्याचं स्वप्नं ही दाखवलं होते.** याच 'एन्सेफलायटीस' विरोधी आपण संघर्ष करत असल्याची टिमकी वाजवतच योगी आदित्यनाथ सत्तारुढ झालेत. हेच योगीजी लोकसभेत अनेकदा सार्वजनिक आरोग्य आणि बालकांचं आरोग्य यावर सतत प्रश्न विचारत असतात. पण तरीही 'ऑक्सिजन' पुरवठा सुरळीत करण्यासाठी भाजपाची दोन्ही सरकारे (केंद्र व राज्य) ६८ लाख रुपयांची गरज पूर्ण करू शकले नाहीत. अजूनही अतिदक्षता विभागाच्या विस्ताराचा प्रस्ताव व त्यासाठीची १० कोटी रूपयांची तरतुद त्यांना करता येत नाही. उलट बजेट मध्ये राज्यातील एकूण मेडिकल कॉलेज व संलग्न रुग्णालयासाठीची आर्थिक तरतूद रू २३४४ कोटी वरून यावर्षी रू ११४८ कोटी म्हणजे निम्मी करण्यात आली आहे. पैकी बीआरडी मेडिकल कॉलेजला मिळणारं रू १५.९ कोटीचे आर्थिक सहाय्य ७.८ कोटी इतकं कमी केले. मशीन व उपकरणासाठी असलेली तरतूद ३ कोटी वरून ७५ लाखांपर्यंत कमी केली गेली आहे. त्यावर कडी म्हणजे रुग्णालयातील पीएमआर कर्मचाऱ्यांचा २७ महीन्यांचा पगार थकीत आहे तो वेगळाच. अशा रीतीने जनतेच्या आरोग्यावरील खर्चात कपात करत जनतेच्या आरोग्याशी खेळलं जात आहे. या सगळ्यांची शिक्षा तिथली निष्पाप मुलं भोगत आहेत. यांचे "गोप्रेम" मतदानासाठी आणि "जनतेचं आरोग्य" सत्तेसाठीचा मार्ग प्रशस्त करणारे मुद्दे आहेत, याहून काहीनाही, हे उघडच आहे.

इतकं कमी होते म्हणून की काय, **सत्तेच्या मग्रुरीत असणाऱ्या अनेक भाजपाच्या ज्येष्ठ नेत्यांनी जणू फार काही गंभीर न झाल्याचा आव घेत 'दिवसाला २० बालकांचा मृत्यु' ही सामान्य बाब असल्याची निर्लज्ज विधानं केली होती.** 'ऑगस्ट महीन्याच्या सुरुवातीला अशी मुलं मरत असतात' असंही विधान भाजपाच्या एका केंद्रिय मंत्र्यांने केलं, त्याच्या जोडीला अशाच एका जेष्ठ मंत्र्यांनेही 'अत्याधुनिक सेवा सरकारी रुग्णालयात पुरवणं शक्य नसल्याचं' सांगितलं. यांच्या अशा निर्लज्य विधानांच आश्चर्य वाटत नाही कारण हे त्याच हिटलरच्या अनौरस औलादी आहेत ज्याने कित्येक निरपराधांना गॅस चेंबरमध्ये कोंडून मारलं होते. ज्यात कितीतरी कोवळ्या जीवाची हत्या करण्यात आली होती. फासीवाद्यांच मुळ चरित्रच खोटेपणा आहे; त्याचीही प्रचिती येतेच, योगी आदीत्यनाथ म्हणतात की त्यांना या बाबत माहीत नव्हतं पण पुरवठा कंपनीने या बाबत स्पष्ट कल्पना देणार पत्र पाठवल्याचं स्पष्ट केलं आहे. प्रशासनालाही या मृत्युंबाबत फार गंभीर असं काही वाटत नाहीं.

खरतरं संपूर्ण आरोग्य व्यवस्थाच आज आजारी आहे. भारतीय राज्यघटना भाग ३ कलम २१ मध्ये 'जीवितांच्या रक्षणाचा अधिकार' तर देते, पण जगण्यासाठीच्या पूर्वअटी म्हणजे अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य व शिक्षणाच्या जबाबदारीतून अंग बाहेर काढत आहे. सार्वजनिक खाजगी भागीदारीच्या(पीपीपी) नावाखाली आता आरोग्यसेवेचं खाजगीकरण होतय. परीणामी आरोग्य सेवा महाग होणं आलच. एका बाजूला १ टक्के लोकांकडे ५८ टक्के संपत्ती केंद्रित झाल्याचा अहवाल आहे, अन्न धान्याबाबत स्वयंपूर्ण होण्याच्या वल्गना केल्या जाताहेत, तर दुसऱ्या बाजूला दिवसाला ९००० मुलं कुपोषणामूळं व भुकेमूळं मरताहेत. भांडवलशाहीत प्रत्येक गोष्ट पैशाच्या बाजारात तोलली जाते व कामगार-कष्टकरी सामान्य गरीब जनतेच्या जीवांची पर्वा या व्यवस्थेला नक्कीच नाही. या पुर्वी एकदा इंदोर मध्ये रात्री आक्सिजन पुरवठा १५ मिनिटे बंद पडला होता. त्यात १७ लोकांचा २ मुलांसहित मृत्यु झाला होता. त्या वेळीही बीजेपीवाल्यांनी बोंब ठोकली होती की असं काही झालच नाही, त्यांनंतर प्रकरण दाबलं गेलं. भोपाळ दुर्घटना, निठारी हत्याकांड आणि आता गोरखपुर बाल हत्याकांड, आपण आपल्या देशांच भविष्य असंच शुद्र कारणांमूळं मरू द्यायचं का? आपल्या देशांतल्या कोवळ्या जीवांच्या रक्षणाची जबाबदारी अग्रक्रमणानं आपली नाही का? कधी गाय, कधी मंदीर, कधी कथित देशभक्तीच्या नावाखाली राजकीय पोळी भाजणारे या मुळ प्रश्नावरून लक्ष विचलित करण्यासाठी सतत भ्रम निर्माण करतात. गायींच्या रुग्णवाहिकेला पैसा असतो मग ऑक्सीजन पुरवठा करायला का नाही? जनतेच्या आरोग्यासाठी तिजोरी नेहमीच रिकामी कशी असते?

***उद्या आपल्या मधील कोणीही या रचनात्मक हिंसेचा बळी जाऊ शकतो. तोपर्यंत आपण वाट पहायची का? आरोग्य आणि शिक्षण ह्या आपला अधिकार आहे तो नाकारणाऱ्यांशी लढायला हवं. बीआरडी मेडिकल कॉलेजात ऑक्सीजन विना मरण आलेले चिमुरडे आपल्याला प्रश्न कायम विचारत राहतील.***

•

(नौजवान भारत सभा, दिशा विद्यार्थी संघटना आणि बिगुल मजदूर दस्ता या संघटनां तर्फे महाराष्ट्रात वितरित करण्यात आलेले पत्रक)

# जीएसटी: कॉर्पोरेट कंपन्यांवर कृपा आणि जनतेला धोका देण्याचे अजून एक अवजार


मुकेश असीम

शेवटी एकदाचे केंद्र आणि राज्यातील सर्व सत्ताधारी पक्षांनी एकमताने जीएसटीचे दर व नियम ठरवले आणि १ जुलै पासून अंमलबजावणी चालू केली. भांडवलदार वर्गाच्या सर्व संघटना, कॉर्पोरेट कंपन्यांद्वारे नियंत्रित प्रसारमाध्यमे आणि आर्थिक विशेषज्ञांकडून याला ऐतिहासिक आर्थिक सुधारणा म्हणून जाहीर करण्यात आले आहे आणि सर्वत्र कौतूक चालू आहे. जीएसटी कायद्यावर एकमत झालेले विरोधी पक्ष सुद्धा याच मुद्यावर टीका करत आहेत की पुरेशा तयारीशिवाय हा कायदा लागू करण्यात आला आहे. म्हणजे असे मानायचे का की जर पूर्ण तयारी केली असती तर हा कर जनतेच्या हितामध्ये असता? खरेतर या प्रकारची टीका सर्वांचे समान हित असलेल्या एका वर्गविहीन समाजातच होऊ शकते. आपला समाज मात्र अशा प्रकारच्या समानतेवर आधारित नाही. इथे एका बाजूला ८१% संपत्तीची मालकी १०% लोकांकडे आहे आणि दुसरीकडे बहुसंख्य मजूर-शेतकरी आणि छोटा कामधंदा करणारे गरीब लोक आहेत. अशा समाजात सर्व वर्गांसाठी समान हित साध्य करेल असे कोणतेच धोरण असू शकत नाही आणि प्रत्येक धोरणाचे विश्लेषण कोणत्या घटकाला फायदा होईल , आणि कोणाचे नुकसान होईल याच आधारावर झाले पाहिजे. वर्गांमध्ये विभागलेल्या, असमानता आणि शोषणावर आधारित समाजात वेगवेगळ्या वर्गांवर होणाऱ्या परिणामाला समजल्याशिवाय कोणतीही चर्चा निरर्थक किंवा भरकटवणारी असेल. या दृष्टीकोणातून काही महत्वाच्या मुद्यांवर चर्चा आवश्यक आहे.

जीएसटी हा उत्पादन आणि विक्रीच्या प्रत्येक पावलावर जे मूल्य वाढत जाते, त्यावर लागणारा कर आहे. हा कर सुद्धा शेवटी ग्राहकालाच भरावा लागतो. अशा करांना अप्रत्यक्ष कर म्हटले जाते कारण म्हणायला हे कर उत्पादकावर असतात, पण प्रत्यक्षात त्यांना ग्राहकच भरतात. भांडवली लोकशाही दृष्टीकोणातून पाहिले तर अप्रत्यक्ष करांचे क्षेत्र वाढवणे एक प्रतिगामी पाऊल आहे कारण याचा दर सर्वांसाठी 'समान' असतो, त्यामुळे उत्पन्नाच्या दृष्टीने जितके कमी उत्पन्न तितका कर जास्त द्यावा लागतो आणि जेवढे जास्त उत्पन्न तेवढा कर कमी. अर्थातच याचा बोजा गरीबांवर जास्त आणि श्रीमंतांवर कमी पडतो. विकसित भांडवलशाही देशांकडे नजर टाकली तर असे दिसते की तिकडे एकूण करांच्या दोन तृतीयांश प्रत्यक्ष करांच्या स्वरुपात आणि एक तृतीयांश अप्रत्यक्ष करांच्या स्वरूपात वसूल केले जाते. भारताची स्थिती याच्या ठीक उलट आहे म्हणजे दोन तृतीयांश अप्रत्यक्ष करांच्या स्वरूपात आणि एक तृतीयांश प्रत्यक्ष करांच्या स्वरूपात. आता तर अप्रत्यक्ष करांची कक्षा वाढवली जात आहे. दुसरीकडे जास्त उत्पन्नावर लागणारे प्रत्यक्ष कर - आयकर, कॉर्पोरेट कर, संपत्ती कर, वंशपरंपरागत संपत्ती कर इत्यादी करांमध्ये सूट दिली जात आहे किंवा कर संपवले जात आहेत. अशाप्रकारे जीएसटी द्वारे अप्रत्यक्ष करांमधील वाढीमुळे श्रमिकांना मिळणारा मजूरीचा अजून मोठा हिस्सा सरकारकडून कर म्हणून वसूल होईल आणि त्यांचे शोषण अजून तीव्र होईल.

बरेचसे छोटे व्यावसायिक आजपर्यंत कराच्या कक्षेबाहेर होते. आता यापैकी बहुतेक सगळे कराच्या कक्षेमध्ये येतील. यामुळे त्यांची कराच्या स्वरूपातील आणि प्रशासकीय स्वरूपातील गुंतवणूक वाढेल. छोट्या व्यावसायिकांची गुंतवणूक वाढल्यामुळे, आंतरराज्यीय व्यापाऱ्यांची गुंतवणूक आणि प्रशासकीय ओझे कमी झाल्यामुळे, एका राज्यातून दुसऱ्या राज्यातील दळणवळण-पुरवठ्यातील अडथळे कमी झाल्यामुळे छोट्या, अनौपचारिक व्यावसायिकांना मिळणारा स्थानिकतेचा फायदा संपणार आहे. उत्पादन व साठवणूक दोघांनाही कमी जागी केंद्रित करणे मोठ्या उद्योगांना शक्य होईल, ज्यामुळे ते अजून भांडवली गुंतवणूक करून मशिनीकरण वाढवून उत्पादकता वाढवू शकतील. या स्थितीमध्ये छोट्या भांडवलाचे उद्योग आणि व्यापार हे मोठ्या उद्योग-व्यापाराच्या तुलनेत स्पर्धेत टिकू शकणार नाहीत. याचप्रकारे बरेचसे कारागीर, उत्पादक, विणकर, पावरलूम चालवणारे, स्वयंरोजगारी, किंवा थोड्या कामगारांना घेऊन काम करणारे उद्यमी सुद्धा वाढत्या गुंतवणूकीमुळे बाजारात टिकू शकणार नाहीत आणि कालांतराने मोठ्या उद्योगपतींच्या उद्योगात कामगार बनतील. उदाहरणार्थ बांधकाम क्षेत्रानंतर सर्वाधिक कामगारांची संख्या असलेल्या कापड उद्योगातील लहान उद्योगां समोर मोठे संकट उभे ठाकले आहे. महाराष्ट्र टेक्सटाईल प्रोसेसर असोसिएशनच्या (महाराष्ट्र कापड प्रक्रिया संघटना)सचिवांनी म्हटले आहे - '८५% कापडगिरण्यांमध्ये खुप छोटे व्यापारी आहेत. जीएसटी मुळे विकेंद्रीत क्षेत्र समाप्त होईल. मोठ्या गिरण्यांच्या तुलनेत आमचे कापड महाग होईल आणि मोठमोठ्या संघटीत खेळाडूंनाच याचा फायदा होईल.' यामुळेच सुरत, भिवंडी, मुंबई अशा सर्व जागी हे उद्योजक आपल्या कापड गिरण्या बंद करून संप, धरणे, निदर्शने करू लागले आहेत. अशाप्रकारे छोट्या दुकानदारांचा बळी देऊन मोठमोठ्या मॉल्स आणि कॉर्पोरेट दुकानांचा फायदा होईल आणि छोट्या दुकानदारांना कर्मचारी बनणे भाग पडेल. यामुळे मोठमोठ्या भांडवलदारांची मक्तेदारी वाढेल. यामुळेच भांडवलदारांच्या सर्व संघटना आणि त्यांची भाट प्रसारमाध्यमे जीएसटीच्या बाजूने इतकी वर्षे वातावरण निर्मिती करत होती.

परंतू आज भारतात ९०% रोजगार हा अनौपचारिक आणि लघु क्षेत्रामध्ये आहे. संघटीत क्षेत्रातील मोठ्या उद्योगांना विकसित आधुनिक तंत्रज्ञान, कामगारांवर उत्पादकतेचे वाढते दडपण, साधनांची कमी गरज यामुळे तेवढेच उत्पादन घेण्यासाठी कमी कामगार लागतात. यामुळेच अनौपचारिक, लघु उद्योगांच्या जीवावर मोठ्या उद्योगांची एकाधिकारशाही वाढेल आणि रोजगाराच्या संधी अजून कमी होतील. यासोबतच छोटे उद्योगपती समाप्त होऊन कामगार बनल्यामुळे बेरोजगारांची राखीव फौज अजून मोठी होईल आणि भांडवलदार वर्ग आपला नफा वाढवण्यासाठी श्रमशक्तीच्या मूल्याला म्हणजे मजूरीला अजून कमी करण्याचा प्रयत्न करेल. याप्रकारे मालक भांडवलदार आणि श्रमिक वर्गांमधील अंर्तविरोध आणि संघर्ष अजून खोल आणि तीव्र होईल.




"ज्या पृथ्वीवर प्रत्येक मिनिटाला एक बालक भुकेने किंवा आजाराने मरते, तिथे जनतेला सत्ताधारी वर्गाच्या दृष्टीकोणातूनच सर्व बाबी समजून घेण्याची सवय लावली जाते. लोकांनी ही परिस्थिती म्हणजे एक नैसर्गिक व स्वाभाविक परिस्थिती आहे असे समजावे असा विचार करण्यास त्यांना शिकवले जाते. लोकांना वाटते की ही व्यवस्था म्हणजेच देशभक्ती आहे व म्हणून जो कोणी या व्यवस्थेस विरोध करेल त्यास देशद्रोही व परकीयांचा दलाल समजण्यात येते. जंगली कायद्यास पवित्र स्वरूप देण्यात येते व याद्वारे पराभूत झालेली माणसं स्वत:च्या परिस्थितीस नियती समजू लागतात"

**एदवार्दो गलियानो (प्रसिद्ध अर्जेंटीनी लेखक)**
**(३ सप्टेंबर १९४० - १३ एप्रिल २०१५)**

छोट्या, अनौपचारिक उद्योगांवर या संकटाचा मारा नोटबंदीद्वारे अगोदरच चालू झाला आहे. नोटबंदीनंतर ४ महिन्यांमध्ये जानेवारी-एप्रिल या काळात सेंटर फॉर मॉनिटरींग इंडियन इकॉनॉमीच्या मते १५ लाख नोकऱ्या कमी झाल्या आहेत. आता जीएसटी लागू झाल्यामुळे ही प्रक्रिया अजून वेगवान होईल. लुधियाना, सूरत, भिवंडी सारख्या जागांवरून येण्याऱ्या बातम्या अगोदरच याला दुजोरा देत आहेत. या ठिकाणी औद्योगिक कारखान्यांमध्ये उत्पादन कमी झाल्यामुळे कामगारांची कपात होत आहे, उद्यमी कारागीर-निर्मात्यांकडे माल बनवण्याच्या ऑर्डर नसल्यामुळे त्यांचे काम सुद्धा बंद आहे आणि यांच्या मालाचे छोटे व्यापारी विक्रीअभावी रिकामे बसले आहेत किंवा धरणे-मोर्चे काढत आहेत.

राहीला प्रश्न किंमतीचा, अनेक वस्तू आणि व्यापारी कराच्या कक्षेमध्ये आल्यामुळे अनेक उत्पादनांची किंमत वाढणे निश्चित आहे. परंतु अगोदरच कराच्या कक्षेत असलेल्या औपचारिक, संघटीत क्षेत्रातील उद्योगांना अगोदर भरलेल्या टॅक्सचे क्रेडीट पुढील हप्त्यात मिळाल्यामुळे तसेच काही उत्पादनांवर कराचा दर कमी झाल्यामुळे काही वस्तूंच्या किमती कमी होतील, उदाहरणार्थ महागड्या गाड्या किंवा आयफोन. यामुळे उच्च आणि मध्यमवर्गातील ग्राहकांसाठी महागाईचा परिणाम कदाचित तेवढा नसेल, परंतु गरीब जनतेच्या उपभोगाच्या वस्तूंची महागाई निश्चितच वाढेल कारण गरीब लोक कराच्या कक्षेबाहेर असलेल्या अनौपचारिक छोट्या दुकानदारांकडून बहुसंख्य वस्तू घेत होते, आणि आता त्यांना कर भरावा लागणार आहे.

अगोदर जीएसटीचा एक मुख्य फायदा हा सांगितला होता की समान दर, सरळ प्रक्रियेमुळे भ्रष्टाचार आणि करबुडवेगिरी कमी होईल. परंतु अनेक दर, अधिभार, वस्तूंचे क्लिष्ठ वर्गीकरण आणि अवघड प्रक्रियेमुळे चोरी-भ्रष्टाचार कमी होण्याच्या दाव्याची हवाच गेली आहे. उदाहरणार्थ इंस्टंट कॉफी आणि रोस्टेड कॉफी वेगवेगळ्या दरांनी मिळते, हॉटेलच्या रुमच्या भाड्यावरून तिच्यावरचा कराचा दर ठरतो. याच सगळ्या गोष्टी नोकरशाहीला आवडतात कारण यातूनच मनमानी पद्धतीने कर ठरवण्याची आणि अफरातफरी करण्याची संधी मिळते. परंतु कदाचित अजून काही होण्याची आशाच चुकीची होती कारण पूर्वापार चालत आलेल्या उद्योजक-राजकारणी-नोकरशाहीच्या युतीच्या या आधाराला संपवण्याचा धोका यापैकी कोण घेणार!

जीएसटीची अजून एक बाजू म्हणजे प्रादेशिक विषमता. असमान, असंतुलित आर्थिक विकास हा अव्यवस्थित भांडवलशाही उत्पादन प्रक्रियेचा सामाजिक स्तरावरचा अनिवार्य परिणाम आहे. योजनाबद्ध विकासाचा अभाव असलेल्या भांडवली व्यवस्थेमुळे अगोदरच भारतातील विविध राज्य व प्रदेशांमध्ये असमान विकास आणि प्रादेशिक विषमतेचा मोठा प्रश्न अस्तित्वात आहे. याचा वापर जनतेत प्रादेशिक शत्रूत्व निर्माण करण्यासाठी राजकारणात केला जात आहे. अगोदरच प्रादेशिक विषमता असताना, एकसारखा कर आणि एक बाजाराचे धोरण या विषमतेला अजून वाढवेल. उदाहरणार्थ १९४९ साली सर्व देशामध्ये प्रत्येक अंतरासाठी समान रेल्वे भाड्याचे धोरण लागू होते, ज्यामुळे बिहार, ओरिसा, मध्यप्रदेश सारखी खनिज संपत्ती असलेली राज्ये औद्योगिक विकासात मागे पडली कारण येथे मिळणारे खनिज त्याच किमतीला दूरवरच्या राज्यांमध्ये सुद्धा उपलब्ध होते आणि यामुळेच खनिज उत्पादनाचा या राज्यांना फायदा झाला नाही.

एकंदरीत पाहिले तर भांडवलशाही व्यवस्थेमध्ये भांडवलाचे केंद्रिकरण आणि मक्तेदारी वाढवणाऱ्या जीएसटी मुळे भांडवली अर्थव्यवस्थेत अंतर्भूत असलेला कोणताच प्रश्न सुटणार नाही. उलट तात्कालिक स्वरूपात मक्तेदार भांडवलदारांचा नफा वाढवण्यासाठी तुटपुंज्या भांडवलदार वर्गाला नष्ट करून त्यांना कामगारांच्या रांगांमध्ये ढकलण्याची प्रक्रिया वेगवान होईल, बेकारांच्या फौजेची संख्या वाढेल, मजुरी अजून कमी होईल. यामुळे कामगारांची क्रयशक्ती आणि बाजारातील एकूण मागणी कमी होईल. यातून काही काळात बाजारात अतिउत्पादनाचे अजून मोठे संकट निर्माण होईल.

**अनुवाद : अभिजीत**

# मुस्लिम लोकसंख्या वाढीचे मिथक

नितेश शुक्ला

**अनेकदा असं ऐकण्यात येतं की भारतात मुस्लिम वेगानं लोकसंख्या वाढवत आहेत व यामुळे हिंदूंना धोका आहे.** समाजमाध्यमांवर (सोशल मीडिया) हे "वास्तव" खुप आरडून-ओरडून पसरवलं जात आहे. व्हॉट्सएप वर संदेश पसरवले जात आहेत की भारतात मुस्लिम वेगाने लोकसंख्या वाढवत आहेत आणि असंच चालू राहिलं तर २०५० पर्यंत भारत एक मुस्लिम बहुसंख्याक राष्ट्र बनेल (काही काळापूर्वीपर्यंत हे २०४० पर्यंत होणार असे ऐकण्यात येत होतं).

मग काही लोक घाबरतात. त्यांच रक्त धर्म आणि देशाच्या रक्षणासाठी खवळू लागतं. मग ते अशा संदेशाला इतरांसोबत शेअर करून स्वत:च्या खरा हिंदू असण्याचा पुरावा देतात. **ते याचाही विचार करत नाहीत की संदेशात म्हटलेली गोष्ट कितपत खरी आहे. अशाप्रकारे सामान्य लोकांच्या भावनांचा वापर करून धार्मिक संघटना लोकांचं धर्माच्या नावाने धृवीकरण करतात आणि राजकीय लाभ घेतात.** या पक्षांच्या आणि संघटनांच्या आयटी सेल द्वारे असे संदेश बनवले जातात आणि मग त्यांचे कार्यकर्ते संदेशांना शेकडो ग्रुप्समध्ये पसरवतात. बहुतेक मामल्यांमध्ये पसरवला गेलेला संदेश एकतर पूर्णपणे खोटा असतो किंवा त्यात फक्त काही अंश सत्य असतं. **जेव्हा एखादे मिथक अनेकदा समाजात पसरवलं जातं तेव्हा लोकांना ते एक प्रचलित सत्य वाटू लागतं. या लेखात आपण मुस्लिम लोकसंख्येबाबत आरएसएस द्वारे पसरवल्या गेलेल्या अनेक मिथकांची पडताळणी करूयात.**

### पहिलं मिथक: मुस्लिम ४ लग्न करतात आणि मोठ्या संख्येने मुलं जन्माला घालतात

तुम्हाला अनेकदा हे ऐकायला आणि वाचायला मिळू शकतं की मुस्लिम अनेक लग्न करतात आणि अनेक मुलं जन्माला घालतात. या दाव्याच्या खरेपणाची पडताळणी न करताच लोक याला खरं मानू लागतात. अनेक लोक असे उदाहरण सुद्धा देतात की त्यांच्या अमुक गावामध्ये तमुक मुस्लिम व्यक्तीनं ३ लग्नं केली आहेत. हिंदूंमध्ये प्रचलित असलेल्या या मान्यतेची जरा पडताळणी करूयात.

एका छोट्याश्या आकड्याने हे प्रचलित 'सत्य' फोल ठरतं. तो आकडा म्हणजे **भारतात १००० मुस्लिम पुरुषांमागे किती मुस्लिम महिला आहेत.** २०११ च्या जनगणनेच्या हिशोबाने भारतात १००० मुस्लिम पुरुषांमागे ९५१ मुस्लिम महिला आहेत. म्हणजे जर प्रत्येक व्यक्तीने एकच लग्न केले तरी सुद्धा १००० मुस्लिम पुरुषांपैकी ४९ अविवाहितच राहतील. असे असताना प्रत्येक मुस्लिम अनेक लग्नं करतो या विचारानेच चक्रावायला होतं. जर असे मानले की काही मुस्लिमांनी एकापेक्षा जास्त लग्नं केली असतील, तर हे सुद्धा निश्चित आहे की त्या प्रमाणात अविवाहित मुस्लिम पुरुषांची संख्या वाढणार आहे.

परंतु संघी अजूनही हार मानायला तयार होत नाहीत. त्यांचा तर्क असा असतो की खरेतर मुस्लिम लव्ह जिहाद करत आहेत म्हणजे हिंदू मुलींना फसवून त्यांच्याशी लग्न करत आहेत, म्हणूनच एक मुस्लिम अनेक लग्न करू शकतो. या थापेसाठी कोणताही आकडा मात्र संघींकडे नाहीये. आंतरधर्मीय लग्नांमध्ये दोन प्रकारची लग्नं होतात. एक प्रकार म्हणजे जो आपण सर्वसाधारणरित्या जाणतो, म्हणजे ज्यात दोन वेगवेगळ्या धर्मांचे लोक स्वत:च्या मर्जीने लग्न करतात. दुसऱ्या प्रकारची लग्नं ती आहेत ज्यात मुस्लिम मुलं एका कारस्थानाचा भाग म्हणून हिंदू मुलींना फसवून त्यांच्याशी लग्न करतात आणि त्यांचे धर्म परिवर्तन घडवून आणतात. **दुर्दैवाने दुसऱ्या प्रकारचे लग्न एकतर व्हॉट्सॲप वर किंवा संघी लोकांच्या मेंदूतच सापडते.** २०१४ साली निवडणुकांच्या अगोदर जेव्हा लव्ह जिहादचा मुद्दा उचलला गेला तेव्हा संघी लोक संपूर्ण देशात याचे एकच उदाहरण उत्तरप्रदेशातील मेरठ मध्ये दाखवू शकले. नंतर समजलं की हा मामला सुद्धा खोटा होता आणि स्थानिक आमदार व मुलीच्या वडीलांनी मुलीवर दडपण आणून तिच्याकडून तसं वदवलं होतं. (बातमी या लिंक वर बघू शकता: http://www.thehindu.com/news/national/other-states/for-meeruts-love-jihad-couple-३year-courtship-ends-in-nikah/article७९५३२३८.ece )

अशाप्रकारे संघ आणि भाजपचा लव्ह जिहादचा एकमात्र मामला फुस्स झाला. **आता तर भक्त इतके व्याकुळ झाले आहेत की त्यांनी प्रसिद्ध क्रिकेटर झहीर खान आणि अभिनेत्री सागरिका घाटगेच्या लग्नाला सुद्धा लव्ह जिहाद जाहीर केले आहे.**

या बाबतीत वास्तवच सांगायचे तर असे की राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणाच्या २००५-०६ च्या आकड्यांवर आधारित एका अभ्यासानुसार भारतात फक्त २.१% लग्नंच आंतरधर्मिय असतात. याव्यतिरिक्त जर आकड्यांबद्दल बोलायचे झाले तर या अहवालानुसार २००५-०६ मध्ये भारतात २% लोकांचे एकापेक्षा जास्त वैवाहिक संबंध होते. धार्मिक लोकसंख्येनुसार हिंदूंमध्ये १.७७% आणि मुस्लिमांमध्ये २.५५% लोक बहुपत्नीक होते. यात लक्षात घेण्यासारखी गोष्ट अशी की हिंदू कोड बिलानुसार एकापेक्षा जास्त लग्न करायला परवानगी नसताना, आणि मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड एकापेक्षा जास्त लग्नाला सशर्त मान्यता देत असतानाचे हे आकडे आहेत. १००० मुस्लिम पुरुषांमागे ९५१ महिला असणे, आंतरधर्मिय विवाहांचे प्रमाण फक्त २.१% असणे आणि मुस्लिमांमध्ये फक्त २.५५% पुरुषांचीच एकापेक्षा जास्त लग्न असणे हे तीन आकडे असे आहेत जे संघाद्वारे पसरवल्या जाणाऱ्या थापांची हवा काढण्यासाठी पुरेसे आहेत.

### दुसरे मिथक: मुस्लिम इतक्या वेगाने लोकसंख्या वाढवत आहेत की सन २०५० पर्यंत भारत मुस्लिम बहुल देश होईल

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाद्वारे पसरवल्या जाणाऱ्या प्रचलित असत्यांपैकी हे सुद्धा एक असत्य. लोकांच्या डोक्यात असुरक्षितता पेरूनच यांच्या राजकारणाची भरभराट होऊ शकते. बघूयात की संघाने केलेल्या या भविष्यवाणीमध्ये किती दम आहे.

**आरएसएस खूप पूर्वीपासून ही गोष्ट पसरवत आहे की भारतातील मुस्लिम अनेक मुलं जन्माला घालून आपली लोकसंख्या वाढवत आहेत आणि भारताला इस्लामिक देश बनवू पाहत आहेत. यात मजेची गोष्ट ही आहे की आरएसएसची प्रचार यंत्रणा भारताला इस्लामिक देश बनवण्याची तारीख सतत पुढे सरकावत असते.** काही वर्षांपूर्वीपर्यंत हे म्हणायचे की भारत २०३५ पर्यंत इस्लामिक देश बनेल, मग त्यांनी २०४० म्हणणे सुरू केले, आणि आता म्हणताहेत की २०५० पर्यंत भारत मुस्लिम बहुल देश बनेल. अमेरिकन संस्था पिऊ रिसर्च सेंटरने सांगितले आहे की २०५० पर्यंत भारतात जवळपास ३१ कोटी मुस्लिम आणि १३० कोटी हिंदू असतील, तेव्हा होऊ शकते की आरएसएस भारताला इस्लामिक देश बनवण्याची तारीख २०६० किंवा २०७० करेल. तरीही **बऱ्यापैकी संख्येने लोक संघाच्या प्रचार यंत्रणेद्वारे पसरवलेल्या या भविष्यावर विश्वास ठेवतात आणि असुरक्षिततेच्या भावनेने ग्रासून राहतात.** म्हणून हे जाणून घेणे गरजेचे आहे की भविष्याबद्दलच्या या बागुलबुव्याला खरंच काही अर्थ आहे का? भारत भविष्यात कधीतरी म्हणजे २०७० मध्ये किंवा २१०० मध्ये किंवा २१५० मध्ये इस्लामिक राष्ट्र बनू शकतो का?

यासाठी अगोदर लोकसंख्या विज्ञानाला थोडक्यात समजून घेण्याचा प्रयत्न करूयात.

**कोणत्याही देशाच्या लोकसंख्या वाढीचा दर अनेक कारणांवर अवलंबून असतो. उदाहरणार्थ जन्मदर, मृत्यू दर, प्रवास, युवक लोकसंख्या इत्यादी.** ही कारणं सुद्धा देशाच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितींवर अवलंबून असतात.

सामान्यरित्या लोकसंख्या एकरेषीय पद्धतीने (१, २, ३, ४, ५...) किंवा गुणोत्तराने (१, २, ४, ८, १६...) वाढत नाही. जपान किंवा इंग्लंड सारख्या अनेक विकसित देशांमध्ये लोकसंख्या वाढीचा दर ऋणात्मक आहे, म्हणजे तेथील लोकसंख्या कमी होत आहे. काही देशांच्या लोकसंख्या वाढीचा दर जास्त आहे तर काही देश असे आहेत ज्यांची लोकसंख्या वाढत आहे, पण वाढीचा दर सतत कमी होत आहे. एखाद्या देशाची लोकसंख्या कशी वाढेल हे तेथील सामाजिक, आर्थिक परिस्थिती ठरवतात. जर एका मोठ्या कालखंडात लोकसंख्येचा विकास पाहिला, तर भांडवलशाहीच्या आगमनानंतर गेल्या २०० वर्षांमध्ये औद्योगिक क्रांत्या झाल्यावर विकसित देशांची लोकसंख्या वेगाने वाढली. लोकसंख्या वाढीचा दर नंतर कमी होत गेला आणि आता तो स्पेन, जपान सारख्या अनेक देशांमध्ये ऋणात्मक झाला आहे. इंग्लंडच्या लोकसंख्येचे उदाहरण बघूयात:

१८०१ – ८३ लाख
१८५१ – १.८ कोटी (वाढ – ११७%)
१९०१ – ३.१ कोटी (वाढ – ७२%)
१९५१ – ४.२ कोटी (वाढ – ३६%)
२००१ – ४.९ कोटी (वाढ – १७%)

आपण पाहू शकतो की प्रत्येक ५० वर्षांमध्ये लोकसंख्या वाढीचा दर कमी होत गेला. सुरुवातीच्या ५० वर्षांमध्ये लोकसंख्या ११७% वाढली, आणि नंतरच्या ५० वर्षांमध्ये फक्त १७% वाढली. लोकसंख्या अजूनही वाढत आहे, पण वाढीचा दर कमी होत आहे. आता पुढे बघूयात.

**ज्या देशांमध्ये औद्योगिकीकरण आणि नवीन उत्पादक शक्तींचा विकास नंतर झाला, तेथे लोकसंख्या वाढण्याची सुरुवात नंतर झाली.** भारत आणि चीन अशा देशांपैकी आहेत. भारतात १९०० ते १९५० पर्यंत लोकसंख्या ६५% वाढली आणि १९५० ते २००० पर्यंत लोकसंख्या १८३% वाढली. अशाप्रकारे आपण बघू शकतो की एखाद्या देशात किंवा राज्यात लोकसंख्या वाढीचा दर स्थिर नसून तो तेथील आर्थिक व सामाजिक परिस्थितींवर अवलंबून असतो. जेव्हा देशात नवीन उत्पादन पद्धत विकसित होते आणि उत्पादन वेगाने वाढू लागते तेव्हा लोकसंख्या वेगाने वाढते. परंतु एका काळानंतर, वैद्यकीय सेवा आणि शिक्षणाचा विकास झाल्यानंतर, लोकांचे आयुर्मान वाढल्यामुळे लोक छोट्या कुटुंबांकडे वळू लागतात. आजच्या नवीन उत्पादन पद्धतीत आणि बाजार व्यवस्थेत पूर्वीच्या मोठ्या आणि संयुक्त कुटुंबांची जागा विभक्त कुटुंब (छोटे कुटुंब) घेत आहेत. यासोबतच भांडवलशाही व्यवस्थेत सामाजिक आणि आर्थिक विकासात एक स्थिरता किंवा जडता येत जाते, ज्याचा प्रभाव लोकसंख्येवर पण पडतो.

लोकसंख्येची ही वाढ एका संतृप्त स्तरावर पोहोचल्यावर एकतर स्थिर होते, त्यानंतर हळू-हळू वाढत राहते किंवा कमी होते. भारत त्या देशांमध्ये आहे जिथे लोकसंख्येचा स्तर अजून संतृप्त झालेला नाही. भारताची लोकसंख्या अजून वाढत आहे परंतु तिचा वाढीचा दर कमी होत आहे. १९६१ नंतर आजपर्यंतच्या वाढीचे आकडे बघूयात:

१९६१ ते ७१ दरम्यान २४.८%
१९७१ ते ८१ दरम्यान २५%
१९८१ ते ९१ दरम्यान २४.९%
१९९१ ते २००१ दरम्यान २०%
२००१ ते २०११ दरम्यान १६.७%

आपण बघू शकतो की सुरुवातीच्या तीन दशकांमध्ये लोकसंख्या एका समान दराने वाढली आणि १९८० नंतर हा दर वेगाने कमी होऊ लागला, आणि आता २४% वरून कमी होऊन १६.७% आहे. या संपूर्ण काळात हिंदू आणि मुस्लिम लोकसंख्येच्या वाढीचे दर वेगवेगळे बघूयात:

**हिंदूंचा वृद्धीदर:**

१९६१ ते १९७१ दरम्यान २३.७६%
१९७१ ते १९८१ दरम्यान २५.०१%
१९८१ ते १९९१ दरम्यान २३.९२%
१९९१ ते २००१ दरम्यान १७.८९%
२००१ ते २०११ दरम्यान १५.४३%

**मुस्लिमांचा वृद्धीदर:**

१९६१ ते १९७१ दरम्यान ३३.१९%
१९७१ ते १९८१ दरम्यान ३०.४५%
१९८१ ते १९९१ दरम्यान ३०.३३%
१९९१ ते २००१ दरम्यान २९.५%
२००१ ते २०११ दरम्यान २३.४७%

सोबतच महिला जनन दर (TFR, यानुसार कळते की एक महिला आपल्या संपूर्ण आयुष्यात किती मुलांना जन्म देते) बघूयात :

राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण २००५-०६ नुसार प्रति महिला जनन दर याप्रकारे आहे:

१९९१-९२
हिंदू महिला – ३.३
मुस्लिम महिला – ४.४
१९९८-९९
हिंदू महिला – २.७८
मुस्लिम महिला– ३.५९
२००५-०६
हिंदू महिला– २.५९
मुस्लिम महिला – ३.४०

प्रति महिला जनन दर समजण्यासाठी: जर १०० हिंदू आणि १०० मुस्लिम महिलांचे उदाहरण घेतले तर १९९१ मध्ये १०० हिंदू महिला आपल्या पूर्ण जीवनकाळात ३३० मुलांना जन्म देत होत्या, हा दर २००५ मध्ये कमी होऊन २५९ मुलांवर आला. याचप्रकारे १९९१ मध्ये १०० मुस्लिम महिला ४४० मुलांना जन्म देत होत्या आणि हा दर २००५ मध्ये कमी होऊन ३४० वर आला. यात लक्षात घेण्याची गोष्ट अशी की एखाद्या लोकसंख्येला स्थिर राहण्यासाठी एकूण जनन दर २.१ असला पाहिजे.

या दोन्ही आकड्यांना पाहून असे म्हणता येईल की भारताची लोकसंख्या तर वाढत आहे, पण वाढीचा दर सतत कमी होत आहे.

पान १३ वर

# मुस्लिम लोकसंख्या वाढीचे मिथक

पान १२ वरून

**२०५० मध्ये काय होईल?**

लोकसंख्येचे पूर्वानुमान काढण्यासाठी आपण जुन्या आकड्यांचा कल पाहूयात. गेल्या ५ दशकांच्या आकड्यांच्या आधारावर भविष्याचे एक पूर्वानुमान काढले जाऊ शकते. आपण २०५० मध्ये भारताची लोकसंख्या तसेच भारतात हिंदू व मुस्लिम लोकसंख्या किती असेल हे काढूयात आणि पाहूयात की आरएसएस द्वारे पसरवली जाणारी गोष्ट कितपत बरोबर आहे.

लोकसंख्येच्या पूर्वानुमानासाठी अनेक पद्धती वापरल्या जातात. आपण त्यापैकी एका उपयुक्त पद्धतीचा म्हणजे 'घटणाऱ्या वाढ पद्धतीचा' वापर करूयात. जेव्हा एखादी लोकसंख्या वाढते पण वाढीचा दर कमी होत असतो तेव्हा ही पद्धत समाधानकारक अंदाज देते. लोकसंख्येत होणाऱ्या बदलांसाठी काही आकस्मिक घटनांच्या (जसे युद्ध, नैसर्गिक संकट, साथ, इत्यादी) प्रभावाकडे दुर्लक्ष करत आपण आकडेमोड करूयात. आपल्याकडे गेल्या ५ दशकांमधील लोकसंख्या वाढीचे आकडे आहेत. कोणत्याही हस्तक्षेपाशिवाय लोकसंख्या याच दराने वाढेल असे मानल्यास, पुढील निष्कर्ष निघतात –

पुढील ४ दशकांनंतर २०५० मध्ये भारताची लोकसंख्या जवळपास १७५ कोटी असेल.

भारतात हिंदूंची लोकसंख्या पुढील ४ दशकांमध्ये खालील दराने वाढेल:

| | |
|---|---|
| २०११-२१ | १२.४३% |
| २०२१-३१ | ९.४०% |
| २०३१-४१ | ६.४०% |
| २०४१-५१ | ४.००% |

२०५१ मध्ये हिंदूंची लोकसंख्या जवळपास १२९.२६ कोटी असेल. हा आकडा पिऊ रिसर्च सेंटरने दिलेल्या आकड्याच्या (१३० कोटी) फार जवळ आहे.

मुस्लिमांची लोकसंख्या पाहिली तर ती पुढील ४ दशकांमध्ये खालील दराने वाढेल:

| | |
|---|---|
| २०११-२१ | २०.२२% |
| २०२१-३१ | १६.७२% |
| २०३१-४१ | १३.७२% |
| २०४१-५१ | १०.२२% |

२०५१ मध्ये भारतात मुस्लिमांची लोकसंख्या जवळपास ३१.५२ कोटी असेल, हा आकडा सुद्धा पिऊ रिसर्च सेंटरने दिलेल्या आकड्याच्या (३१ कोटी) फार जवळ आहे.

यानंतर हिंदूंच्या लोकसंख्या वाढीचा दर जवळपास स्थिर होईल, पण मुस्लिमांच्या लोकसंख्या वाढीचा दर पुढील एक दोन दशके टिकून राहील. या आधारावर असा अंदाज करू शकतो की २०७१ पर्यंत मुस्लिम लोकसंख्या वाढीचा दर हिंदू लोकसंख्या वाढीच्या दराच्या जवळपास समान होईल व ४ ते ५ %च्या आसपास असेल. ***२०७१ मध्ये भारताची लोकसंख्या जवळपास ११२ कोटी असेल, ज्यात हिंदूंची लोकसंख्या १४० कोटी आणि मुस्लिमांची लोकसंख्या ३५ कोटी असेल. सोबतच भारताच्या लोकसंख्या वाढीमध्ये सुद्धा स्थैर्य येईल आणि लोकसंख्या एकतर स्थिर होईल किंवा एकदम हळू-हळू वाढेल.***

तरीही २०७१ च्या वाढीच्या दराला स्थिर मानून गणना केली तर २१०० मध्ये भारताची लोकसंख्या २१६ कोटी असेल ज्यात हिंदूंची संख्या १५७ कोटी आणि मुस्लिमांची संख्या ३९ कोटी असेल. शतकाच्या शेवटच्या दोन दशकांमध्ये लोकसंख्या कमी होण्याची सुरूवात होऊ शकते.

वरील आकडेमोडीवरून हे एकदम स्पष्ट आहे की २०५०, २०७० किंवा २१०० मध्ये भारत एक हिंदू बहुल देशच असेल, आणि मुस्लिमांची जास्तीत जास्त लोकसंख्या ३९ कोटी (एकूण लोकसंख्येच्या १८%) पेक्षा जास्त असणार नाही, व हिंदूंची लोकसंख्या १५७ कोटींच्या (एकूण लोकसंख्येच्या ७२%) पर्यंत राहील.

***आरएसएसने पुन्हा एकदा आपली तारीख पुढे सरकावली पाहिजे, कारण आता त्यांच्या घोषणा साफ खोट्या सिद्ध होत आहेत.***

खरेतर कोणत्याही समुदायाचा लोकसंख्या वाढीचा दर त्यांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीवर अवलंबून असतो, त्यांच्या धर्मावर नाही. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणात ही गोष्ट चांगल्या प्रकारे दिसते. हायस्कूलपर्यंत शिकलेले हिंदू हायस्कूलमध्ये न शिकलेल्या हिंदूंपेक्षा जास्त मुलांना जन्म देतात. हीच गोष्ट मुस्लिमांसाठी सुद्धा खरी आहे. शिक्षणाचा स्तर, आर्थिक अवस्था, युवकांचे प्रमाण ही कारणे लोकसंख्या वाढीच्या दराला प्रभावित करतात. याला नीट समजण्यासाठी खाली काही तथ्य दिले आहेत:

भारतात केरळ मध्ये लोकसंख्या वाढीचा दर सर्वात कमी आहे. २०११ च्या जनगणनेनुसार केरळची लोकसंख्या ४.४% दराने वाढली, तर बिहारची लोकसंख्या २५% दराने वाढली.

काही लोक मानतात की मुस्लिम कुटुंब नियोजन करत नाहीत. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण २००५-०६ चे आकडे सांगतात: १९९१-९२ मध्ये ३७.७% हिंदू महिला कुटुंब नियोजन करत होत्या, हे प्रमाण २००५-०६ मध्ये वाढून ५०.२% झाले. याच्या तुलनेत १९९१-९२ मध्ये २२% मुस्लिम महिला कुटुंब नियोजन करत होत्या, हे प्रमाण २००५-०६ मध्ये वाढून ३६.४% झाले. मुस्लिम महिलांमध्ये हिंदू महिलांच्या तुलनेत नक्कीच कुटुंब नियोजनाप्रती जागरूकता कमी आहे, परंतु त्यांचा कुटुंब नियोजन वाढीचा दर जास्त आहे. हिंदू महिलांमध्ये १५ वर्षात १२.५% जास्त महिलांनी कुटुंब नियोजन केले, तिथे हाच दर मुस्लिम महिलांमध्ये १४.४% आहे.

या व्यतिरिक्त अनेक छोटी कारणे आहेत, जी मुस्लिम लोकसंख्या वाढीच्या जास्त दराला कारणीभूत आहेत:

१. हिंदूंच्या तुलनेत मुस्लिमांमध्ये स्त्री-पुरुष गुणोत्तर जास्त आहे. हिंदूंमध्ये १०० पुरुषांमागे ९३९ महिला आहेत, तर मुस्लिमांमध्ये १००० पुरुषांमागे ९५१ महिला आहेत.

२. एनएफएचएस २००५-०६ नुसार हिंदूंचे सरासरी आयुर्मान ६४ वर्षे आहे, तर मुस्लिमांचे सरासरी आयुर्मान ३ वर्षे जास्त म्हणजे ६८ वर्षे आहे.

३. हिंदूंमध्ये ५ वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांचा मृत्यू दर मुस्लिमांपेक्षा जास्त आहे. हिंदूंमध्ये ५ वर्षांखालील मुलांचा मृत्यूदर प्रत्येक १००० मुलांमागे ७६ आहे, तर मुस्लिमांमध्ये हाच दर ७० आहे.

सच्चर आयोगाचा अहवाल आणि लोकसंख्या वाढीचे आकडे एकत्र पाहिले, तर मुस्लिमांच्या लोकसंख्या वाढीच्या जास्त दराचे खरे कारण समोर येईल. सच्चर आयोगाच्या (२००६) अहवालानुसार २००४-०५ मध्ये भारतात सरासरी २२.७% लोक दारिद्र्य रेषेखाली होते, परंतु मुस्लिमांमध्ये हेच प्रमाण ३१% होते. शहरांमध्ये तर हा आकडा अजून भयावह आहे, जिथे ३८.४% मुस्लिम दारिद्र्य रेषेखाली होते.

या अहवालानुसार भारतात २००१ साली साक्षरतेचा दर ३५% होता, ज्यात हिंदूंमध्ये साक्षरतेचे प्रमाण ७०.८% होते, पण मुस्लिमांमध्ये साक्षरतेचे प्रमाण फक्त ५९.१% होते. शहरांमध्ये हिंदू साक्षरतेचे प्रमाण ८५% होते, पण मुस्लिम साक्षरतेचे प्रमाण फक्त ७०.१% होते. ६ ते १४ वयाच्या २५% मुस्लिम मुलांनी एकतर कधी शाळेचे तोंड पाहिलेले नव्हते किंवा शिक्षणच सोडून दिलेले होते. हिंदूंमध्ये हेच प्रमाण ९% होते.

लोकसंख्या आणि एनएफएचएसचे आकडे हे दाखवतात की भारतात खराब आर्थिक अवस्था आणि शिक्षणाचे कमी प्रमाण असलेले लोक जास्त मुलांना जन्म देतात. यामागे अनेक कारणं असतात. गरीब कुटुंब असल्यामुळे जितकी मुलं जास्त तितके काम करणारे लोक जास्त अशी मानसिकता असते. ही मानसिकता अनेक मुलांना जन्म देण्याचे कारण बनते. याशिवाय गरीब लोकांच्या मुलांना कुपोषण व इतर अनेक आजारांमध्ये योग्य इलाज न मिळाल्यामुळे अनेकदा मृत्यूमुखी पडावे लागते. सोबतच गरीबांच्या वस्त्यांमधून मुलं गायब होण्याच्या घटनाही सतत होत असतात. अशा मुलांना भीक मागणे आणि किडनी काढण्यासाठी वापरले जाते. या कारणांमुळे गरीब लोक असुरक्षिततेच्या भावनेपायी जास्त मुलांना जन्म देतात. कुटुंब नियोजनाबाबत जागरूकतेचा अभाव हे सुद्धा जास्त मुलांना जन्म देण्याचे एक कारण आहे.

वरील उदाहरणांमध्ये आपण पाहिले आहे की भारत कधीच इस्लामिक राष्ट्र होऊ शकत नाही. परंतु संघाच्या फासीवादाला तीव्र विरोध केला नाही तर एक दिवस भारत इस्लामिक देशासारखा नक्कीच बनेल, जिथे:

- अहिंदूंच्या प्रत्येक सण-उत्सवावर बंदी असेल,
- अहिंदूंना दुय्यम दर्जाचे नागरिक मानले जाईल,
- मुलींनी जीन्स-टीशर्ट घालणे बेकायदेशीर असेल,
- मुलींना रात्री ८ वाजता घराबाहेर निघण्यावर बंदी असेल,
- लग्नाअगोदर प्रेम करण्यावर बंदी असेल, बागेत प्रेमी जोडप्यांना पोलिस धरून मारतील आणि राखी बांधतील,
- मनुस्मृतीवर टीका करणाऱ्यांचे डोके उडवले जाईल,
- आपल्या हक्कांसाठी आवाज उठवणे बेकायदेशीर असेल.

तेव्हा भारत एक इस्लामिक देश नाही, तर इस्लामिक देशांसारखे हिंदू राष्ट्र असेल.

### तिसरे मिथक : पाकिस्तानात स्वातंत्र्याच्या वेळी १५% हिंदू होते. आज हे प्रमाण फक्त १.५% आहे कारण त्यांच्या सर्रास कत्तली व धर्मपरिवर्तन केले जात आहे.

अनेकदा संघाचे लोक पाकिस्तानात हिंदूंच्या कमी होत असलेल्या लोकसंख्येबाबत सांगतात की पाकिस्तानात मुस्लिमांनी तेथील हिंदू लोकसंख्येला १९४७ वरील १५% टक्क्यांवरून १.५% आणले आहे. हे धादांत खोटं सुद्धा आरएसएस द्वारे पसरवण्यात आलेल्या त्या शेकडो अफवांपैकी आहे ज्यांचा वापर हिंदूंना मुस्लिमांविरुद्ध भडकवण्यासाठी केला जातो. फेसबुक, व्हॉट्सअॅप आणि इतर नेटवर्कींग साईट्स वर ते असा मुस्लिम विरोधी प्रचार करतात आणि बहुतेक लोक त्यांच्या कारस्थानाला बळी सुद्धा पडतात.

पाकिस्तानात हिंदूंच्या लोकसंख्येबाबत जर आकडे पाहिले तर खरी गोष्ट ही आहे की १९४७ मध्ये पाकिस्तानात हिंदूंची लोकसंख्या १५% होती आणि हे सुद्धा खरे आहे की आज त्यांची लोकसंख्या १.६% आहे, पण मधल्या काळातली गोष्टच गायब केल्यामुळे असा निष्कर्ष काढला जाऊ शकतो की या काळात हिंदूंचे मोठ्या प्रमाणात हत्याकांड करण्यात आले. हे अर्धसत्य खरेतर एक कपटी असत्य आहे.

पाकिस्तानातील हिंदूंचे प्रमाण

| | |
|---|---|
| १९३१ | १५% |
| १९४१ | १४% |
| १९५१ | १.३% |
| १९६१ | १.४% |
| १९८१ | १.५% |
| १९९८ | १.६% |
| २०११ | २ % |

दुसरीकडे, भारतातील पंजाबमध्ये मुस्लिमांचे लोकसंख्येतील प्रमाण

| | |
|---|---|
| १९३१- | ५२.४% |
| १९४१- | ३२.३% |
| १९५१- | ०.८% |
| १९६१- | १.९४% |
| १९७१- | ०.८४% |
| १९८१- | १.०% |
| १९९१- | १.२% |
| २००१- | १.५६% |

वर १९३१ आणि १९४१ चे आकडे त्या भागांचे आहेत जे १९४७ नंतर पाकिस्तानात गेले. आकड्यांमध्ये स्पष्ट दिसून येते की १९५१ येईपर्यंत दोन्ही भागांमध्ये लोकसंख्येच्या प्रमाणात मोठा बदल घडून आला होता.

याचे कारण हे आहे की **१९४७ नंतर दोन्ही देशांमध्ये ज्या दंगली झाल्या, त्यांच्या परिणामी दोन्ही देशांमधून मोठ्या प्रमाणात विस्थापन झाले आणि अनेक लोक मारले सुद्धा गेले. याच कारणामुळे १९५१ येईपर्यंत पाकिस्तानातील हिंदूंची लोकसंख्या फक्त १.३% राहिली. ठीक हेच भारतातील पंजाबमध्ये सुद्धा घडले.** इथे १९४७ मध्ये मुस्लिमांची लोकसंख्या ३३% होती, जी १९५१ मध्ये ०.८%च राहिली आणि आता १.६% आहे.

जर हे तथ्य सुद्धा चुकीच्या पद्धतीने दाखवले तर असे वाटू शकते की पंजाबमध्ये मुस्लिमांचे मोठ्या प्रमाणात हत्याकांड झाले. परंतु असे नाहीये. लोकसंख्येचे आकडे हे सिद्ध करतात की पाकिस्तानमध्ये हिंदूंची लोकसंख्या कमी होणे आणि भारतातील पंजाबमध्ये मुस्लिमांची लोकसंख्या कमी होणे या दोन्ही घटना स्वातंत्र्यानंतर मोठ्या प्रमाणात झालेल्या विस्थापनामुळे झाल्या आणि ही प्रक्रिया १९५१ च्या जनगणनेपर्यंत पूर्ण झाली होती. १९५१ नंतर पाकिस्तानातील हिंदूंची संख्या थोड्या प्रमाणात का होईना, वाढली आहे.

**संघ आणि त्यांच्या सर्व संलग्न संघटना अशा अफवा पसरवून हिंदू जनतेमध्ये मुस्लिमांप्रती द्वेष निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. याशिवाय अशा हजारो भूलथापा आहेत ज्या रोज समाज माध्यमांवर पसरवल्या जात आहेत. इतक्या की त्यांचे उत्तर देणे शक्य होणार नाही.** त्यांचे एक धोरण हेच आहे की आम्ही खोटं बोलत जाऊ, तुम्ही कितीही उघडकीस आणले तरी. तुम्ही जो पर्यंत उघडकीस आणाल, आम्ही अजून २५६ अफवा पसरवल्या असतील आणि आमच्या भूलथापा हजारो लोकांपर्यंत पोहोचलेल्या असतील.

आज हजारोंच्या संख्येने खोट्या बातम्यांच्या

# गौरी लंकेश यांच्या हत्येमागील राजकीय संदर्भ

अभिजीत

मंगळवार ५ सप्टेंबर २०१७ रोजी धर्मनिरपेक्ष, डाव्या विचारांच्या लढाऊ पत्रकार गौरी लंकेश यांची त्यांच्या बंगळूरमधील राहत्या घरी गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. २० ऑगस्ट २०१३ रोजी महाराष्ट्रातील डॉ. नरेंद्र दाभोळकर, २० फेब्रुवारी २०१५ रोजी कॉ. गोविंद पानसरे, ३० ऑगस्ट २०१६ रोजी कर्नाटकातील प्रा. एम. एम. कलबुर्गी यांच्या हत्यांनंतर आता गौरी लंकेश यांच्या हत्येतून लोकशाहीवादी कार्यकर्त्यांच्या व विचारवंतांच्या हत्यांचे सत्र चालूच आहे हे स्पष्ट दिसते.

गौरींच्या हत्येने अनेक प्रश्न पुन्हा एकदा अतिशय तीव्रतेने उपस्थित केले गेले आहेत. आजपर्यंत झालेल्या या हत्यांना जबाबदार कोण? आजपर्यंत कोणावरच कारवाई का झालेली नाही? इत्यादी. गौरींच्या आणि इतर हत्यांच्या निमित्ताने उपस्थित झालेल्या प्रश्नांचे गुन्हेगारी विश्लेषण तर झाले पाहिजे परंतु त्याचे राजकीय विश्लेषण जास्त महत्वाचे आहे.

### गौरी लंकेश यांच्या जीवनकार्याबद्दल

गौरी लंकेश या 'गौरी लंकेश पत्रिके' या कन्नड भाषिक पत्रकाच्या संपादक होत्या. पत्रकारिता आणि चळवळींमध्ये आपल्या प्रतिभा आणि निष्ठावान कामामुळे सर्व भारतात त्यांना प्रचंड आदर आहे. उजव्या विचारसरणीच्या कट्टर विरोधक म्हणून त्यांची ओळख होती. २००३ साली त्यांनी बाबा बुधान गिरी या सुफी संतांच्या कबरीचे हिंदुत्वीकरण करण्याच्या प्रयत्नाला विरोध केला. २०१२ साली त्यांनी मंगलोर मध्ये जातीय संघटनांवर बंदीची मागणी करताना म्हटले होते की हिंदु हा धर्म नसून समाजातील विषमतेची व्यवस्था आहे, ज्यात महिलांचे स्थान दुय्यम दर्जाच्या प्राण्यांचे आहे. त्यांचे असेही मत होते की बसवण्णांचे अनुयायी हिंदू नाहीत. जाती व्यवस्थेच्या त्या कट्टर विरोधक होत्या. आपल्या पत्रिकेतून तर त्या सतत हिंदुत्ववादी शक्तींची पोलखोल करत होत्या. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या (रास्वसं) विचारसरणी विरुद्ध त्यांनी वैचारिक युद्धच पुकारलेले होते. भारतातील सर्व पुरोगामी डाव्या, जातीविरोधी चळवळीच्या कार्यकर्त्यांशी त्यांचा जवळचा संबंध होता आणि त्या या चळवळींच्या मोठ्या समर्थक होत्या. त्यांच्या पत्रिकेतील शेवटचे अप्रकाशित संपादकीय सुद्धा संघ परिवाराकडून सामाजिक प्रसारमाध्यमांवर (सोशल मीडीया) पसरवल्या जात असलेल्या खोट्या बातम्या आणि भूलथापांची पोलखोल करणारे आहे.

### गौरींच्या हत्येला जबाबदार कोण?

चारही विचारवंतांच्या खुनांमध्ये समान गुन्हेपद्धत होती हे प्रखरतेने ध्यानात येते. दाभोळकर, पानसरे, कलबुर्गी आणि गौरी लंकेश यांच्या हत्या कोणत्या व्यक्तींनी केल्या हे शोधणे तपास यंत्रणांचे काम आहे. भारतातील पोलिस यंत्रणांची लायकी, त्यांच्यामध्ये असलेला संघासारख्या फासीवादी संघटनांचा शिरकाव, आजपर्यंतच्या हत्यांचा तपास आणि भाजपचे राजकीय डावपेच बघता या घटनांचा तपास योग्य रितीने होईल आणि खुनी पकडले जातील याबद्दल प्रचंड शंका आहे. विशेषत: आजच्या काळात: मालेगाव बॉंबस्फोट, समझौता एक्स्प्रेस खटला सारख्या घटनांमधील आरोपी कर्नल पुरोहीत आणि साध्वी प्रज्ञा यांना ज्यापद्धतीने जामीन मिळाला आहे, सरकारी वकिलांवर ज्या पद्धतीने दबाव टाकण्यात आला, बनावट चकमकींच्या खटल्यांना ज्याप्रकारे सरकार चालवत आहे, इत्यादी घटनांवरून भाजप सरकारचा दहशतवादी कारवायांमध्ये असलेल्या हिंदुत्ववादी शक्तींवर असलेला वरदहस्त स्पष्ट दिसतो.

हिंदुत्ववादी विचाराच्या परिवारामध्ये अतिशय उदारमतवादी चेहऱ्याच्या संघटनांपासून ते गुप्त पद्धतीने हत्यारांचे प्रशिक्षण देणाऱ्या संघटना सामील आहेत. दहशतवादी कारवाया करणाऱ्या किंवा त्यांचे समर्थन करणाऱ्या अभिनव भारत ते हिंदु जनजागृती समिती सारख्या संस्था अनेकदा चर्चेत राहिल्या आहेत. परंतु या खुनांच्या अशाप्रकारच्या गुन्हेगारी विश्लेषणापेक्षा महत्वाचे आहे त्यांचे राजकीय विश्लेषण. कारण सामाजिक-राजकीयदृष्ट्या सक्रीय असलेल्या, हिंदुत्ववादी, फासीवादी, उजव्या विचारसरणीला विरोध करणाऱ्या विचारवंतांच्या या हत्या आहेत. खुन कोणीही केलेला असो, करणाऱ्यांची आणि करवणाऱ्यांची वैचारिक बैठक जास्त महत्वाची आहे. सॉक्रेटीस ते तुकाराम आणि दाभोळकर ते आता गौरी लंकेश असा पुरोगामी विचारकांच्या हत्यांचा मोठा इतिहास आहे. परंतु आजच्या काळात होत असलेल्या या हत्यांना आजच्या राजकीय चौकटीतच बघितले पाहिजे.

पुन्हा, गौरींच्या हत्येला जबाबदार कोण?

राजकारणाची बाळबोध समज असलेल्या व्यक्तीलाही हे सांगायची गरज नाही की या हत्यांमागे कोणती विचारधारा काम करत आहे. भारतातच नव्हे तर जगातील इतर इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स, अमेरिका, तुर्कस्थान अशा अनेक देशांमध्ये जास्त उजव्या विचारसरणींचा उदय होताना दिसतो आहे. यापैकी भारतासह अनेक देशांमध्ये या शक्तींचे स्वरूप सरळपणे फासीवादी आहे. रास्वसंच्या हिंदुत्वाच्या विचारधारेने प्रेरित असलेल्या गोडसेने गांधींचा खून केला, त्याला आता ७० वर्षे उलटून गेली. गांधीहत्येमुळे ५०च्या दशकात दबकून काम करणारा रास्वसं आणि त्यांच्या सतराशे साठ खुल्या-छुप्या आघाड्यांवरील संघटना आता तोंड वर करून बोलतात. भारताला हिंदु राष्ट्र बनवण्याची भाषा आता खुलेपणाने केली जाते. कुठून आली ही हिंमत? राम मंदीर, ते मंडल आणि गोहत्या ते लव्ह जिहादसारख्या विखारी आंदोलनांमधून वाढलेला धार्मिक-जातीय उन्माद आणि जनाधार हे त्याचे एक महत्वाचे कारण निश्चित आहे. परंतु त्याहीपेक्षा महत्वाचे कारण आहे या सांप्रदायिक आंदोलनांना आणि रास्वसंच्या विचारांना ८० च्या दशकापासून मिळत असलेला भारतातील भांडवलदारांचा भक्कम पाठींबा.

### संकटातील भांडवलशाहीचे अपत्य: फासीवाद

भांडवलशाहीमधील सरकारे ही भांडवलाची दलाल असतात आणि फासीवाद व फासीवादी सरकार हे संकटात सापडलेल्या भांडवलशाहीचे अपत्य असते. नेहरूंच्या भांडवलशाही धोरणांनंतर (ज्यांना चुकीने समाजवादी धोरणे म्हटले जाते), विदेशी भांडवलदारांसोबत युती करून जागतिकीकरणाच्या धोरणांनी देश विकल्यानंतरही भारतातील भांडवलशाही संकटात सापडलेली आहे आणि अर्थव्यवस्थेला पाहिजे तेवढी गती मिळत नाहीये. प्रचंड विषमता, कामगार विरोधी धोरणे, शिक्षणापासून ते आरोग्यापर्यंत आणि रेशनपासून ते वीजेपर्यंत प्रत्येक क्षेत्रात लोकविरोधी धोरणे राबवणाऱ्या सरकारांविरुद्ध जनक्षोभ तापत आहे. अशा परिस्थितीत मनमोहन सरकारची लोकविरोधी काम करण्याची हिंमत जेव्हा थोडीशीच क्षीण झाली तेव्हा यालाच 'धोरण लकवा' म्हटले गेले. पर्याय म्हणून अंबानी ते अडानी आणि टाटा-बिर्ला ते मित्तल पर्यंत भारतातील सर्व मोठमोठे भांडवलदार नरेंद्र मोदींच्या फासीवादी विचारांमागे जाहीरपणे उभे राहिले, त्यांना जाहीरपणे पंतप्रधानपदासाठी समर्थन दिले गेले. भाजपच्या निवडणुक अभियानात भरभरून पैसा ओतला गेला, जो आजही ओतला जातोय. रास्वसं आणि त्यांच्या पिलावळी संघटनांची हिंमत वाढण्याचे मुख्य कारण हा देशाच्या खऱ्या राज्यकर्त्या वर्गाचा, भांडवलदार वर्गाचा, भरभक्कम पाठींबा हे आहे. भांडवलाच्या पाठींब्याशिवाय फासीवाद कधीच असा उफाळून येऊ शकत नाही. हा फासीवाद फक्त विचारवंतांचेच बळी घेत नाहीये, तर अखलाक आणि जुनैदसारख्या अल्पसंख्यंकांचे, रोहित वेमुला सारख्या बंडखोर विद्यार्थ्यांचे, कधी झुंडशाही करून, कधी कोणाच्या घरात शिरून, कधी भाड्याच्या हत्यांच्याद्वारे, आणि सर्वात भीषण म्हणजे सरकारी धोरणांच्या माध्यमातून कोट्यवधी कष्टकरी-कामगार-शेतकऱ्यांचे सुद्धा बळी घेत आहे.

### सोशल मीडीयावरील प्रतिक्रिया

संघ परिवार आणि त्यांच्या ट्रोल्स च्या फौजेने तर कहर केला आहे. उघडपणे गौरींच्या हत्येचे समर्थन केले जात आहे. त्यांची हत्या करण्याची योग्य कारणे काश्मिर बद्दलच्या त्यांच्या मतापासून ते गोमांसापर्यंत शोधली जात आहेत आणि निर्लज्जपणे सांगितली जात आहे. गौरींच्या हत्येवर त्यांना 'कुत्री' संबोधण्यापर्यंत संदेश केले जात आहेत. असे संदेश लिहिणाऱ्या काही व्यक्तींना तर खुद्द पंतप्रधान ट्वीटरवर फॉलो करतात. अशाप्रकारची हिडीस मानसिकता असलेली लोक हे फासीवादाचेच फलित आहे.

### मीडीयाची भुमिका

भारतासह जगभरातील मोठमोठी प्रसारमाध्यमे ही बड्या भांडवलदारांच्या मालकीची आहेत. त्यामुळे ती डाव्या विचारांच्या विरोधी नसतील तरच आश्चर्य. थोडेफार पुरोगामित्व आणि लोकांप्रती सहानुभूती दाखवणारी मीडीया चॅनेल्स सुद्धा कधीच भांडवलशाही व्यवस्थेबद्दल चकार शब्द काढत नाहीत आणि लोकांचा असंतोष कमी करण्याचे काम करतात. गौरींच्या हत्येनंतरही त्यांना कम्युनिस्ट आणि नक्षली दाखवून त्यांच्या

पान १६ वर

# मुस्लिम लोकसंख्या वाढीचे मिथक

पान १३ वरून

वेबसाईट्स भूछत्रा (मशरुम) सारख्या उगवल्या आहेत. यांचे कामच हे आहे की फोटोशॉप वापरा, आफ्रिकेचा व्हिडीओ भारतातील म्हणून दाखवा किंवा वर्तमानपत्रातील बातमीचे शीर्षक बदलवून द्या, काहीही करा. फक्त लोकांच्या डोळ्यात धूळफेक करून आपले जातीय राजकारण वाढवत न्या. हजारो लोक यांच्या सायबर सेल मध्ये काम करतात आणि पगार घेतात.

आज आपण प्रत्येक खोटं उघडकीस तर आणू शकत नाही पण आरएसएसची विचारधारा ओळखणे जरूरी आहे. त्यांच्या फासीवादी विचारधारेसाठी एका समुदायाला दुसऱ्या समुदायाच्या नजरेत शत्रू सिद्ध करणे आवश्यक आहे. जर्मनीमध्ये हिटलरने सुद्धा ज्यू विरुद्ध असाच खोटा प्रचार मोठ्या स्तरावर केला होता. त्याचा प्रचार मंत्री गोबेल्सचे म्हणणे होते की एक खोटं शंभर वेळा सांगितले की ते खरं बनतं.

हिंदु संकृतीचे रक्षण, भारत माता की जय, हिंदू धर्म संकटात (खतरे मे) अशा नाऱ्यांच्या मागे खरेतर हे लोक अंबानी-अडानी सारख्या मालकांच्या सेवेत मग्न आहेत आणि जनतेच्या खिशातील शेवटचा पैसा सुद्धा काढून घेण्यास आतूर आहेत. सोबतच मंदीच्या काळात सरकारच्या लुटखोर धोरणांमुळे निर्माण झालेल्या असंतोषाला मुस्लिमांकडे वळवू पाहत आहेत. आज न्यायावर प्रेम करणाऱ्या प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे की यांचा विरोध करावा. कारण आज जर चुप्प बसलो तर उद्या आपली पाळी येईल. जर्मन कवी पास्टर निमोलरने म्हटल्याप्रमाणे –

***पहिले ते कम्युनिस्टांसाठी आले***
***आणि मी काहीच बोललो नाही***
***कारण मी कम्युनिस्ट नव्हतो.***
***मग ते आले ट्रेड युनियन वाल्यांसाठी***
***आणि मी काहीच बोललो नाही***
***कारण मी ट्रेड युनियन मध्ये नव्हतो.***
***मग ते आले ज्यूंसाठी***
***आणि मी काहीच बोललो नाही***
***कारण मी ज्यू नव्हतो.***
***मग ते आले माझ्यासाठी***
***आणि तोपर्यंत कोणीच वाचले नव्हते***
***जे माझ्यासाठी बोलले असते.***

अनुवाद : अभिजीत

# आधारच्या सरकारी सक्तीचे कारण काय?

पान १५ वरून

बनवल्याशिवाय आधार योजनेला पुढे ढकलू नये आणि कोणत्याही सार्वजनिक सेवेसाठी आधारची सक्ती करू नये. परंतु सरकार जेव्हा असे करते तेव्हा त्याला थांबवणे तर सोडाच, सर्वोच्च न्यायालय सुनावणी करायलाही तयार होत नाही. आजपर्यंत अशी सुनावणी झालेली नाही. उलट याच न्यायालयाने मोबाईल सिम कार्डासाठी आधारद्वारे ओळख पडताळणी सक्तीचे करण्याचे आदेश दिले आहेत. आधारच्या सक्तीला आव्हान देण्यासाठी अनेक लोक सर्वोच्च न्यायालयात गेले आहेत. अनेक सुनावण्यांनंतर ११ ऑगस्ट २०१५ रोजी एका खंडपीठाने निर्णय दिला की हा एक महत्वपूर्ण विषय आहे आणि यावर सुनावणीसाठी नऊ सदस्यांचे एक घटनापीठ बनवले जावे. या निर्णयाची शिफारस मुख्य न्यायमूर्तींकडे करण्यात आली आणि तोपर्यंत सरकारने आधारची सक्ती करू नये असे म्हटले गेले. परंतु याचिकाकर्त्यांकडून अनेकदा आठवण दिली जाऊनही घटनापीठ बनवले गेले नाही. याच दरम्यान एका मागोमाग एक अनेक कामांसाठी आधारची सक्ती केली गेली आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या पहिल्या आदेशानुसार सरकारच्या या पावलावर निर्बंध आणण्यासाठी अनेक लोक विविध पीठांसमोर गेले आहेत, परंतु यावर निर्णय देण्याऐवजी सर्वांनी घटनापीठावर निर्णय सोडला आहे. खुप काळ वाट पाहिल्यानंतर २३ महिन्यांनी आता मुख्य न्यायमुर्तींनी घटनापीठाद्वारे १८-१९ जुलै रोजी याची सुनावणी निश्चित केली आहे. परंतु या दरम्यान अनेक कामांसाठी आधारची सक्ती करून सरकारने अनेक नागरिकांना आधार बनवायला भाग पाडले आहे. म्हणजे आता न्यायालयाच्या निर्णयाला फार अर्थ राहिलेला नाही. नोटबंदीच्या वेळेसही आपण अशी स्थिती पाहिली आहे. नोटबंदीच्या वेळी सुद्धा लगेच सुनावणी करण्याऐवजी सर्वोच्च न्यायालयाने याच महिन्यात काही दिवसांपूर्वी सरकारला नोटीस बजावून विचारले की जनतेला जुन्या नोटा बदलवण्याची पुरेशी संधी का दिली नाही! थोडक्यात चिमणीने शेत खाऊन झाल्यावर आता शेताच्या राखणीबद्दल बोलले जात आहे जे निरर्थक आहे. अशाप्रकारे आपण पाहू शकतो की सध्याच्या भांडवलशाही व्यवस्थेत सत्ताधारी वर्गाच्या आक्रमणापासून जनतेच्या अधिकारांचे रक्षण करण्यात, संसद आणि न्यायालयासारख्या संस्था कोणतीही प्रभावी भूमिका बजावू शकत नाहीत.

# आधारच्या सरकारी सक्तीचे कारण काय?

मुकेश असीम

आधारच्या कक्षेला व्यापक बनवण्याचे काम मोदी सरकारने सतत चालू ठेवले आहे. २००९ मध्ये यूपीए सरकारने जेव्हा आधार कार्डाची योजना चालू केली होती, तेव्हा म्हटले होते की आधारची नोंदणी करणे स्वैच्छिक असेल आणि याचा वापर संशय असल्यास एखाद्या व्यक्तीची ओळख पटवण्यासाठी केला जाईल. तेव्हा याचे उद्देश सांगितले होते की कल्याणकारी योजना गरजू गरीब-वंचितांपर्यंत पोहोचवणे, चुकीचा फायदा घेणाऱ्यांना वेगळे करणे, भ्रष्टाचार कमी करणे, सरकारी योजनांना सक्षम आणि पारदर्शक बनवणे, वगैरे. जनतेला हे समजवण्याचा प्रयत्न करण्यात आला की सरकारी योजनांचा खरा फायदा मिळावा म्हणून जनतेला तिच्या अधिकारांशी आणि निजतेशी (खाजगीपणाच्या हक्काशी) काहीतरी तडजोड करावी लागेल, प्रत्येक व्यक्तीची ओळख आणि माहिती सरकारकडे असल्यामुळे गरीबांना फायदा पोहोचेल अशी धोरणे सरकार आखू शकेल, योग्य व्यक्तींपर्यंत फायदा पोहोचवू शकेल आणि गरिबी मिटवण्यात यशस्वी होईल. परंतु इतक्या वर्षांमध्ये आधार कार्ड लागू होण्याचा अनुभव काय सांगतो?

म्हणायला अजूनही आधार स्वैच्छिक आहे, परंतु फक्त सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठीच नाही तर दैनंदिन जीवनातील प्रत्येक जरूरी कामासाठी पण याला आवश्यक बनवले जात आहे - मग ते शालेय शिक्षण असो, बँकेचे खाते असो, रेशन असो वा मोबाईल, दवाखान्यातील इलाजापासून ते शाळेत मुलांना मिळणाऱ्या माध्यान्न भोजनापर्यंत, पगारापासून ते पीएफ-पेन्शन पर्यंत, कोणतेही काम असो प्रत्येक कामासाठी आधार कार्ड सक्तीचे केले जात आहे. आधार बनवले नसेल तर कोणत्याही व्यक्तीचे दैनंदिन जीवन फक्त अवघडच होणार नाही, तर त्याची स्थिती समाजातून बहिष्कृत केल्यासारखी होईल. यातून एक गोष्ट स्पष्ट आहे की आधारचे खरे कारण पारदर्शकपणे आणि सहजपणे जनतेपर्यंत सुविधा पोहोचवणे निश्चित नाही. मग आधारचे कारण आहे तरी काय?

### गरीबांचे रेशन-पेन्शन बंद करुन सरकारी बचत

सरकारचे म्हणणे आहे की आधारमुळे माणसांची योग्य ओळख पटवून सरकारी योजनांमध्ये होणारी चोरी आणि भ्रष्टाचार कमी केला आहे, ज्यामुळे खर्चात चांगली बचत झाली आहे आणि या पैशाला विकास कामांसाठी वापरले जाईल. या बचतीची कोणतीही सविस्तर माहिती आजपर्यंत उपलब्ध झालेली नाही परंतु आधार प्राधिकरणाचे प्रमुख ए.बी.पांडे यांनी १२ जुलै रोजी इंडियन एक्सप्रेस मध्ये जागतिक बँकेच्या एका अभ्यासाचा हवाला देत दावा केला आहे की आधारमुळे लबाडी करून सुविधा घेणाऱ्यांना वगळून ५६ हजार कोटींची बचत झाली आहे. खरेतर या अहवालाला वाचल्यावर लक्षात येईल की ज्या योजनांमध्ये ही बचत झाल्याचा दावा केला आहे, त्या योजनांवर एकूण् खर्चच तेवढा आहे! आता बचतीची रक्कम कितीही असो, त्यापेक्षा महत्वाचे विश्लेषण हे आहे की ही बचत कुठे आणि कोणत्या पद्धतीने होत आहे.

या बचतीच्या स्त्रोतांचे एक उदाहरण ११ जुलैच्या द हिंदू मध्ये प्रकाशित बातमीमध्ये मिळते. या अहवालानुसार कर्नाटकच्या भविष्यनिर्वाहनिधी विभागाकडून पेन्शन घेणाऱ्या ५ लाख लोकांपैकी ३०% म्हणजे दिड लाख लोकांना २ महिने पेन्शनच मिळाली नाहीये कारण पेन्शनला आधारशी जोडण्यात आले आहे. पेन्शनर लोक आजपर्यंत जिवंत असल्याचा जो दाखला देत होते तो आता चालणार नाही, उलट आता त्यांना स्वत: बँकेत जाऊन हाताच्या अंगठ्याचा ठसा मशिनवर उमटवून स्वत:ची ओळख पटवावी लागेल आणि स्वत: जिवंत असल्याचे सिद्ध करावे लागेल. परंतु पेन्शनर लोकांची एक मोठी संख्या अत्यंत वृद्ध व आजारी असल्यामुळे अशक्त असते आणि त्यांच्यासाठी अगोदर आधार बनवणे व नंतर दरवेळी बँकेत जाऊन स्वत: जिवंत असल्याचे सिद्ध करणे फारच अवघड काम असणार आहे. म्हातारपणामुळे तर अशा प्रकारची जैविक माहिती गोळा करण्यासाठी आणि सत्यापित करण्यासाठी काही जणांचे हातसुद्धा असमर्थ असतील. परिणाम हा की आयुष्यभर काम करून जमा केलेल्या स्वत:च्याच पैशातून मिळणाऱ्या पेन्शन पासून अनेकांना वंचित केले जाणार. परंतु आजचे सत्ताधारी याला अन्याय आणि लूट न म्हणता बचत म्हणत आहेत. ही तर फक्त एका राज्यातली अवस्था आहे, संपूर्ण देशातील अशा संख्येचा तुम्ही अंदाज बांधू शकता.

सरकारी नोकरी केलेल्या, तुलनेने जास्त शिकलेल्या आणि सक्षम लोकांची ही अवस्था आहे. गावांमध्ये म्हातारपणाचे पेन्शन घेणाऱ्या, शहरातील बँकेतही जाऊ न शकणाऱ्या गरीब, अशिक्षित, कमजोर लोकांची अवस्था काय असेल! पेन्शन योजनेला जेव्हा आधारशी जोडले गेले तेव्हा फक्त राजस्थान मध्येच ज्यांच्याकडे आधार नाही किंवा ज्यांच्या माहितीमध्ये चुका झाल्या आहेत अशा १० लाखाच्यावर लोकांना मयत किंवा नकली म्हणून त्यांची पेन्शन बंद करण्यात आली. तक्रारी आल्यानंतर काही सामाजिक संघटनांनी चौकशी केली तर असे आढळले की यापैकी बहुसंख्य लोक मेलेले नाहीत तर जिवंत आहेत. परंतु हे सर्व लोक अत्यंत गरीब, म्हातारे, असहाय्य, विधवा-महिला इत्यादी आहेत ज्यांना शासकीय यंत्रणेने एका झटक्यात महिना ५०० रुपयाच्या पेन्शन पासून वंचित केले आहे. नवभारत टाईम्स मधील एका बातमीनुसार बिहारमधील एका गावाचे नाव 'पानापुर करायत' आहे, परंतु या गावातील आधार बनवणाऱ्या माणसाने सर्वांच्या पत्यावर गावाचे नाव 'पानापुर करैत' असे केले. आता म्हातारपणाची पेन्शन देणाऱ्या विभागाने पत्ता जुळत नाही असे सांगून या गावातील सर्व वृद्धांची पेन्शन थांबवली आहे.

१० जुलैच्या कॅच न्यूज मध्ये प्रकाशित, झारखंड मधील सार्वजनिक रेशन व्यवस्थेवर आधारच्या परिणामांबाबत एका सर्व्हेनुसार रेशन वितरणामध्ये अगोदर असलेल्या अडचणींसोबत आधारने अजून नव्या अडचणी जोडल्या आहेत आणि मोठ्या संख्येने गरिबांना स्वस्त रेशन पासून वंचित केले आहे. रजिस्टर मध्ये नोंद असतानाही रेशन न देणे किंवा कमी देण्याच्या प्रश्नावर तर आधारमुळे उत्तर मिळणे शक्यच नव्हते. अजून जवळपास १५% तर रेशन पासून यामुळे वंचित राहत आहेत कारण की श्रम करून हाताची बोटं घासल्यामुळे मशिनवर ठसे नीट उमटत नाहीत आणि त्यामुळे ते स्वत:ची ओळख पटवू शकत नाहीत. ज्यांना रेशन मिळतंय त्यांना सुद्धा कधी नेटवर्क नसल्यामुळे तर कधी वीज नसल्यामुळे, कधी मशिन खराब तर कधी सर्व्हर बंद अशा कारणांमुळे अनेकदा एकापेक्षा जास्त वेळा चक्कर मारावी लागते. यात एकाबाजूला दिवसाची मजुरी बुडते आणि दुसरीकडे येण्याजाण्याचा खर्चही वाढतो. याशिवाय असेही लोक आहेत जे काही कारणांमुळे आधार बनवू शकले नाहीत. अशा लोकांना तर आता शासन जिवंत नागरिक मानायलाच तयार नाही.

सरकारी आकड्यांप्रमाणे आत्तापर्यंत ११५ कोटी आधार कार्ड बनवले गेले आहेत. यापैकी काही लोकांचा नक्कीच मृत्यू झालेला असणार आणि ८६ लाख आधार तर रद्द करण्यात आले आहेत. भारताची आजची लोकसंख्या जवळपास १३० कोटी आहे. म्हणजे जवळपास २० कोटी नागरिकांकडे आधार नाहीये. हे निर-आधार लोक कोण आहेत? आधार योजनेच्या सुरुवातीला असे म्हटले गेले होते की असे अनेक लोक आहेत ज्यांच्याकडे कोणतेही ओळखपत्र नसल्यामुळे ते सुविधांपासून वंचित राहतात आणि आधारमुळे त्यांना ओळखपत्र मिळून योजनांचा लाभ मिळेल. परंतु आधार बनवताना अगोदरच कोणतेतरी ओळखपत्र लागते आणि अशा लोकांचे आधार कार्डही बनत नाही. ओळखीच्या व्यक्तिद्वारे आधार देण्याची सुद्धा सोय आहे परंतु अशाप्रकारे फक्त २ लाख आधार कार्डच दिली गेली आहेत. अशाप्रकारे जे गरीब, असहाय्य, आणि कमजोर लोक आहेत आणि सरकारी योजनांपासून अगोदरच वंचित आहेत त्यांना तर आता पूर्णत: बाहेर करण्यात आले आहे. आता तर रेशन असो वा पेन्शन , प्रत्येक ठिकाणी अशा लोकांना मृत किंवा नकली घोषित करून त्यांची नावंच लाभार्थींच्या यादीतून कापली जात आहेत. अशाप्रकारे देशातील गरीब लोकांना सरकारी योजनांची जी काही थोडीफार मदत मिळत होती, त्यापासून वंचित करण्याचे आधार हे मोठे हत्यार बनले आहे.

आधारद्वारे विविध कल्याणकारी योजनांच्या जागी सरळ नकदी पैसे देण्याचा जो मुद्दा आहे, त्यात माणसाची खरी ओळख पटवण्याचा मुद्दा मानला तरी सुद्धा प्रश्न आहे की आधार काय करू शकते. कोणत्या व्यक्तीला फायदा द्यायचा हे ठरवण्याचे काम तर तीच राजकीय-प्रशासकीय यंत्रणा करणार आहे जी आजपर्यंत हे काम करत आली आहे. या व्यवस्थेमध्ये रोकड वाटण्यासाठी बँकेचा एजंट हा अजून एक मध्यस्थ तयार होत आहे जो आधारद्वारे ओळख पटली तर पैसे देणार आहे. यामध्ये काहीच स्वचालित नाहीये आणि लूटमारीचे तंत्र जसेच्या तसेच आहे, उलट लाभार्थीला त्रास देऊन लाभापासून वंचित करण्याचे बहाणे मात्र वाढले आहेत. झारखंड, दिल्ली, छत्तिसगड, गुजरात अशा सर्व राज्यांमध्ये जिथे जिथे आधारची सक्ती झाली आहे, तिथे फक्त कार्यक्षमताच घसरली नाही तर सार्वजनिक सुविधांपासून गरीब, असहाय्य लोक – आदिवासी, दलित, वृद्ध, महिला-विधवा, अपंगांना वंचित करण्याचे आणि या सेवांमध्ये भ्रष्टाचार आणि चोरी वाढवण्याचे आधार एक माध्यम तयार झाले आहे.

भ्रष्टाचार आणि चोरी थांबवण्याच्या नावाने आणलेली आधार योजना स्वत:च भ्रष्टाचारावर टिकलेली आहे. १२ जुलैच्या हिंदुस्तान टाईम्स मधील बातमी नुसार आजपर्यंत आधार बनवणाऱ्या साडे ६ लाख एजंसीपैकी ३४ हजार पेक्षा जास्त एजंसी भ्रष्ट आणि लबाडीच्या कामांमध्ये अडकल्या आहेत. यामध्ये नकली कागदपत्रे तयार करणे, पैसे घेऊन पत्ता बदलणे अशा गडबडी त्यांनी केल्या आहेत. आधार बनवण्यासाठी दिलेली कागदपत्रे याच एजंसींकडे सोडून दिली आहेत, त्यामुळे या कागदपत्रांचा दुरुपयोग होण्यावर कोणतीच आडकाठी नाही. याशिवाय हात आणि डोळ्यांची जैविक माहिती घेण्यासाठी जी माहिती यांनी गोळा केली होती, तीची प्रत सुद्धा एजंसींकडे सोडण्यात आली आहे, ज्याचा वापर दुसऱ्यांच्या नावे केला जाऊ शकतो. याचप्रकारे जेव्हा रिलायंस जिओ किंवा एखाद्या बँकेला ओळख पटवण्यासाठी हात स्कॅन केला जातो तेव्हा त्यांच्याकडे सुद्धा माहितीची प्रत शिल्लक राहते आणि त्या माहितीचा पुन्हा वापर होऊ शकतो. अशाप्रकारच्या घटना अगोदरच समोर आल्या आहेत. हिंदुस्तान टाईम्सच्या बातमीमध्ये झारखंडमधील लातेहार येथील घटनेचा उल्लेख आहे. इथे एक वयस्क पती-पत्नी बँकेच्या एजंटकडे आपले पेन्शनचे पैसे घेण्यासाठी गेले तेव्हा समजले की पैसे तर अगोदरच कोणीतरी काढून नेले आहेत. आधार प्राधिकरणाचे स्वत:चे असे मत आहे की फक्त छोट्या एजंसीच नाहीत तर एक्सिस बँक, देना बँक, बँक ऑफ इंडिया आणि एनएसडीएल सारख्या मोठ्या बँका आणि संस्था सुद्धा अशा भ्रष्टाचारामध्ये सामील असल्याचे दिसून आले आहे. या घटनांमधून भ्रष्टाचार आणि चोरी समाप्त करण्याचे आधारचे उद्दिष्ट पूर्णत: चुकीचे असल्याचे सिद्ध होते.

भ्रष्टाचार कमी करणे नाही तर गरीब, वंचित लोकांना योजनांचा लाभ घेण्यापासून वंचित करणे हा आधार मुळे होणाऱ्या बचतीचा मुख्य आधार आहे. सरकार मात्र सांगत आहे की हेच गरीब लोक चोरी करत होते जे आता थांबवले गेले आहे. असे काम तेच सरकार करू शकते जे सर्वांना आरोग्य सुविधा उपलब्ध न होण्याला समस्याच मानत नाही. त्यांच्या दृष्टीने जे लोक ओळख न पटवता इलाज करवू इच्छितात ते रोगी लोकच समस्या आहेत. अशा सरकारसाठी सर्वांना पुरेसे अन्न न मिळणे किंवा लहान मुलांमध्ये वाढते कुपोषण ही समस्या नाहीये तर ओळख न पटवता शाळेत माध्यान्न अन्न घेऊ इच्छिणारी मुलंच समस्या आहेत. असे काम तेच सरकार करू शकते जे सध्याच्या व्यवस्थेतील शोषणाला गरीब, कष्टकरी लोकांच्या गरीबेचे कारण मानत नाही तर उलट सरकारच्या दृष्टीने हे सर्व लोक आळशी, कामचोर, भ्रष्ट आहेत आणि ते मेहनती, प्रतिभावान भांडवलदारांनी आपल्या कर्तृत्वाने कमावलेले धन माध्यान्न भोजन, रेशन इत्यादींद्वारे लूटू पहात आहेत. म्हणूनच या सरकारची इच्छा आहे की कधीही एखादा व्यक्ती गुन्हेगार किंवा संशयास्पद वाटला तर त्याची ओळख पटवून त्याला या सुविधांच्या मार्गे 'लुट' करण्यापासून थांबवता यावे.

### पाळत यंत्रणा

बँक खात्यापासून ते मोबाईल फोन पर्यंत सर्व गोष्टींसाठी आधारची सक्ती आहे. ही एक अशी पाळत यंत्रणा आहे जी देशाच्या प्रत्येक नागरिकावर प्रत्येक वेळी, त्याच्या परवानगीशिवायच, त्याच्या प्रत्येक कृतीवर नजर ठेवू शकते आणि त्याच्या कोणत्याही कृतीला रोखू शकते. त्याच्यावर नाराज झाल्यास त्याचे रेशन, पगार, पेन्शन, शाळेतील मुलाचा दाखला, दवाखान्यातील इलाज, मोबाईलवरचे बोलणे, इंटरनेटच्या माध्यमातून काही करणे-वाचणे, वाचनालयातून एखादे पुस्तक घेणे, कुठे जाण्यासाठी बस/ट्रेनचे तिकीट घेणे म्हणजे थोडक्यात कोणत्याही सुविधेपासून त्याला वंचित करू शकते. खरेतर आधार ही सर्वात जास्त वंचित गरजवंतांना कल्याणकारी योजनांपासून वंचित करण्याची आणि सरकारी यंत्रणेच्या जवळच्या लोकांना फायदा पोहोचवण्याची यंत्रणा तर आहेच, पण त्यासोबतच नागरिकांवर नजर ठेवण्याची आणि हेरगिरी करण्याची सुद्धा यंत्रणा आहे, जी आपल्या निजतेचे (खाजगीपणाच्या हक्काचे) हरण करत आहे आणि आपल्या लोकशाही हक्कांना चिरडून टाकण्यासाठी एक फास तयार करत आहे. सर्व कल्याणकारी उपक्रम, ज्यांच्यामध्ये अगोदरच खूप कमतरता होत्या, आता पूर्णत: नष्ट केले जात आहेत आणि आपल्या दैनंदिन जीवनाच्या प्रत्येक अंगावर सरकारी यंत्रणेची पकड मजबूत करण्याची आणि लोकशाही स्वातंत्र्य व अभिव्यक्तीची गळचेपी करण्याची तयारी केली जात आहे.

न्यायव्यवस्थेची भूमिका

इथे आपण सर्वोच्च न्यायालयाच्या भूमिकेकडे सुद्धा लक्ष दिले पाहिजे, ज्याला लोकशाही, राज्यघटना आणि नागरिकांच्या अधिकारांचा संरक्षक मानले जाते आणि ज्याच्याकडून अनेक लोकशाहीवादी-उदारमतवादी लोक लोकशाही हक्कांच्या रक्षणाची अपेक्षा ठेवतात. सत्य हे आहे की सर्वोच्च न्यायालयाने अनेकदा सरकारला म्हटले आहे की सुरक्षिततेचे योग्य कायदे

पान १४ वर

# नोटबंदी –चार आण्याची कोंबडी, बारा आण्याचा मसाला

नागेश धुर्वे

रिझर्व बँकेने आपल्या वार्षिक अहवालात सांगितले की नोटबंदीत रद्द झालेल्या १००० व ५०० रु.च्या ९९% नोटा बँकेत परत जमा झाल्या आहेत. म्हणजेच १५ लाख ४४ हजार कोटी किमतीच्या रद्द झालेल्या नोटांमधून १५ लाख २८ हजार कोटी रुपये बँकेत पुन्हा जमा झाले आहेत. यावरुन हे सिद्ध झाले आहे की नोटबंदीचा निर्णय ज्याला क्रांतीकारक निर्णय वगैरे म्हणून प्रचार प्रसार करून जनतेच्या मनात बिंबवण्यात आलं होते तो निर्णय सपशेल फोल ठरलाय. आम्ही नोटबंदी झाल्यापासूनच सांगत होतो की हा निर्णय चुकीचा आहे. त्यासाठी बिगुल मधेच या आगोदर लिहिलेला लेख वाचू शकता (लिंक - http://marathi.mazdoorbigul.net/archives/४२०). नोटबंदीमुळे देशातील जनतेला नोटा बदलून घेण्यासाठी आपला काम धंदा सोडून रांगेत उभे राहावे लागलेच पण त्याचबरोबर जवळ–जवळ २०० लोकांना आपल्या प्राणाला मुकावे लागले. याला जबाबदार कोण? आणि हे सगळे होत असताना "अच्छे दिन" वाले मोदी सरकार निर्लज्जपणे सांगत होते की "थोडा त्रास होईल.... सहन करा. पण येणाऱ्या दिवसात देशाला या निर्णयाचे खूप फायदे मिळणार आहेत." फायदे कोणते तर काळे धन नष्ट होईल, दहशतवादाला आळा बसेल तसेच नकली नोटा समाप्त होतील. याचा उल्लेख खुद्द मोदींनी नोट बंदीची घोषणा केलेल्या भाषणात केला होता.पण ना दहशतवादाला आळा बसलाय ना काळे धन नष्ट झाले आहे. उलट असं म्हणावे लागेल की जे थोडेफार काळे धन नोटांच्या स्वरुपात होते ते पांढरे करण्याची संधीच या मोदी सरकारने नोटबंदी करून उपलब्ध केली. कारण प्रामाणिक नागरिकांना त्रास होऊ नये म्हणून सरकारने जुन्या नोटा बँकेत जमा करत असताना रु.२.५ लाख विना अडथळा जमा करता येतील असे सांगितले. पण बऱ्याच महाभागांनी आपल्या मित्र, नातेवाईक, नोकर, यांच्या नावावर पैसे जमा करून आपला काळा पैसा पांढरा केला त्यामध्ये भाजपसह अन्य राजकीय पक्षांनी सुद्धा हात धुवून घेतला. पण मोदीच सत्तेत यायच्या अगोदर गळा फाडून सांगत होते की स्विस बँकेत असलेले काळे धन देशात आणून प्रत्येक नागरिकांच्या खात्यावर १५-१५ लाख रु. जमा करणार. १५ लाख सोडाच १५ पैसे सुद्धा हे सरकार जमा करू शकलं नाही. असो हेच मोदी नोट बंदीची घोषणा करून जपानच्या दौऱ्यावर गेले आणि तेथील भाषणात मोठया तोऱ्यात नोटबंदीचे फायदे सांगत असताना अगदी अभिनयाचा वापर करून जनतेला होणाऱ्या त्रासाला, समस्यांना हसत हसत सांगत होते. कदाचित तेव्हा त्यांना कल्पना नसावी की नोटबंदीमुळे देशात काय परिस्थिती उद्भवली आहे. भारतात परत आल्यानंतर त्यांच्या लक्षात आले की परिस्थिती खूप बिकट आहे तेव्हा गोव्याच्या एका भाषणात मोदी अक्षरशः रडले. हे फक्त लोकांना भावनिक करण्यासाठीचे नाटक होते हे सुज्ञ जनतेला वेगळे सांगण्याची गरज नाही (भक्त सोडून). पुढे मोदींनी देशातील जनतेला सांगूनच टाकले की "मला फक्त ५० दिवस द्या. फक्त ५० दिवस मी तुमच्याकडे मागतोय. त्यानंतर सर्व काही ठीक होईल आणि जर मी चुकीचा निघालो तर मला हवी ती शिक्षा द्या मी ती भोगायला तयार आहे. आता रिझर्व बँकेच्या अहवालावरून तसेच जीडीपीच्या ताज्या आकडेवारीवरून हे सिद्ध झालेय की नोटबंदीचा निर्णय देशाला दरीत ढकलणारा होता. आता प्रश्न हाच आहे की मोदी आपल्या शब्दाला जागणार की नाही ?

आता थोडे आकडेवारीवरून बघुयात की नोटबंदी कशी फोल ठरली – बँकेत जमा झालेल्या नोटांचे मूल्य आहे १५ लाख २८ हजार कोटी तर रद्द केलेल्या नोटांचे मूल्य होते १५ लाख ४४ हजार कोटी रु. म्हणजेच ९९% नोटा पुन्हा बँकेत जमा झाल्या आहेत. (यामध्ये सहकारी बँकेत जमा झालेल्या नोटा धरल्या नाहीत त्या अंदाजे १० हजार कोटी रु.असण्याची शक्यता आहे) सरकारला नोटबंदीतून १६ हजार कोटी रु. फायदा जरी धरला तरी सरकारला तोटाच झाला आहे कारण याच दरम्यान सरकारने नवीन नोटा छापण्यासह विविध कारणांसाठी २१००० हजार कोटी रु. खर्च केलेत. यालाच म्हणतात "चार आन्याची कोंबडी, बारा आन्याचा मसाला". तर हा तोटा आपला आहे, कारण हा सगळा पैसा आपल्याकडून कर रुपात गोळा केला जातो. एवढेच नाही तर नोट बंदी दरम्यान २०० लोकांचा मृत्यू झाला, जनतेला विनाकारण अनेक दिवस रांगेत उभे राहावं लागलं, रिझर्व बँकेचे ३५००० हजार कोटी रु. नी उत्पन्न कमी झाले, उद्योग धंदे ठप्प पडले व त्याचबरोबर असंघटित क्षेत्रावर खूप मोठा परिणाम झाला, ३ कोटी पेक्षा जास्त लोकांवर बेरोजगार होण्याची पाळी आली. सगळ्यात मोठा परिणाम देशाच्या जीडीपी वर झाला. ताज्या आकडेवारीनुसार जीडीपी वाढ ५.७ टक्यां वर आली. गेल्या तीन वर्षात देशाचा जीडीपी वाढीचा दर ८ टक्क्यावरून ५.७ टक्क्यापर्यंत खाली आला आहे. ५६ इंचाच्या मोदी सरकारला सुद्धा सत्तेत येऊन तीन वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यामुळे देशाचे जवळ जवळ ५ लाख कोटीचे नुकसान झाले आहे. यावरून आपण आता सरकारला आणि भाजपला प्रश्न विचारला पाहिजे की "कुठं नेऊन ठेवले आहे देशाला?

एवढंच नाही तर नोटबंदीनंतर नवीन काळा पैसा सुद्धा निर्माण झाला. नोटबंदी झाल्या-झाल्या गोरगरिब कामगार, नोकर चाकर यांना व्यापाऱ्यांनी व मालकांनी त्यांचा पगार जुन्या नोटांच्या स्वरूपातच दिले. म्हणजेच या मालकांनी आपला काळा पैसा गोरगरिब कष्टकरी जनतेच्या माथी मारला आणि या जनतेला मात्र या नोटा बँकेत तसेच इतरच खर्च करण्यासाठी वन-वन भटकावे लागले. आणि काही दुकानदारांनी, व्यापाऱ्यांनी याच नोटा घेण्यासाठी हजाराला शंभर, दोनशे इतके कमिशन घेतले. या दरम्यान काही दलाल सुद्धा निर्माण झाले होते. त्यांनी हजार व पाचशेच्या नोटा विकत घेण्याचा काळा धंदा सुरू केला होता. यावरून आपल्या असे लक्षात येते की, नोटबंदी हा एक स्वातंत्र्या भारतातील सगळ्यात मोठा घोटाळा होता असे म्हणने वावगे ठरणार नाही.

खरं तर नोट बंदी हा काळ्या धनावर किंवा नकली नोटांवर हल्ला नव्हता तर मोठया भांडवलदारांना फायदा पोहोचविण्यासाठीच नोट बंदी केली होती. रिझर्व बँकेच्या मागील एका अहवालात सांगितले आहे की मार्च २०१७ च्या तिमाहीत १,००० कोटी पेक्षा जास्त उलाढाल करणाऱ्या कंपन्यांची विक्री १०% नी वाढली आहे जी मार्च २०१६ च्या तिमाहीत फक्त ३% च वाढली होती. पण मग अगोदरच मागणीत घट असून तसेच नोट बंदीचा परिणाम होऊन देखील या कंपन्यांची इतकी विक्री कशी काय वाढली? कारण ५० कोटी रु. पेक्षा कमी व्यवसाय करणाऱ्या कंपन्यांची विक्री घटून अर्ध्यावर आली. बाजारातील त्यांचा हिस्सा कमी होऊन मोठया भांडवलदाराकडे आला. पण या छोट्या कंपन्याच कमी गुंतवणूकीमुळे अधिक श्रमाचा वापर करतात अर्थात जास्त रोजगार निर्माण करतात. मोठया कंपन्या अधिक भांडवलाचा आणि कमी श्रमाचा उपयोग करतात. डिजिटल, कॅशलेस, जीएसटी ह्या सगळ्या योजना भांडवलाचे केंद्रीकरण आणि मक्तेदारीच्या प्रक्रियांना अजून जलद करत आहेत. त्यामुळेच मोठ्या प्रमाणात कामगारांना बेरोजगार व्हावं लागत आहे आणि यामुळेच मोदींनी सर्व घोषणा, वायदे करून देखील नवीन रोजगार उपलब्ध होत नाहीत. म्हणुनच तर भांडवलदारांचे गट, आणि भांडवली मीडिया मोदी, नोटबंदी, जीएसटी, कॅशलेसचे गुणगान करत आहेत. याचा मार मात्र कामगार, लहान शेतकरी, निम्न मध्यम वर्ग यांना कंगाल बरबाद करत आहे. मग प्रश्न पडेल की तरी देखील नोटबंदीला जनतेन विरोध का केला नाही? त्याची कारणे अनेक आहेत. एक म्हणजे नोट बंदी झाल्यानंतर विरोधी पक्षांनी ठामपणे विरोध केला नाही. सावध भूमिका घेत हळू हळू विरोध करण्यास सुरवात केली, तोपर्यंत भाजप आणि भांडवली मीडियाने आपलं काम केलं होते. आरएसएस व भाजपने राष्ट्रवाद, देशभक्ती, पाकिस्तान, आपल्या देशाचे सैनिक यांचा वापर करून जनतेला भावनिक व भ्रमित करण्यात यश मिळवलं एवढंच काय तर वरील सर्व आकडेवारीवरून नोट बंदी फोल होती कोणीही व्यवहारीक व्यक्ती सांगू शकेल. तरी देखील अरुण जेटली म्हणतात की "नोट बंदी अयशस्वी झाली असे जे लोक म्हणतात त्यांना नोटबंदी समजली नाही" याच्यापेक्षा हास्यास्पद काय असू शकेल? यांच धोरण 'खोटा बोला पण रेटून बोला' आणि हे नोटबंदीचं खोटं आपल्या सगळ्या मिडीया यंत्रणा वापरुन खरं म्हणून पसरवण्याचा उद्योग हे सरकार करत आहे. आता नोटबंदी यशस्वी कशी झाली हे सांगण्यासाठी मोदी सरकार नोटबंदीनंतर करदाते वाढल्याचे सांगत आहे. खर पाहिलं तर सरकारच्याच मंत्र्यांनी करदात्यांबद्दल सांगितलेल्या आकडेवारीत मोठी तफावत दिसून येते. खुद्द पंतप्रधानांनी दिलेला आकडादेखील इतर कोणत्याही मंत्र्याच्या आकडेवारीशी जुळत नाही. विविध उच्चपदस्थांनी विविध दिवशी सांगितलेली आकडेवारी खालीलप्रमाणे

मोदी: ३४ लाख – १५ ऑगस्ट

अरविंद सुब्रमण्यम: ५.४ लाख – १२ ऑगस्ट

संतोष गंगवार: ३३ लाख – २ ऑगस्ट

अरुण जेटली: ९१ लाख – १७ मे

वरील आकडेवारीनुसार पाहिल्यास, सरकारच्या विविध खात्यांमध्येच मेळ नसल्याचे आपल्याला दिसते. तसेच मोदी १५ ऑगस्टच्या भाषणामध्ये सांगतात की ३ लाख कोटी रुपयांचा काळा पैसा बँकामध्ये जमा झाला आहे. पण रिझर्व्ह बँकेने असे आपल्या अहवालात कुठेही म्हटले नाही. मग प्रश्न पडतो की मोदी हा काळा पैसा कुठून आणतात. वर सांगितल्याप्रमाणे जनतेला भ्रमित करण्यासाठी ही सर्व बनवाबनवी आहे. करदाते वाढलेत हे खरं आहे पण यात नोटबंदीचा काहीही संबंध नाही. याचं कारण हे आहे की दरवर्षी करदाते वाढतंच आहेत. सरकारने नोटबंदी करतेवेळी हे देखील सांगितलं होतं कि बाजारात येणाऱ्या नवीन नोटा या पूर्वीच्या नोटांपेक्षा अधिक सुरक्षित असतील. परंतु अलीकडच्या सरकारच्याच आकडेवारीनुसार नवीन बनावट नोटांची संख्या पूर्वीपेक्षा जास्त आहे. त्यामुळं बनावट नोटा बाजारात न येण्याचा सरकारचा दावा फोल ठरला आहे.

रिझर्व बँकेचे माजी गव्हर्नर रघुराम राजन यांनी 'टाइम्स ऑफ इंडिया' च्या मुलाखती दरम्यान म्हटले आहे की त्यांनी सरकारला नोटबंदीमुळे होणाऱ्या नुकसानी संदर्भात ईशारा दिला होता आणि त्यानंतर यासंदर्भात सरकारला सविस्तर अहवाल सुद्धा दिला होता. राजन यांचा कार्यकाल ५ सप्टेंबर २०१६ ला संपला होता आणि नोटबंदीची घोषणा ८ नोव्हेंबर २०१६ ला केली गेली होती. आता एवढ्या तथ्यांवरून कोणी म्हणत असेल की नोटबंदी यशस्वी झाली आहे तर त्यांना साष्टांग नमस्काराशिवाय दुसरे काय बोलू शकतो.

वर सांगितल्याप्रमाणे हे सरकार भांडवलदारांच्या तुंबड्या भरण्यासाठीच सर्व धोरणं राबवत आहे हे आपण सविस्तरपणे पाहिलं. यामध्ये गोरगरीब, कष्टकरी कामगार, लहान शेतकरी यांना उपासमारी, बेरोजगारी हेच पर्याय सरकारने समोर ठेवले आहेत. हि परिस्थिती बदलण्यासाठी भाजप असो किंवा काँग्रेस असो किंवा इतर कोणताही संसदीय पक्ष असो कोणीही काहीही प्रयत्न करणार नाहीत कारण सगळे एकजात लुटारू आहेत. उत्पादनाची साधनं आणि वितरण व्यवस्था सर्व सामान्यांच्या हातात म्हणजेच कष्टकरांच्या हातात येत नाहीत तोपर्यंत अन्यायावर उभी असलेली हि व्यवस्था अशीच चालू राहील. म्हणून कामगार, शेतकरी यांना संघटित करून एक क्रांतिकारी लढा उभारला पाहिजे.

## गौरी लंकेश यांच्या हत्येमागील राजकीय संदर्भ

पान १४ वरून

हत्येला जणू काही ती हत्याच नाही असे दाखवण्याचे काम अनेक चॅनेल्स करत आहेत. त्यांच्या हत्येची 'योग्य' कारणे सुचवण्यात अनेक पत्रकार गुंतले आहेत. गौरी लंकेश या कम्युनिस्ट किंवा नक्षली नव्हत्या हे त्यांचे विचार वाचणाऱ्या कोणत्याही राजकीय अभ्यासक नागरिकाच्या लगेच लक्षात येईल. परंतु अशाप्रकारे प्रचार करणारा मीडिया गौरींचे नाही तर स्वत:च फासीवादी असल्याचे, भांडवलदारांचा आणि हिंदुत्ववादी शक्तींचा दलाल असल्याचे वास्तव उघडे करत आहे.

भांडवली प्रसारमाध्यमे, सरकार, रास्वसं सारख्या हिंदुत्ववादी संघटना, त्यांच्यामागे असलेला भांडवलदार वर्ग आणि सोशल मीडीयावर प्रभावी असलेला निम्न भांडवली वर्ग यांच्या युतीनेच समाजात एक विखारी वातावरण तयार केले आहे. गौरी आणि इतर विचारवंतांचे खून हे अशाप्रकारे विखारी, खोटारडा प्रचार करणाऱ्या फासीवादी विचारांच्या वातावरणात, या विचारांच्या झेंडेकऱ्यांकडून प्रेरणा घेऊन झाले आहेत. राजेंद्र राजन यांच्या कवितेत (अनुवादीत) सांगायचे झाले तर

"हत्याऱ्यांच्या टोळीतील
एकजण हत्या करतो
दुसरा तिला दुर्दैवी म्हणतो
तिसरा मारलेल्या व्यक्तीचे दोष काढतो
चौथा हत्येचे औचित्य ठरवतो
पाचवा समर्थनात मुंडी हलवतो
आणि शेवटी सगळे मिळून
बैठक करतात
पुढच्या हत्येच्या योजनेसाठी"

खून करणाऱ्या प्रत्यक्ष खुन्यांपेक्षा या खुनांसाठी विचारनिर्मिती करणारे फासीवादी आणि त्यांची पाठीराखे भांडवलशाही व्यवस्था खरे जबाबदार आहेत.

भगतसिंगांनी म्हटल्याप्रमाणे "जी गोष्ट स्वतंत्र विचारांना सहन करू शकत नाही, तीला समाप्त झाले पाहिजे". फासीवादी शक्तींना नेस्तनाबूत करू शकणारी खरी भांडवलशाही विरोधी, धर्मनिरपेक्ष चळवळ रस्त्यावर उतरून उभी करणे हाच यावरचा खरा उपाय असू शकतो.

• संपादक मंडळ – सोमनाथ केंजळे, सत्यनारायण • संपादकीय कार्यालय- रूम नंबर १०३, बिल्डिंग नंबर ६१, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई ४०००४३
मो. नं. ९१५६३२३९७६, ९६१९०३९७९३ • संकल्प प्रिंटर्स, जी-१, द्रोणगिरी कॉ. ऑ. सोसायटी, साईनाथ नगर, ठाणे फोन न. ०९०२९९१६५०५ कडून मुद्रित